फेब्रुवारी, २०२२ । पृष्ठे ८८ । किंमत : रु.१५ । वर्ष बाविसावे । अंक दुसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत





तुम्ही होतात एक वादक
स्वप्नांना वास्तवात बांधून आणणारं
झंझावात... मेहनत आणि चिकाटीचं दुसरं रूप

तुम्ही असणार आहात
तसेच निरंतर
सळसळत्या पानांतून

2:37 3:45

**Supriya Sule**
30.9K Tweets
Follow

**Supriya Sule** @supriya_sule · Jan 12
'मेहता पब्लिशिंग हाऊस' या अग्रगण्य प्रकाशन संस्थेचे संचालक सुनिल मेहता यांचे निधन झाले.अनेक लेखकांची दर्जेदार पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत.याशिवाय इतर भाषांतील अनेक पुस्तके मराठी भाषेत आणण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

---

**Devendra Fadnavis** @Dev_Fadnavis · Jan 13
त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे, अनेक भाषांमधील दर्जेदार साहित्य त्यांनी मराठीत आणले आणि अनेकांना वाचनानंद दिला.

त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली.
त्यांचे कुटुंबीय आणि **मेहता पब्लिशिंग हाऊस** परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.
ॐ शान्ति 🙏

---

**Chandrakant Patil** @ChDadaPatil · Jan 12
**मेहता पब्लिशिंग हाऊस** या ख्यातनाम प्रकाशन संस्थेचे संचालक सुनील **मेहता** यांच्या निधनाची बातमी समजली. अनेक लेखकांना त्यांनी आपल्या प्रकाशन संस्थेच्या माध्यमातून ओळख मिळवून दिली. त्यांच्या निधनाने साहित्यक्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे. भावपूर्ण श्रद्धांजली ! 💐

---

**Vinod Tawde** @TawdeVinod · Jan 12
**मेहता** पब्लिशिंग हाऊसचे संचालक, प्रकाशक **सुनील मेहता** यांचे निधन ही अत्यंत दु:खद घटना आहे. पुस्तक प्रकाशनाच्या क्षेत्रातील अत्यंत कल्पक, अनुभवी आणि व्यावसायिक दृष्ट्या प्रकाशन व्यवसायाला नवे आयाम देणारं असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. **सुनील मेहता** यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

---

**rajiv khandekar**
@rajivkhandekar

मेहता पब्लिशिंगचा वृक्ष गगनावर घेऊन गेलेल्या मित्रवर्य सुनील मेहतांचे असे अचानक जाणे धक्कादायक आहे. या तडफदार प्रकाशकाच्या मृत्यूने मराठी ग्रंथव्यवहाराची अपरिमित हानी झाली आहे. हे दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर अनिलभाई व कुटुंबियांना देवो हीच प्रार्थना🙏ॐ शांती #मेहता_पब्लिशिंग

---

**taslima nasreen** @taslimanasreen · 13 Jan
Can't believe that, Sunil Mehta, my Marathi publisher died yesterday! He was so young! He was a dreamer. When a dreamer dies, world looks empty.😭

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक दुसरा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा

ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस


**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.



**संपादकीय**

# प्रकाशन विश्वातलं निर्भीड क्रांतीपर्व....

नव्या वर्षाकडून अनेक अपेक्षा बाळगत असतानाच एकाएकी आभाळ कोसळावं तशी गत झाली. गेली साडेतीन दशकं ज्या नावाचं गारुड प्रकाशन विश्वात कायम राहिलं, ज्या नावाने 'मेहता'चा डोलारा समर्थपणे सांभाळत कंपनीचं नाव सातासमुद्रापार नेलं; अश्या आपल्या सुनील मेहता यांचं आपल्यातून अचानक निघून जाणं अजूनही मनाला न पटणारं आहे. मराठी प्रकाशन व्यवसायात मोठा इतिहास रचून नवे पायंडे पाडणाऱ्या, पुस्तकांवर उदंड प्रेम करणाऱ्या, आपल्या लेखक-अनुवादकांना जीवापाड जपणाऱ्या या अवलियाला हा विशेषांक सुपूर्त करताना अनेक आठवणींचा पट डोळ्यांसमोर तरळतोय. काळ थांबल्यासारखा वाटतोय.

१९७६ मध्ये श्री. अनिल मेहता यांनी कोल्हापुरात या प्रकाशन संस्थेचं एक रोपटं लावलं, हळूहळू वृक्ष बहरत गेला आणि उत्तरोत्तर त्याचा वेल गगनाला भिडत गेला तो सुनील मेहता यांच्या जिद्द आणि प्रयत्नांमुळं. गेली ३५ वर्षं 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ज्या माणसाच्या महत्त्वाकांक्षी आणि व्यवसायाभिमुख धोरणामुळं आंतरराष्ट्रीय स्तरावर दिमाखात मिरवत आहे त्या सुनील मेहता यांच्याविषयी भूतकाळात कल्पना करून लिहिणं अतिशय दुःखद आहे. अवघ्या ५६

व्या वर्षी सगळ्यांच्या मनाला चटका लावून एकाएकी एक्झिट घेणं ही केवळ मेहतांसाठीच नव्हे तर समस्त मराठी प्रकाशन विश्वासाठी खूपच धक्कादायक घटना आहे. हजारो पुस्तके, शेकडो लेखक, असंख्य अनुवादक-संपादक आणि मोजता येणार नाहीत इतके, सर्वदूर पसरलेले वाचक आजवर मेहतांनी मायेने सांभाळले; आणि या सगळ्यांचा दुवा ठरले ते आपले सुनील मेहता. वाचक-लेखकांचा निखळ संवाद घडवून आणणं असो, फ्रँकफर्टमधल्या आंतरराष्ट्रीय बुकफेयरमधला त्यांचा उत्साही सहभाग असो किंवा २०१२ मध्ये नॉर्वे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत एकमेव मराठी प्रकाशक म्हणून केलेलं प्रतिनिधत्व असो; सुनील मेहता आज आठवतायत ते सतत पुस्तकं आणि पुस्तकांचा विचार करणारे. जगभरातील दर्जेदार पुस्तकांचे अनुवाद मराठीत आणून प्रकाशन व्यवसायात मोठी क्रांती घडवून आणणारा हा दृष्ट्या प्रकाशक काळाच्या किती पुढचा विचार करणारा होता हे वेगळं सांगायला नकोच. पारंपारिक प्रकाशन व्यवसायाला छेद देत पुस्तकांना लॅपटॉप, डेस्कटॉप आणि मोबाईलवर आणणाऱ्या सुनील मेहतांचा कामाचा झपाटा सर्वांना कायमच थक्क करणारा तर होताच, शिवाय मराठी प्रकाशन व्यवसायाला त्यांचा हा वेग न झेपण्यासारखाही होता. विक्रीचं प्रभावी तंत्र, पर्यावरणाचा विचार आणि वाचकांची आवड लक्षात घेत वर्षानुवर्षं दर्जेदार पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या मेहता पब्लिशिंगच्या कामाचा आवाका सुनील मेहता यांनी अतिशय चोख आणि नेटकेपणाने सांभाळला. जुन्या लेखकांची साहित्यकृती जिवंत ठेवण्यापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजणाऱ्या, विविध भाषांमधील मान्यवर लेखकांना मराठीत आणण्यासाठी सतत धडपडणारे सुनील मेहता आज असंख्य पुस्तकांच्या रूपात आपल्यासोबत आहेत.

कोल्हापुरातल्या अंबाबाईच्या प्रांगणापासून सुरुवात होऊन पुण्यातल्या दगडूशेठच्या आवारात बस्तान मांडणाऱ्या ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च्या कामाची जबाबदारी भविष्यात कधी ना कधी आम्हा भावंडांवर येणार आणि आम्ही त्यासाठी हळूहळू तयारही होऊ याची कल्पना तर होतीच पण ती इतक्या लवकर आणि अश्या दुःखद पद्धतीने ती आम्हाला सांभाळावी लागेल, याची कल्पनाच आली नाही. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली ‘मेहता’चं काम समजून घेण्याची, त्यांच्या भविष्यातील योजनांमध्ये आमच्या नव्या

पिढीच्या विचारांची, कल्पनांची साथ देण्याची स्वप्नं पाहत असताना अचानक डोक्यावरचं छप्पर जाईल असं मुळीच वाटलं नव्हतं. आजही त्यांनी घालून दिलेल्या कामाच्या वस्तुपाठामध्ये, शिस्तबद्ध नियोजनामध्ये आणि असंख्य पुस्तकांच्या पानांमध्ये त्यांचा वावर जाणवतोच तरीही ही मोठी पोकळी भरून न येणारीच. त्यांच्या पश्चात त्यांनी वाढून ठेवलेलं प्रचंड काम समजून घेताना ‘मेहता मराठी ग्रंथ जगत’च्या या मासिकाच्या माध्यमातून पहिल्यांदाच तुम्हा सगळ्यांशी संवाद साधत आहे. काळ कसोटीचा आहे. अशा परिस्थितीत देशभरातून अनेक दिग्गजांचा, मान्यवर साहित्यिक-लेखकांचा आणि आजवर आमच्याशी पुस्तकांच्या माध्यमातून जोडल्या गेलेल्या असंख्य सहृदांचा दिलासा आम्हाला मिळत आहे. याच पाठबळावर आणि पप्पांच्या आशीर्वादाच्या जोरावर आम्ही हे काम आता पुढे नेत आहोत, आशा आहे की तुमचे सहकार्य पूर्वीइतकेच आम्हाला यापुढेही मिळेल.

आमचे आजोबा श्री. अनिल मेहता यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली, कामात कुठलाही खंड पडू न देता आम्ही पूर्वीइतकीच दर्जेदार पुस्तके आणि नवे उपक्रम आपल्यासाठी घेऊन येत राहू, ही आशा व्यक्त करतो.

सुनील मेहतांसाठी ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’च सगळं काही होतं. त्यांनी फायनल केलेली आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली अंतिम निर्णयापर्यंत येऊन पोचलेली २६ नवी पुस्तकं आपल्यासाठी घेऊन येत आहोत. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावर जबाबदारीने काम करत राहण्याची ग्वाही देत त्यांच्या चरणी ही श्रद्धांजली अर्पण..



(अखिल सुनील मेहता)

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



### व्यवहारदक्ष सुनील

*सुनील मेहता यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसची संपूर्ण जबाबदारी स्वीकारल्यानंतर अनेक महत्त्वाचे आणि धाडसी निर्णय घेतले. स्पष्टवक्तेपणा, हजरजबाबीपणा आणि नवीन धोरणांमुळे पारंपारिक प्रकाशन व्यवसायाला नवा आयाम देण्यात मोठा हातभार लागला. आज त्यांच्या पश्चात त्यांच्या दूरगामी विचारसरणीचा मागोवा घेताना श्री. अनिल मेहता यांनी लिहिलेला हा विशेष लेख.*

सुनीलनं व्यवसाय हातात घेतला तेव्हा सर्वप्रथम काय केलं असेल? तर त्यानं काही लेखकांची पुस्तकं किरकोळ भावात विकून टाकली. मला आश्चर्य वाटलं. मी त्याला विचारलं, तर त्यानं त्याचं कारण सांगितलं, ‘एक म्हणजे गोडाऊन त्यामुळं रिकामं होईल व त्यात नवीन लेखकांची पुस्तकं ठेवता



येतील.' मला त्यानं सांगितलेलं कारण मान्य झालं. त्यानंतर त्यानं आणखी एक मोठा निर्णय घेतला व तो म्हणजे त्यानं उधारी पूर्णपणे बंद केली. त्याचं कारण म्हणजे आमच्या या पुस्तक प्रकाशन व्यवसायात वर्षानुवर्षं उधारी हा फार वाईट प्रकार होता. म्हणजे आम्ही पुस्तकं प्रकाशित करायची व ती वेगवेगळ्या पुस्तक विक्रेत्यांकडं महाराष्ट्रभर पाठवून द्यायची. मग तो पैसे देईल तेव्हा देईल म्हणून वाट बघायची किंवा त्याच्याकडं सतत चकरा मारत बसायचं. ही पद्धत सुनीलला मान्य नव्हती. आणि पुस्तक विक्रेत्यांकडून वेळेवर पैसे येत नसल्यामुळं त्याला कागदवाल्यांची, प्रेसची, बाईंडरची बिलं वेळेवर देता येत नसत. या लोकांचा तगादा वाढल्यामुळं त्यानं हा निर्णय घेतला. त्याला एक कारणही घडलं. त्या वेळी कमलाबाई ओगले यांचं 'रुचिरा' नावाचं पुस्तक आमच्याकडं आलं होतं. ते उत्तम जात होतं; पण उधारीवरच. त्याला ते उधारीवर देणं चुकीचं वाटू लागलं. त्यानं संभाव्य आर्थिक धोके लक्षात घेऊन आर्थिक व व्यावसायिक धोरणांची फेरमांडणी केली व उधारीचा व्यवहार कमी करण्यास सुरुवात केली. विशेषतः, ज्या पुस्तकांना खात्रीनं मागणी होती, त्या पुस्तकांसाठी तर त्यानं सर्व पुस्तक विक्रेत्यांना कळवूनच टाकलं की, यापुढं ही पुस्तकं आमच्याकडं उधारीवर मिळणार नाहीत.

त्यानं हा नियम केला अन् मला कोल्हापुरात पुण्या-मुंबईतून पुस्तक विक्रेत्यांचे फोन येऊ लागले. 'तुमचा मुलगा पुस्तकं उधारीवर देत नाही, तुम्ही त्यांना सांगा,' 'पुस्तकं उधार द्यायला सांगा,' 'पूर्वीपासूनची हीच पद्धत आहे' वगैरे.

मी सुनीलशी बोललो, तर त्यानं सांगितलं, 'तुम्ही सहा महिने या विषयाकडं लक्ष देऊ नका. सहा महिने पुस्तकं विकली जाणार नाहीत, पैसे येणार नाहीत एवढंच ना? आपण हा प्रयोग करून पाहूया. बघूया तरी काय होतं ते.' आणि खरोखरच! सहा महिन्यांनंतर सुनीलच्या अंदाजाप्रमाणंच झालं. असा काही बदल झाला, की पुस्तक विक्रेते पुस्तकं रोख पैसे देऊन विकत घेऊ लागले. उधारी पूर्ण बंद आणि त्यानंतर काही वर्षांनी सुनीलचं हेच धाडसी अनुकरण इतरही अनेक प्रकाशकांनी केलं. त्यांना सुनीलच्या या नव्या धोरणाचे फायदे लक्षात आले व त्यांनीही उधारीचा व्यवहार कमी करण्यास प्रारंभ केला. शरद गोगटे यांनी 'मराठी ग्रंथ प्रकाशनाची दोनशे वर्षे' या पुस्तकात हा किस्सा लिहिला आहे. त्यात ते लिहितात, 'काळाप्रमाणे ग्राहकवृत्तीत होणारे बदल लक्षात घेऊन त्याप्रमाणे व्यावसायिक धोरणे

बदलण्याचे योग्य श्रेय या नव्या पिढीला दिले पाहिजे.'

त्यामुळं आज मराठी प्रकाशकांना जो काही थोडाफार पैसा दिसतोय, त्याचं एक कारण सुनीलनं बदललेला हा पायंडा आहे. मराठी प्रकाशन क्षेत्रातील सुनीलचं हे मोठं योगदान आहे.

सुनील माझ्यापेक्षा वेगळा आहे. मी पुस्तक स्वत: वाचण्यावर भर देतो. त्याचं म्हणणं असतं की वाचन तर हवंच; पण त्यापेक्षा तो पुस्तकांची परीक्षणं भरपूर वाचतो. परीक्षण वाचून तो पुस्तकांचा नेमका अंदाज घेतो. मग आवडलेलं पुस्तक मागवून घेतो. निरनिराळ्या संपादकांची मतं घेतो. मग निर्णय घेतो. म्हणजे त्याचं वाचन माझ्या तुलनेत कमी आहे; पण त्याच्याकडं व्यवहारज्ञान खूप चांगलं आहे. आमचे सगळे लेखकही म्हणतात, 'तुमच्यापेक्षा तो व्यवहार व्यवस्थित बघतो.' आमच्याकडं लेखक कधी नाराज नसतात; कारण बरोबर ३० एप्रिल किंवा उशिरात उशिरा फार तर १५ मे पर्यंत त्या त्या लेखकाचं मानधन त्यांच्या बँक खात्यामध्ये पोहोचलेलं असतं. तो पैसे डायरेक्ट त्यांच्या अकाउन्टवर ट्रान्स्फर करतो आणि स्टेटमेन्ट पोस्टानं पाठवतो. ई-मेल असेल तर ई-मेलनं.

तो व्यवहाराच्या बाबतीत स्वच्छ व स्पष्ट आहे. सवलतीच्या बाबतीतही तो पक्का आहे. क्रॉसवर्ल्डसारखी मोठी संस्था त्याच्याकडं लाखो रुपयांचा व्यवहार करते. त्यांचे मालकही सुनीलला येऊन भेटून गेले व म्हणाले की, 'आमच्यासाठी फक्त सवलत द्या'. पण, त्यांनाही त्यानं सांगितलं, की 'आम्ही लेखकांना पूर्ण मानधन देतो. त्यामुळं आम्हाला असं करता येणार नाही.'



त्याच्याकडं ही जी स्पष्टता आहे, ती माझ्याकडं नव्हती. आर्थिक व्यवहारात त्यानं अधिक सुसूत्रता आणली. पूर्वीच्या व्यवहाराच्या अनेक पद्धती सुनीलनं बदलल्या. प्रत्यक्षात कमी फायदा मिळाला तरी चालेल; पण आताशा सर्व व्यवहार रोखीनं आणि वस्तुनिष्ठ तत्त्वे ठरवूनच केला जातो. त्यामुळं एकाला एक आणि दुसऱ्याला दुसराच नियम, असा व्यवहाराचा प्रकार घडत नाही. त्यामुळं मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तक विक्रेत्यांना एक वेगळी शिस्त लागली.

सुनील प्रकाशनाचा सगळा कारभार अतिशय चांगल्या रीतीनं, व्यवस्थित पाहतो म्हटल्यावर मी हळूहळू व्यवहारातून लक्ष घालणं बंद केलं. मी फक्त सल्ला देतो; पण निर्णय सर्व त्याचे असतात.

इंग्लंडमधून एक 'वीकली' नावाचं इंग्रजी मासिक निघतं. त्याची वार्षिक वर्गणी जवळजवळ पंधरा हजार आहे. ते मासिक पुण्यात कुठल्याही प्रकाशकाकडं येत नव्हतं. ते सुनील घेत असे. सुनीलचा स्वभाव धाडसी आहे आणि मला वाटतं, की तो काही गोष्टी आउट ऑफ वे जाऊन करतो आणि त्यामुळंच त्याला यश मिळत असावं. तो हे मासिक का घेत असे? तर मी बघितलं, की त्यात जी नवनवीन पुस्तकं यायची, त्याची परीक्षणं तो वाचायचा. ती कशी विकली जातात किंवा त्या पुस्तकांचं मार्केट काय आहे हे सगळं गणित त्याला त्यातून समजायचं. त्यातूनच त्याला समजायचं की आपण कोणतं पुस्तक घ्यावं.

सुनीलला मी दिल्लीत वर्ल्ड बुक फेअरमध्ये आवर्जून जायला सांगत असे. तो आजही आवडीनं जातो. निरनिराळी पुस्तकं बघतो. आवडलेल्या पुस्तकांच्या प्रकाशकांना भेटतो. हक्क मिळवतो. मग एक दिवस मी त्याला म्हटलं की, 'Why don't you go to Frankfurt Book Fair ?' कारण त्याबद्दल आजपर्यंत आपण इतकं वाचलं आहे तर तिथं जाऊन बघायला काय हरकत आहे? आणि त्यानं तिथं जाण्याचं ठरवलं. तिथं जाणं म्हणजे तुम्हाला लोखंडाचेच पाय हवेत. मोठमोठ्या इमारती, त्यातही प्रचंड अंतर, चालणं सोपं नव्हतंच; पण सुनीलनं निर्णय घेतला.

तो जेव्हा प्रथम गेला, तेव्हा त्याच्या लक्षात आलं की तिथं भारतीय प्रकाशकांना किंमत नाही. दुसरं म्हणजे तिथं सहा-सहा महिने आधी अपॉइन्टमेन्ट घ्यावी लागते. त्याशिवाय कुठल्याही दालनामध्ये जाता येत नाही. मग सुनीलनं प्रवेशद्वारावर लक्ष ठेवायला जिथं कोणी नव्हतं तिथं जाऊन पुस्तकं चाळली. काहींची फक्त प्राण्यांवर होती, काहींनी फक्त

ऑटोमोबाइल याच विषयावर पुस्तकं काढली होती. म्हणजे विषयाला धरूनच. नंतर काही ठिकाणी विनंती केल्यावर त्याला प्रवेश मिळाला.

त्यानंतर पुन्हा सुनील जेव्हा तिथं गेला तेव्हा आधीचा हा अनुभव लक्षात घेऊन त्यानं आधीच अपॉइन्टमेन्ट्स घेऊन ठेवल्या. तेही जमवावं लागतं. दोन बिल्डिंग्जमध्ये चालत जायला एका तासाचं तरी अंतर ठेवायचं. त्याप्रमाणं त्यानं बरोबर नियोजन केलं. त्या खेपेला मात्र त्याला फ्रँकफर्टची खऱ्या अर्थानं जवळून ओळख झाली.

नंतर तो नेहमी जाऊ लागला. एकदा तो बिश्टिश बुक फेअर बघायला इंग्लंडलाही गेला होता. अनेक उत्तमोत्तम पुस्तकांचे हक्क त्यानं मिळवले. तिथं स्वतःची ओळख निर्माण केली. अनेक प्रकाशकांना माहीत झालं की हा मराठीतला वेगळा प्रकाशक आहे. जो हिंदी, इंग्रजी व इतर भाषांतीलही पुस्तकं अनुवादित करतो. शिवाय त्यांच्याशी जे काही करार केले जातात, त्याचे योग्य रीतीने पालनही केले जाते. आगाऊ रक्कमही वेळेवर दिली जाते. त्यामुळं तिथं एक प्रतिमा तयार झाली, 'मेहता पब्लिशिंग हाऊस इज द बेस्ट पब्लिशिंग फॉर अस.'

गेल्या सहा-सात वर्षांपूर्वी नॉर्वेवरून सुनीलला निमंत्रण आलं होतं. भारतातून पाच प्रकाशक गेले होते. दिल्ली, चेन्नई, कोलकात्याहून बाकीचे होते व सुनील एकमेव मराठी महाराष्ट्रातून होता. तिथं सर्वांना नॉर्वे दाखवण्यात आलं. तिथली पुस्तकं-आपली पुस्तकं यात काही आदान-प्रदान करता येऊ शकतं का, हे सुनीलला बघायचं होतं; पण त्याच्या असं लक्षात आलं, की ही माणसं त्यांच्या पुस्तकांचे हक्क विकण्याचा प्रयत्न करत आहेत; पण आपल्याकडून ते काहीच घेत नाहीत. म्हणजे त्यांची पुस्तकं आपल्याकडं येताहेत, आपली मात्र तिकडं जात नाहीत. याचं कारण आपण आपल्या मराठी पुस्तकांच्या इंग्रजी भाषांतरात कमी पडतोय आणि हे असं जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मराठी साहित्य जगापर्यंत पोचणार नाही. अलीकडं ज्यांचं इंग्रजी व मराठी दोन्ही उत्तम आहे, अशा काही लेखकांकडून त्यानं मराठी पुस्तकं इंग्रजीतून अनुवाद करून घेण्यास सुरुवात केली आहे. उदा. 'राजा रवि वर्मा', 'राधेय', 'श्रीमान योगी' इत्यादी पुस्तकं इंग्रजीत आंतरराष्ट्रीय प्रकाशकांकडून प्रकाशित केली जात आहेत. त्याचं कारण सुनीलचे या पातळीवरच्या संपादकांचे संबंध.

नॉर्वेला जाताना सुनीलनं मराठीतील काही उत्तम वाङ्मयीन पुस्तकांचे इंग्रजीत सिनॉप्सिस तयार करून नेले होते. जेणेकरून मराठी पुस्तकांची

ओळख नॉर्वेजियन प्रकाशकांना व्हावी आणि मराठी प्रकाशकाचे हक्क विकले जाऊन आपली पुस्तकं त्यांच्या भाषेत प्रकाशित व्हावी, ही त्याची इच्छा होती.

मेहता पब्लिशिंग हाऊससाठीची सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे २००३ साली बाजीराव रोडवर माडीवाले कॉलनीत सुनीलनं जागा घेऊन बिल्डिंग बांधली. मला वाटतं, हे धाडस मी करू शकलो नसतो. सुनीलची ही मोठीच उडी होती.

त्यावेळी उद्घाटनासाठी कोणाला बोलवायचं, तर माझ्या डोळ्यांसमोर मराठी लेखक आनंद यादव व भारतीय भाषेतील लेखक ज्यांची पुस्तकं आम्ही अनुवादित केली आहेत ते अरुण शौरी हे दोन जवळचे लेखक मित्र आले. ज्यांनी मेहता पब्लिशिंगचा प्रवास जवळून पाहिला होता. त्या दोघांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून आम्ही नव्या ऑफिसचं उद्घाटन केलं. त्यावेळी आम्ही एका वाचकाचा, आयडियल बुक कंपनीचे कांताशेट नेरुरकर या पुस्तक विक्रेत्याचा, संगम प्रेसचे शहा व मेहता यांचा, अनंत खासबागदार या कलाकाराचा, आणि ज्यांनी बिल्डिंग बांधली त्या इंजिनिअरचा, श्री. कोठारी यांचा सत्कार त्यांच्या हस्ते केला. कार्यक्रम खूप छान झाला. त्यावेळी बरेच पुस्तक विक्रेते, प्रकाशक, प्रिंटर्स आले होते.

नव्वदीच्या दशकामध्ये आमचं नाव अनुवादित पुस्तकांचे प्रकाशक म्हणून खऱ्या अर्थानं पुढं आलं. अलीकडच्या पाच वर्षांत तर मेहता पब्लिशिंग हाऊसचं इतकं नाव झालं आहे, की इंग्लंड, अमेरिकेतील काही मोठे लेखक असतात, त्यांची पुस्तकं अजून प्रकाशितही झालेली नसतात, ती प्रूफ कंडिशनमध्ये असतात आणि तरीही त्याच वेळी ते त्याची एक कॉपी आमच्याकडं पाठवून देतात व कळवतात की, ‘या पुस्तकाचा अनुवादासाठी विचार करावा ही विनंती.’

अनुवादित साहित्यावर आम्ही इतकं लक्ष केंद्रित का केलं, असा प्रश्न बऱ्याच जणांना पडतो. त्याचं उत्तर असं, की माझ्या कारकिर्दीत मराठी लिहिणारे खूप चांगले चांगले लेखक होते. मी ते मिळवू शकलो. नंतर मात्र असे लेखक कमी-कमी होत गेले व असले तरी त्यांची एक-दोन पुस्तकं आल्यानंतर बंद होतात. हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आज मराठी लेखक आहेत जे कायम लिहिताना दिसतात व त्यांची पुस्तकं खपत असतात. फेसबुक व ब्लॉगवर लिहिणारेही आहेत; पण कोणतेही साहित्य

पुस्तकरूपात येण्यासाठी, त्या साहित्यासाठी जो सखोल अनुभव व अभ्यास लागतो तो आजच्या लेखकांमध्ये कमी दिसतो. काही यशस्वी लेखक आहेतही; पण ते त्या-त्या प्रथितयश प्रकाशन संस्थेसाठी बांधील दिसतात. तसेच वाचकांना अनेकविध विषय हवे असतात आणि अनुवादित पुस्तकांत तसे विषय आढळतात. मराठीत तसे विषय हाताळणाऱ्या लेखकांचाही अभाव आहे. अनुवादित साहित्यातील विषय हे मराठी वाचकाला उत्सुकता वाटेल असे असतात, असे विविध विषय देण्यात वेगळाच आनंद आहे. शैलीही वेगळी असते. मी मराठीइतकंच इंग्रजी साहित्यही वाचतो. मराठीत इंग्रजी वाचणारे लोक कमी आहेत. त्यामुळं अनुवादित पुस्तकांचा आम्हाला अनुभव असा आला, की ही नवी अनुवादित पुस्तकं वाचकांना आवडू लागली. मागणी वाढू लागली. विक्रीही उत्तम प्रकारे होऊ लागली. त्यामुळं त्या पुस्तकांच्या यशानंच आम्हाला आत्मविश्वास दिला, की आपण यापुढं अनुवादित पुस्तकांवरच लक्ष केंद्रित करायचं आणि तसं आम्ही करत गेलो.

आमचं या क्षेत्रातील यश बघून आता इतर प्रकाशकांनीही अनुवादित पुस्तकांची कामं सुरू केलेली आहेत. आता इथून पुढं मराठीतील नवीन पुस्तकांपेक्षा सर्व अनुवादितच साहित्य येईल की काय असं मला वाटू लागलंय.

बरेच जण मला असंही विचारतात, की तुमच्याकडं वर्षानुवर्षं अनुवादक कसे काम करतात? अनुवाद करणाऱ्याला इतकं महत्त्व द्यावं का? त्यांचा दर्जा हा दुय्यमच. मूळ लेखक तो मूळ लेखकच. मला असं विचारणाऱ्यांबद्दल फक्त कीव येते. मी काही सांगत बसत नाही; पण पंचाहत्तरीनिमित्त काही अनुवादकांनी माझ्याविषयी व एकूणच मेहता पब्लिशिंगबद्दल काही भावना व्यक्त केल्या, तेव्हा मला खरोखरच एक समाधान वाटलं. अशोक पाध्ये त्यावेळी म्हणाले, 'अनुवादक म्हटला की त्याला फारसा मान दिला जात नाही, असं साधारणपणे माझ्या अनुभवास आलं आहे; कारण मूळ लेखकच एवढा श्रेष्ठ असतो, की त्याचं तुम्ही अनुवाद केल्यानंतर त्या मूळ लेखकालाच ते श्रेय जातं. अनुवादकाला जात नाही; परंतु तितकंच समर्थपणे ते कागदावर उतरवणं हे फार महत्त्वाचं असतं. ही गोष्ट अनुवादकाच्या बाबतीत कशी आहे, तर एखाद्या चित्रकारानं तुमचं चित्र काढलं आणि तोच तुमचा फोटो एखाद्या फोटोग्राफरनं काढला तर कुठला श्रेष्ठ ठरेल, तर चित्रकार श्रेष्ठ ठरेल. याचं कारण तो तुमच्या स्वभावातील व्यक्तिवैशिष्ट्ये तुमच्यात दाखवतो. ते फोटोत होत नाही.

फोटोमध्ये जसं आहे तसंच उमटतं. याच्यापलीकडं त्याला काहीही जास्त डोकं नसतं. तर या ठिकाणी अनुवादकाला किती श्रम, किती कष्ट घ्यावे लागतात, काय काय करावं लागतं याचा सगळा अंदाज अनिल मेहता यांना होता. त्यामुळं त्यांनी अनुवादकांना कायम आदरानं वागवलं.'

भारती पांडे म्हणाल्या की, 'दुय्यम अनुवादकाला तिय्यम समजण्याची जी पद्धत आहे ती मेहतांच्याकडं अजिबात नाही. आणि अत्यंत सन्मानानं लेखकाला कसं वागवावं हे मेहता पब्लिकेशनकडून शिकण्यासारखं आहे, असं मला वाटतं. त्यामुळं मेहता पब्लिशिंग हाऊससाठी काम करण्यामध्ये मला फार आनंद आहे.'

या दोन प्रतिक्रिया फार फार महत्त्वाच्या वाटल्या. मला विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची ही उत्तरं आहेत.

(अनिल मेहता यांच्या पूर्व लिखित आत्मचरित्रातून)

## बागायती प्रकाशक - सुनील मेहता

सुनील मेहता हे १९८७ पासून प्रकाशन व्यवसाय करीत होते, मात्र मेहता प्रकाशनाची स्थापना त्यांचे वडील अनिल मेहता यांनी त्याच्या दहा वर्षे आधीच केली होती. अर्थात, ग्रंथविक्रेते म्हणून कोल्हापूरात दीर्घकाळ काम केल्यानंतर अनिल मेहता यांनी प्रकाशनसंस्था सुरू केली होती आणि पहिल्या दशकात कमी पुस्तके प्रकाशित केली असली तरी मेहता प्रकाशनाची चांगली ओळख निर्माण केली होती. मात्र सुनील मेहता यांनी सूत्रे हातात घेतली आणि पुढील साडेतीन दशकांत मेहता पब्लिशिंग हाऊसला मराठी प्रकाशन व्यवसायात अव्वल स्थानावर घेऊन जाण्याइतपत मजल मारली. या काळात त्यांनी लहान-मोठी अशी साडेतीन हजार पुस्तके प्रकाशित केली. म्हणजे वर्षाला कमीत कमी शंभर आणि आठवड्यात दोन असे ते प्रमाण आहे. यात प्रामुख्याने इंग्रजीतून मराठीत आणि हिंदी, कन्नड, बंगाली इत्यादी भारतीय भाषांतून मराठीत आणलेली पुस्तके अर्ध्याहून अधिक असतील. उर्वरित पुस्तके मराठीतील नव्या-जुन्या साहित्यिकांची आहेत. दर्जेदार निर्मिती, वितरणाचे मोठे जाळे, मोठ्या जाहिराती आणि आक्रमक पद्धतीने मार्केटिंग ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये राहिली आहेत. राष्ट्रीय स्तरावरील अनेक दिग्गज नेत्यांची चरित्रे वा आत्मचरित्रे, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नोबेल व अन्य पुरस्कार विजेत्यांची पुस्तके धडाकेबाज पद्धतीने त्यांनी मराठीत आणली.

त्याशिवाय भारतातील सुधा मूर्ती यांच्यापासून गुलजार यांच्यापर्यंतच्या अनेक लेखकांची पुस्तकेही मराठीत आणली. मराठीतील व्यंकटेश माडगूळकर ते विश्वास पाटील या दरम्यानच्या लेखकांची यादीही खूप मोठी सांगता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक दिग्गजांना पुण्यात आणून वाचक-लेखक संवाद घडवणे हे काम आज तुलनेने सोपे झाले असले तरी, सुनील मेहता यांनी त्याचा प्रारंभ दोन दशकांपूर्वी केला तेव्हा त्याची अपूर्वाई खूप जास्त होती. शिवाय इ-बुक हा प्रकारही जेव्हा मराठी वाचकांना केवळ ऐकून माहीत होता आणि मराठीतील बहुतेक सर्व प्रकाशक त्याकडे उदासीनतेने किंवा तुच्छतेने पाहत होते तेव्हा, म्हणजे २०१३ मध्येच सुनील मेहता यांनी त्यांची दोनेक हजार पुस्तके ई-बुक स्वरूपात आणली होती. गेल्या वर्षी कोविड काळात आठ-दहा महिने प्रकाशन व्यवहार ठप्प होता तेव्हा त्या ई-बुक्सच्या विक्रीत दोनशे ते तीनशे पटीने वाढ झाली, तेव्हा त्यांची 'व्हिजन' काय प्रकारची होती याचा प्रत्यय आला. मेहता यांनी देश-विदेशातील किती लेखकांशी, प्रकाशकांशी, अनुवादकांशी संपर्क-संवाद ठेवला याचा विचार केला तर आचंबित व्हावे लागते. हे सर्व करायचे तर आर्थिक व्यवहार तेवढेच चोख व प्रवाही ठेवावे लागतात आणि ती कसरत सतत करावी लागते.

सुनील मेहता यांचे योगदान नीट समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांची सूची नजरेखालून घालायला हवी. नंतर त्यांतील लेखक आणि त्या पुस्तकांचे आशय-विषय किती विविध व सखोल आहेत हे समजून घ्यायला हवे. त्यानंतर ही पुस्तके महाराष्ट्रातील व राज्याच्या बाहेरील किती संस्था, संघटना, विद्यापीठे यांना कशी उपयुक्त ठरली याचा तपास करायला हवा. आणि मग किती प्रकारचे वाचक, लेखक, अभ्यासक, संशोधक यांना ही पुस्तके उपयुक्त ठरली यांचा शोध घ्यायला हवा. त्यानंतर त्यांनी किती विविध लेखक, अनुवादक मराठीत नव्याने आणले किंवा नावारूपाला आणले याची उजळणी करायला हवी. शेवटी किती प्रकारचे विषय, लेखनप्रकार पहिल्यांदा मराठीत आणून किंवा पुन्हा पुन्हा आणून किती नवी दालने खुली केली किंवा समृद्ध केली याचाही शोध घ्यायला हवा. अशा पद्धतीने व टप्प्याटप्प्याने फक्त तपशील उभे केले आणि त्यांची नीट जुळवणी केली तर कोणीही जाणकार माणूस थक्क होऊन जाईल. या प्रकाशनसंस्थेच्या वाटचालीत अनेक घटकांचा सहभाग होता, म्हणूनच इतके होऊ शकले हे खरे; पण त्यांच्या मागची दूरदृष्टी, कल्पकता व अथक मेहनत

होती हे निर्विवाद!

त्यामुळे त्यांचे हे काम कोणत्याही चांगल्या व मोठ्या साप्ताहिकाने, दैनिकाने, शिक्षणसंस्थेने केलेल्या कामाइतकेच किंबहुना जास्त तोलामोलाचे आहे असेच म्हणावे लागेल. मात्र तशी मान्यता किंवा प्रतिष्ठा मेहतांना आणि असे काम करणाऱ्या अन्य प्रकाशकांनाही मिळत नाही. याचे कारण 'प्रकाशन' व्यवहाराकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टिकोन पुरेसा विकसित झालेला नाही. अनेक वेळा तर बराच सदोष असतो. याचे कारण लेखक व वाचक या दोन्ही वर्गात प्रकाशन व्यवसायाबाबत अद्याप बरेच अज्ञान, गैरसमज आहेत. किंबहुना निरक्षरता आहे असे म्हणावे लागेल. मुळात प्रकाशन चालवणे म्हणजे वाचक, लेखक, अनुवादक, संपादक, मुद्रित शोधक, चित्रकार-मुखपृष्ठकार, मुद्रक, बाईंडर, जाहिराती इत्यादी अनेक घटकांची मोट बांधावी लागते. यातील प्रत्येक घटकाच्या कमी-अधिक लहरी सांभाळणे, अव्यवस्थितपणा अनुभवणे, अनेक घटकांमध्ये सातत्याचा व परिपूर्णतेचा अभाव असणे हे सर्वच प्रकाशकांच्या वाट्याला कमी-अधिक प्रमाणात येतेच. आणि ते करताना नवनिर्मितीचा आनंद व व्यवहाराची गणिते जुळवण्याची धाकधूक अशी संमिश्र भावना सतत मनात बाळगावी लागते. कारण एवढे करूनही प्रकाशन व्यवसाय १० ते २० टक्के यापेक्षा अधिक परतावा देऊ शकत नाही. त्यातील काही पुस्तकेच नफा देतात, काही पुस्तके भरपूर तोटाही देतात. शिवाय प्रकाशकाने स्वत: खर्च केलेला वेळ, ऊर्जा व श्रम लक्षात घेतले तर बहुतांश वेळा तो आतबट्ट्याचाच व्यवहार असतो. त्यामुळे एका मर्यादित अर्थाने प्रकाशन व्यवहार हा शेती करण्यासारखाच प्रकार असतो. अर्थातच, जिरायती व बागायती शेतीत जेवढा फरक असतो तो इथेही असतोच. आणि म्हणून तसा विचार केला तर सुनील मेहता हे बागायती शेती करीत होते, असे म्हणावे लागते.

एक चांगली गोष्ट अशी आहे की, मेहता पब्लिशिंग हाऊस ही प्रकाशन संस्था पुढील काळात अधिक भरभराटीला येऊ शकेल अशी अनुकूल परिस्थिती आहे. कारण सुनील मेहता यांच्या मुलांना या कामात नुसताच रस व गती आहे असे नसून, नव्या काळाशी सुसंगत राहता येईल अशी व्हिजनही आहे. त्या मुलांवर विशेषत: अखिल मेहता यांच्यावर आता दु:खाचा डोंगर कोसळलेला असणे साहजिक आहे. मात्र त्यांची इतकी पूर्वतयारी झालेली

आहे की, इतका भक्कम पाया व विस्तार असलेली प्रकाशनसंस्था चालवताना त्यांच्या कर्तृत्वाला नवे धुमारे फुटतील. अधिक महत्त्वाचे म्हणजे त्यांना आपल्या वडिलांनी मागे ठेवलेल्या आठवणी पूर्वीचे प्रत्येक पुस्तक हाताळताना प्रेरणा देत राहतील, प्रत्येक नवे पुस्तक प्रकाशित करताना आंतरिक बळ देत राहतील. आणि त्यासाठी हजारो लेखक व लक्षावधी वाचकांच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी राहतील! त्यामुळे साधनेच्या वतीने त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि सुनील मेहता यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

**– साधना मासिक**

सुनील मेहता हे खूप धाडसी प्रकाशक होते. मराठीतील प्रकाशन व्यवसायातील तारा निखळला आहे. माझा आणि त्यांचा संबंध छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील 'संभाजी' या कादंबरीच्या निमित्ताने आला. प्रकाशक म्हणून त्यांचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांचे जाणे वेदनादायी आहे.

**–विश्वास पाटील, ज्येष्ठ लेखक**



'तुम्ही काहीही करा हो सुनीलभाई, कोल्हापूरच्या प्रेमाची सर इथे पुण्यात नाही म्हणजे नाहीच येणार! लेखकांवर खरं प्रेम करणार ते पप्पाच!!! तुम्ही इथे बसून पैसे मोजता फक्त!'

पुण्याच्या भेटीत दर वेळी मी एकदा तरी हे सुनील मेहतांना ऐकवत असेच असे. मग तेही मोठ्याने हसत आणि म्हणत, 'रॉयल्टीचा चेक कोण देतं तुम्हाला? पप्पा देतात का? त्यांच्यावर एवढं प्रेम आहे तर जा तिकडे कोल्हापूरला राजाभाऊची भेळ खायला!'

मेहता पब्लिशिंग हाऊस म्हटलं की मला सगळ्यात आधी आठवतं ते कोल्हापूरच्या भवानी मंडपापासचं छोटं दुकान. त्या गर्दीत बसलेले पांढऱ्या धोप वस्त्रातले प्रेमळ, मऊ नजरेचे हसरे अनिलभाई... त्यांच्या मागच्या टेबलावर शांतपणे हिशेबाची कामं करत बसलेल्या बाई आणि सतत लगबगीत असलेले इतर सहकारी!

लहान होते वयाने तेव्हापासून या दुकानाशी नातं. पुढारीत नोकरी होती छोटीशी, स्वत:च्या पायावरच उभं राहाण्याच्या हट्टापोटी खिशातल्या मोजक्या पैशात हिशेब करावे लागत; पुस्तकं विकत घ्यायला कुठे काय असणार?

अनिलभाई म्हणत, 'जा तुला हवी ती पुस्तकं घेऊन घरी. वाच आणि दे आणून परत!'

शिवाय सहज एखाद्या मोकळ्या संध्याकाळी नवी पुस्तकं चाळायला, गप्पा मारायला गेलं की राजाभाऊची भेळ खायला देत ती वेगळीच! दुकानात तोबा गर्दी असली, तरी अनिलभाईंना गप्पा मारायला वेळ नाही असं कधी होत नसे. त्यांनीच मला माझं पहिलं पुस्तक दिलं अनुवाद करायला- सिलेक्टिव्ह मेमरी आणि एक मैत्रीण दिली आयुष्यभराची - शोभा डे.

तेव्हापासून मी मेहता पब्लिशिंग हाऊसची लेखिका झाले!

या नात्याला आता अनेक वर्षं उलटली आहेत आणि हे सगळं मी ज्या कारणासाठी लिहिते आहे; तो प्रसंग अचानक सगळ्यांवर कोसळला आहे...

यातलं काहीच खरं वाटत नाही.

कशावरच विश्वास बसत नाही.

लेखक आणि प्रकाशक यांच्यातल्या नात्याबद्दल जगातल्या सगळ्याच भाषांमध्ये अनेक किस्से-कहाण्या असतात. या नात्याचे पदर अनेकरंगी. त्यात गुंतागुंत फार. थेट काळे किंवा पांढरे असे काही नाहीच! सगळे त्याच्या अधेमधेच रेंगाळणारे. ग्रे. मराठीत तर थेट सत्यकथा-मौजेपासूनचेच सगळे संदर्भ! लेखनाला टोक आहे/नाहीचे वाद. साभार परतच्या अद्भुत आणि चमत्कारिक कहाण्या! शिवाय रॉयल्टीचे वाद. हिशेब दिल्या-न दिल्याचे झगडे.

मी गेली अनेक वर्षे या जगात वावरते आहे; पण माझ्या वाट्याला यातले काहीच आले नाही, याला कारण मेहता पब्लिशिंग हाऊस या माझ्या प्रकाशन संस्थेला सुनील मेहता या माणसाने लावलेली रोकडी शिस्त!

माझे-त्यांचे नातेही फार मजेचे होते.

प्रेम इतके की लटकी भांडणेच फार!

एकतर अनिलभाईंच्या कोल्हापूरच्या प्रेमाची सर पुण्याच्या ऑफिसला नाही ही माझी तक्रार सतत असे आणि दुसरे म्हणजे लेखक-प्रकाशक म्हणून एक्सायटिंग असे काहीच कसे घडत नाही हा वाद!

मग सुनीलभाई हसून म्हणत, 'मग आता मी काय करू? तुम्ही लिहिलेले स्क्रिप्ट साभार परत पाठवू? की तुमचे पुस्तक आठ वर्षांनी प्रसिद्ध होईल असे सांगू?'

मग नेहमीचे खळखळून हसणे.

शिवाय शेवटी नेहमीचा ठरलेला टोमणा : 'अहो, पण तुम्ही लिहा तर खरं पुढलं स्क्रिप्ट... त्याशिवाय मी कसं काय साभार परत पाठवणार ते? वरून तुम्हीच म्हणणार, की काहीच एक्सायटिंग नाही घडत. असं कसं चालेल?'

मी माझ्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांमध्ये अधिक अडकत गेले, तसतसा माझा लेखनाचा/ अनुवादाचा वेग कमी झाला याबद्दल माझ्यापेक्षाही सुनीलभाईंनाच जास्त खंत होती.

नव्या पुस्तकांचे प्रोजेक्ट घ्या हातात... 'फॉर हिअर ऑर टू गो'चा पुढचा भाग कधी करताय? परत कधी जाताय अमेरिकेत?

प्रत्येक भेटीत ते कळकळीने विचारत.

मग मी म्हणत असे, 'माझ्या घराचे इएमआय नाही संपले अजून, काम सोडून पुस्तकं लिहीत बसले तर कसं परवडणार मला ते?'

हा संवाद घडला, की ते (त्यांच्या भाषेत सांगायचं तर) मारवाडी लॉजिक मला समजावत असत. मराठी लेखक रिस्क घ्यायला तयार नसतात, ठरवलं तर उत्तम कौशल्यं असलेल्या लेखकाला आत्ताच्या काळात फक्त लेखन करून उत्तम पैसा मिळवणं सहज शक्य आहे; हे ते लॉजिक!

पुस्तक प्रकाशन हा उत्तम व्यवसाय असू शकतो आणि उगी नसत्या भावभावना, उमाळे मध्ये आणले नाहीत तर व्यावसायिक रीतीने तो नेटका निभावता येतो, ही चोख व्यावसायिक दृष्टी असलेला हाडाचा प्रकाशक म्हणजे सुनील मेहता. मी त्याच रूपात त्यांना अखंड पाहिलं. स्वत:भोवती स्वत:च आखलेल्या वर्तुळात फिरत राहण्यात समाधान (आणि अभिमानही) मानण्याची परंपरा असलेल्या मराठी प्रकाशन व्यवसायामध्ये भाषेबाहेर पडणं

तसं दुर्मिळच! सुनील मेहता या माणसाचं लक्ष देशात आणि देशाबाहेरही असे. पाश्चात्त्य प्रकाशन परंपरेतले बदल टिपणारी नजर त्यांनी कमावली होती. एवढंच नव्हे तर लेखक-प्रकाशक यांच्यातल्या नात्यामधले अकारण व्यक्तिगत गुंते काढून त्याला एक व्यावसायिक शिस्त लागली पाहिजे असा विचार करणारे, त्यापुढे जाऊन तशी कृती करणारेही ते बहुदा पहिलेच मराठी प्रकाशक असावेत!

मध्यमवर्गीय आकांक्षांमध्ये समाधान मानणाऱ्या, त्याच त्या चक्रात गोलगोल फिरत राहण्याला बौद्धिक आणि वैचारिक धुंदीचं लेबल चिटकवणाऱ्या मराठी प्रकाशन विश्वाला सुनील मेहतांचा वेग तसा न झेपणारा होता, हे खरंच!

मराठी कुणी वाचत नाही हो आता, मराठी पुस्तकं विकली जात नाहीत... अशी रडारड हा अनेकांसाठी मराठीवरच्या प्रेम-प्रदर्शनाचा आरंभबिंदू असतो. खणखणीत अपवाद म्हणजे सुनील मेहता! ते कधीही या रडारडीत सामील झालेले मी पाहिले नाहीत. ते म्हणत, माझी काहीही तक्रार नाही. माझा व्यवसाय उत्तम चालला आहे!!

प्रकाशन हे व्रत नव्हे, तो व्यवसाय आहे आणि व्यवसायाच्या शिस्तीनेच तो चालवला पाहिजे, याची पक्की जाण सुनील मेहतांनी ज्या वेगाने कमावली, त्याची कमाल वाटावी असाच वारसा त्यांना मिळाला होता. अनिलभाईंनी हा व्यवसाय उभा केला तो त्यांच्या व्यक्तिगत स्नेहाच्या जोरावर! खरंतर मराठी प्रकाशन व्यवसायात एवढं टोकाचं सोवळंओवळं. या वातावरणात एका अमराठी माणसाने येऊन आघाडीचे लेखक जोडणं, ते सांभाळणं, मैलाचा दगड ठरलेल्या अनेक साहित्यकृतींचं प्रेमाने लालनपालन करणं हे सारंच मोठं अवघड. तो जिम्मा अनिलभाईंनी अत्यंत कसोशीने आणि उत्तम निभावला. ते त्यांच्या पिढीला साजेसं, देखणंच होतं.

पण, कोल्हापूरची ही कहाणी थेट पुण्यात नेऊन रुजवणं आणि तिथे मेहता पब्लिशिंग हाऊसचं सामशज्य उभं करणं हे सुनील मेहतांनी ज्या अल्पावधीत केलं ते केवळ अनुपमेय!

त्यांच्या महत्त्वाकांक्षा जागतिक होत्या आणि त्यासाठी स्वत:ला बदलण्याची त्यांची तयारीही होती. एरवी अजूनही व्यक्तिगत रागा-लोभाच्या आधाराने उभी राहिलेली टीम हाच मराठी प्रकाशन व्यवसायाचा चेहरा आहे. सुनील मेहतांनी त्या सगळ्याच व्यवहारात व्यावसायिक शिस्त आणली.

त्यासाठीच्या रचना तयार केल्या. प्रत्येक टप्प्याची जबाबदारी उचलू शकतील अशी माणसं शोधली आणि सांभाळली.

नाशिकच्या मराठी साहित्य संमेलनात भेटलो, तेव्हा कोरोनाने गिळलेली अख्खी दोन वर्षं मागे होती. तरीही सुनीलभाईंची उमेद झाकोळलेली दिसली नाही. मेहता पब्लिशिंगने हा काळ ऑनलाइन विक्रीव्यवस्था भक्कम करण्यासाठी कसा वापरला आणि ई-बुक्सची बाजारपेठ किती वेगाने वाढली; हेच मला उत्साहाने सांगत होते.

संमेलनादरम्यान मेहता पब्लिशिंग हाऊसच्या स्टॉल्सवर त्यांनी लेखकांशी गप्पांची सत्रं आयोजित केली. या आधी हे कुणाला कधी सुचलं नव्हतं. आजूबाजूने सहज फिरत असलेले उत्सुक वाचक कोण काय बोलतंय म्हणून मेहतांच्या स्टॉल्ससमोर कितीतरी वेळ रेंगाळत उभे राहिले. या संवाद सत्रात मी उमाताई कुलकर्णींची मुलाखत घेतली होती. उमाताई फार खुलून बोलल्या, खूप मजा आली त्या संध्याकाळी. सुनीलभाई फार खूश होते. कार्यक्रम झाल्यावर आम्ही सगळेच गप्पांसाठी बराच वेळ रेंगाळलो. योजनाही होतीच सोबत. निघताना सुनीलभाईंनी मुलाखतीच्या मानधनाचं पाकीट हातात ठेवलं.

मी म्हटलं, 'हे काय?'

तर हसून म्हणाले, 'घ्या हो! तुम्ही नेहमी भांडता ना माझ्याशी की कोल्हापूरइतकं प्रेम नाही करत म्हणून... घ्या आता! ऐश करा!'

शेजारी योजना होती. ती म्हणाली, 'ऐश करण्यासाठी बहुतेक पुरणार नाही हे पाकीट...पण तरी घ्या!'

मग आम्ही सगळेच खूप हसलो!!



घरी येऊन पाहिलं, तर पाकीट चांगलंच जड होतं.

संमेलन संपलं.

निरोप घेतला.

रोज सकाळचे मेसेजेस सुरू झाले.

पुण्यात भेटायचं ठरलं, नव्या पुस्तकाची चर्चाही सुरू झाली, आणि एके दिवशी अचानक कोल्हापूरहून अरुण नाईकचा फोन, तुला कळलंय का?

मग तपशील कळला.

आणि काहीच दिवसांत जे कळायला नको होतं, तेही!

इतका वेग?

तुम्हाला इतकी कसली घाई होती, सुनीलभाई???

**– अपर्णा वेलणकर**

सुनील मेहता यांच्या निधनाचे वृत्त कळल्यावर धक्काच बसला. काहीही अनुवादाचे काम करायचे असेल, तर सुनील मेहता आहेत हा दिलासा होता. पुस्तक प्रकाशन व्यवसायात निर्णयक्षमता फार महत्त्वाची असते. ती धडाडी सुनील मेहता यांच्यात होती. कोरोना काळात सर्वत्र मरगळ असतानाही वेगवेगळ्या शक्यता आजमावत ते आपल्या पद्धतीने काम करत राहिले. आमच्यासारख्यांना उमेद देत राहिले. त्यांच्याशी अगदी वैयक्तिक ऋणानुबंध होते. वेगवेगळ्या भाषांतील साहित्य अनुवादाद्वारे मराठीत आणून त्यांनी मराठी वाचनसंस्कृतीला उठाव देण्याचा प्रयत्न केला. मेहता यांच्या निधनामुळे मराठी प्रकाशन व्यवसायाची मोठी हानी झाली आहे. अनुवादकांनी एक आधार गमावला आहे.

**– उमा कुलकर्णी**

'सुनील मेहता याचे दु:खद निधन' ही बातमी वाचून मन सुन्न झालं. सुनील सातवीत होता, तेव्हापासून मी त्याला भेटत होतो. सुट्टीत तो पुण्यात यायचा. अनिल मेहतांच्या बरोबर तो बसलेला असे. तेव्हापासून तो मला 'काका' म्हणू लागला तो अगदी कालपरवापर्यंत. मी जेव्हा त्याला यायचंय असं सांगत असे तेव्हा तो मला घेऊन जायची व्यवस्था करीत असे. मग मस्त गप्पा जमायच्या. 'पुस्तकं' हा दोघांच्या आवडीचा विषय. परदेशातून येताना आणलेलं एखादं वेगळ्या वाटेनं जाणारं पुस्तक तो मला वाचायला द्यायचा.

अनुवाद कराल का असंही विचारायचा; पण अलीकडे मात्र आमची भेट होत नव्हती. माझी प्रकृती आणि त्याची सततची कामाची गडबड, ही कारणं. बरेचदा तो गाय आळीतील जैन मंदिरात येताना मी दिसलो की आवाज देत असे. मग पाच-दहा मिनिटे मिळत.

गप्पा रंगात यायच्या. तेवढ्यात त्याचा फोन वाजायला लागे. मग तो पळत सुटे. तो पुण्यातलं ऑफिस बघू लागल्यावर आम्ही मित्र बनलो. खूप आठवणी आहेत त्याच्याबद्दल. त्याच्या कोल्हापुरी बोलण्याच्या आड एक संवेदनशील मन दडलं होतं. तो उगीच कुणाचं ऐकून घेत नसला तरी योग्य त्या बोलण्याला भरभरून दाद देत असे. त्याचा हा गुण बरेचजण दुर्लक्षित करीत. आता सुनील आपल्यात नाही. त्याच्या जाण्यानं माझ्या वैयक्तिक आयुष्यात आणि प्रकाशन क्षेत्रात भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. तो गेल्यामुळे मी एक तरुण मित्र गमावला. त्याला चिरशांती लाभो.

**– निरंजन घाटे**




रोज सकाळी गुड मॉर्निंगचा मेसेज येतो मला.

दोन सख्खे मित्रं आहेत ते, ज्यांच्याकडून असा मेसेज येतो.

आता या काळात प्रत्येक सकाळ चांगली असणं शक्य आहे का? हाच काळ कशाला? कोणत्याच काळात प्रत्येक सकाळ चांगली उगवणं हे शक्य

नाही.

पण, तरीही असा मेसेज असतो.

मग मी विचार करू लागले की सकाळ चांगली उगवली आहे की यतातथा याला महत्त्व नाही. ती कशीही असो, ती चांगली असावी ही किती शुद्ध भावना आहे.

मग त्या शुभेच्छांना माझ्याकडून शभेच्छा जातात .. सुप्रभातम्!!

कुणीतरी रोज सकाळी आपली आठवण काढून मोबाइल हातात घेऊन, whats app ओपन करून, असंख्य नंबर्समधून माझा नंबर निवडून एक शुभेच्छा टाइप करतं आणि पाठवतं...

बाई गं, तुझी रोज सकाळी मला आठवण येते आणि हे मला तुला सांगावंसं वाटतं..!!

सवय होते या मेसेजची!! अनाहूतपणे वाट बघितली जाते. उशीर झाला कधी मेसेज यायला तर मी मेसेज करते...

आत्ता ३१ डिसेंबर पासून वाट बघत्ये. शेवटी मेसेज केला.. नवं वर्ष मस्त जावो.

तरी उत्तर नाही.

परदेशी गेला की काय? रेंज नाही अशा ठिकाणी गेलाय का?

आणि समजलं.. हो.. रेंज नाही अशा परदेशी गेला आहे. कायमचा...

मि. सुनील मेहता... हे काही शोभलं नाही तुम्हाला.

हे काय वागणं झालं?

सख्ख्या नात्याने जोडलं मला.

लोक म्हणायचे की फार स्पष्टवक्ता, क्वचित कोरडा असा हा मनुष्य आहे.

पण, त्यांना तुमच्यातल्या ओलाव्यापर्यंत पोचता आलं नाही.

व्यवहारी? हो. अगदी निश्चित! असायलाच हवं, त्याशिवाय इतकं मोठं पब्लिशिंग हाऊस सांभाळता, उंचीवर नेता आलं नसतं.

मग जाताना पण पूर्ण व्यवहारी व्हायला हवं होतं ना...

भावनिकतेने कशाला जोडायचं?

ते काही मला माहीत नाही. १२ दिवस झालेत.. गुड मॉर्निंगचा मेसेज नाही आलेला...

उद्या पाठवावाच लागेल.

कसा पाठवायचा हे तुमचं तुम्ही बघा. मी वाट पाहणार आहे...

**– स्वाती चांदोरकर**

☙

अजूनही खरे वाटत नाही...

फेसबुकवर जबाबदार मंडळींच्या पोस्ट वाचल्या. सुनील मेहता आपल्यात नाहीत हे कटू वास्तव पचविणे कठीण आहे.

१९८५पासून मी मेहतांचा लेखक आहे. या दीर्घ काळात फक्त एकदाच त्यांची भेट झाली. आता पुढे होणारही नाही.

त्यांच्या स्मृतीस विनम्र आदरांजली!

**– बाबाराव मुसळे**

☙

## दूरदर्शी सुनीलभाई !

सुनीलभाई आता या जगात नाहीत हे वाचताना भवतालात दाटून आलेला काळोख अधिक गहिरा होत जातोय. वाटतंय की असं होईलच कसं? त्यांचा सकाळी न चुकता येणारा सुभाषित-सुविचाराचा व्हॉट्स ॲप मेसेज येणे काही दिवसांपासून थबकले तेव्हा शंकेची पाल मनात चुकचुकली होती; पण असंही वाटत होतं, नव्हे खात्रीच होती की आजारासमोर गुडघे टेकून हार मानणारं व्यक्तिमत्त्व नाही त्यांचं. समोर आलेल्या संकटांतून संधी शोधून परिस्थितीवर मात करणारं, पंचगंगेच्या पाण्यावर पोसलेलं धाडसी व्यक्तिमत्त्व चांगल्याच परिचयाचं असल्याने, ते लवकरच ठणठणीत बरे होतील अशी माझी खात्री होती. मेहता कुटुंबाशी दीर्घकाल संबंध असणाऱ्या माझ्यासारख्या प्रत्येकाला असंच वाटत असणार होतं, म्हणून सुनीलभाईंच्या अचानक जाण्याचा धक्का केवळ मला, माझ्या कुटुंबीयांनाच नाही, मेहता परिवाराशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जुळलेल्या प्रत्येकालाच जाणवत आहे.

मेहता परिवाराच्या दोन पिढ्यांच्या उद्योजकतेच्या काही साक्षीदारांपैकी मी एक. आज्जीचे बोट धरून 'अजब पुस्तकालय' आत्ताचे 'मेहता बुकसेलर्स'च्या पायऱ्या मोठ्या खुशीत चढणारी शाळकरी यशू मला अजूनही आठवते. ही चष्मीश मुलगी उत्तम वाचक आहे हे अनिलभाईंनी ओळखले होतेच; पण ती जेव्हा लिहू लागली तेव्हा तिच्या लिखाणाकडे कोण लक्ष देणार होते? पण अनिलभाईंनी हे पाणी ओळखले, नव्या पिढीचे लिखाणही मूल्यवान आहे, असते, हे जाणून त्यांनी माझे पहिले पुस्तक प्रकाशनासाठी

स्वीकारले. त्या काळापर्यंत त्यांनी पुण्याला स्थलांतर करून 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला मराठीतले आघाडीचे प्रकाशनगृह म्हणून नावारूपाला आणले होते. मराठी प्रकाशक संघटनाच नव्हे तर फेडरेशन ऑफ पब्लिशर्समध्येही सक्रिय होत प्रकाशन व्यवसायाला नवी दृष्टी नेण्याचे त्यांचे काम सुरू झाले होते; पण १९८६ साली जेव्हा अनिलभाईंनी 'मेहता'ची सूत्रे सुनीलभाईंकडे सोपवली तेव्हा त्यांनी ज्या झपाट्याने कामाला सुरुवात केली ती अचंबित करणारी होती. या टप्प्यावर जागतिकीकरणाचे वारे भारताच्या दिशेने वाहू लागले होते, माहिती तंत्रज्ञानाची लाट येऊन आदळली की बदललेल्या अस्थिर, अनिश्चित, जटिल आणि अस्पष्टतेच्या वातावरणात प्रकाशन व्यवसाय पूर्वीसारखा 'फॅमिली मॅनेज्ड बिझनेस' राहू शकणार नाही, 'स्किल डेव्हलपमेन्ट', 'इनोव्हेशन' आणि 'लीडरशिप' या संकल्पना आत्मसात करून, टिकून राहण्यासाठी आणि भविष्यकालीन प्रगतीसाठी दीर्घकालीन रणनीती आखावी लागेल हे या तरुण प्रकाशकाने बरोब्बर हेरले आणि 'मेहता'चा कायापालट करायला सुरुवात केली. नव्या सहस्त्रकाचा उदय होते वेळी वायटूकेच्या भीतीने सगळ्याच उद्योग-व्यवसायांना थबकावे लागले; पण सुनीलभाईंच्या नेतृत्वाखालील 'मेहता'ने झपाट्याने नवे रूप घेतले, त्यात येणारे विषय आणि आशय बदलत गेले. कानाला हेडफोन आणि डोळ्यांसमोर टॅब-सेलफोन असणाऱ्या, आभासी जगात गतिमान जगणाऱ्या जनरेशन वाया पिढीला हवे असणारे विषय प्रकाशनात आणले गेले, शिवाय २०१३ पासून ते ई-बुक आणि किंडल फॉरमॅटमध्ये उपलब्ध करून दिले गेले. 'प्रॉडक्ट डायव्हर्सिफिकेशन'च्या अनेक भन्नाट कल्पना सुनीलभाईंनी राबवल्या. त्यामुळे पुस्तकांची अंतर्बाह्य रूपे, छपाई, बांधणी, मुखपृष्ठे, एवढेच काय पुस्तकांचे पॅकेजिंग देखील बदलत गेले. अनेक देशी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या दिग्गज प्रकाशन संस्थांशी नातेसंबंध जोडल्यामुळे मराठीतील दर्जेदार पुस्तकांसोबत विविध भारतीय भाषिक तसेच पाश्चात्त्य साहित्याचे अनुवाद मराठीत आणणाऱ्या 'मेहता'चे रूपरंग अंतर्बाह्य बदलत गेले. 'मेहता'ची प्रतिमा केवळ मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता तिला आंतरराष्ट्रीय ओळख प्राप्त होत गेली. 'मेहता'चे बस्तान स्वतःच्या मालकीच्या, 'स्टेट-ऑफ-द-आर्ट' इमारतीत हलवणे हा देखील सुनीलभाईंच्या आपल्या प्रकाशनगृहाची ग्लोबल प्रतिमा प्रस्थापित करण्याच्या योजनेचा भाग होता. याच काळात माझी 'बंजाऱ्यांचे

घर’, ‘थर्ड पर्सन’ आणि ‘प्रवास पर्यटनाचे नवे पैलू’ ही पुस्तके प्रकाशित होत होती. तेव्हा या नव्या ऑफिसात बऱ्याच भेटीगाठी होत गेल्या. तेव्हा आपण या अत्याधुनिक अवकाशाचा भाग आहोत हे जाणवून मन अभिमानाने भरून येई; पण हा बदल केवळ भौतिक नसून ‘मेहता’चे अंतरंगही बदलले आहे, आता मलाही ‘मेहता’बरोबर व्यावसायिक दृष्टिकोनातूनच काम करावे लागेल हेही लक्षात येत गेले.

सुनीलभाईंनी व्यवस्थापनाचे कोणतेही औपचारिक शिक्षण वा ट्रेनिंग घेतलेले नव्हते; तरी त्यांनी ‘मेहता’मध्ये आधुनिक व्यवस्थापनाचे आणि तंत्रज्ञानाचे आयाम रुजवत एक ग्लोबल दृष्टिकोन असणारा यशस्वी व्यवसाय म्हणून एका उंचीवर नेले आणि स्पर्धा असून, पायरसी, डुप्लिकेट बुक माफियाच्या काळातही आपली आघाडी दीर्घकाळ टिकवली याचे मला वाटणारे आश्चर्य पुढे नाहीसे होते गेले. याचे कारण त्यांचे काळाची पावले ओळखण्याचे कौशल्य, मेहनत, चिकाटी आणि धाडस हे तर होतेच; पण लेखक, प्रकाशक, वितरक, शिक्षणसंस्था, देशोदेशीच्या विविध स्तरातल्या, विविध वयाच्या वाचकांच्या शृंखला बांधण्याचे कौशल्य होते.

बारा हजार किलोमीटर चालण्याचे धाडस करणाऱ्या पॉला कॉन्स्टन्ट या ऑस्ट्रेलियन लेखिकेच्या ‘स्लो जर्नी साउथ’ आणि वाळवंटातल्या पायपिटीच्या अनुभवांच्या ‘सहारा’ या पुस्तकांच्या सार्क देशांसाठी आवृत्त्या काढण्याचे ‘मेहता’ने हाती घेतले. कुठलेही पाठबळ नसताना एका तरुण मुलीने आशावाद, हिंमत आणि कणखरपणाच्या जोरावर केलेल्या अत्यंत खडतर प्रवासाचे हे चित्रण होते. प्रकाशनासाठी पॉला जेव्हा भारतात आली तेव्हा सुनीलभाईंनी तिला मुद्दाम मी कार्यरत असलेल्या वेलिंगकर इन्स्टिट्यूटमध्ये पाठवले. तिची जगावेगळी कहाणी ऐकताना एमबीएचे विद्यार्थी भारावून गेले होते. आजच्या अस्थिर सामाजिक-राजकीय-आर्थिक आव्हानांचा मुकाबला करत ज्यांना आपलं करिअर घडवायचं आहे, अशा युवा पिढीसमोर तिचा प्रत्येक शब्द वर्गात शिकलेल्या व्यवस्थापनविषयक तत्त्वांचा जणू व्यावहारिक वस्तुपाठ बनून उलगडत होता. वाळवंटी मोहिमेत तावूनसुलाखून निघालेल्या पॉलाची चतु:सूत्री त्यांना पुढील वाटचालीसाठी मूलमंत्र देऊन गेली. पुढे माझ्या मराठवाड्यातल्या ग्रामीण महिलांच्या उद्योजकांच्या कहाण्या मांडणाऱ्या ‘स्वयम् शिक्षित स्वयम् प्रकाशित’ या पुस्तकाच्या प्रती सुनीलभाईंनी मागवून घेतल्या आणि मुंबईतल्या अमेरिकन

लायब्ररीत पोहोचवल्या. हे पुस्तक ‘मेहता’चे नाही असा विचार न करता, लायब्ररीला गरज असलेले पुस्तक आपण योग्य वाचकांपर्यंत पोहोचवले पाहिजे हा विचार त्यांनी केला. असे पूल बांधत जाण्याचे डिझाइनिंग हे त्यांच्या यशाचे खरे गमक होते.

सुनीलभाईंची कारकीर्द पाहताना मला जाणवते ते हे की हा माणूस उद्योजकतेचे बाळकडू घेऊनच आला होता. नोटाबंदीमुळे प्रकाशन व्यवसायाला मंदी आलेल्या काळात सुनीलभाईंनी तरुणाईसमोर या व्यवसायाचे सकारात्मक चित्र रेखाटून, त्यांना या क्षेत्रातल्या करिअरचा मूलमंत्र दिला. दिशा दाखवली, पाठोपाठ कोविडच्या लाटेच्या बिकट काळात ‘मेहता’चे कामही काहीसे थंडावले; पण थोडी मोकळीक मिळताच अभिजित कुलकर्णींचे ‘रेड टेप’, विश्वास नांगरे पाटील यांचे ‘कर हर मैदान फ़तेह’, विश्वास पाटील यांचे ‘गाभुळलेल्या चंद्रबनात’, ‘अण्णा भाऊ साठे यांची ‘दर्दभरी दास्तान’, माझी ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव’ (व्यक्तिचित्रणात्मक) आणि ‘कमबख्त निंदर’ या ज्येष्ठ हिन्दी साहित्यिक डॉ. नरेंद्र मोहन यांच्या आत्मकथेचा अनुवाद अशी वैविध्यपूर्ण पुस्तके वाचकांच्या भेटीला येत गेली. त्यांनी माझी दोन्ही पुस्तके मी गोव्याला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी (इफ्फी) उपस्थित असताना तिकडे पोहोचवून देत सुखद धक्का दिला. त्यामुळे तेवढ्या अल्प अवधीतही ‘इफ्फी’च्या व्यासपीठावर गोवा एन्टरटेनमेन्ट सोसायटीचे अध्यक्ष श्री. सुभाष फळदेसाई यांच्या हस्ते ‘अपूर्व, अलौकिक...’चे प्रकाशन करता आले. ‘वाचन जागर’च्या माध्यमातून मराठी प्रकाशकांनी संघटित होऊन प्रत्येकी २५ पुस्तके २५ टक्के सवलतीत ठिकठिकाणच्या आउटलेट्‌समधून वाचकांपर्यंत पोहोचवली, त्यातही मेहता आघाडीवर होते. नाशिकमध्ये पार पडलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांनी ‘मेहता साहित्योत्सव’चा अभिनव प्रयोग राबवला. इथेही फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून प्रसारण केल्याने माझ्यासारख्या घरात अडकून पडलेल्या अगणित वाचकांना त्याचा आनंद घेता आला. या अभिनव प्रयोगाची चांगलीच चर्चा झाली; पण असा सवता सुभा उभारल्यामुळे टीकेचे धनी व्हावे लागले. सुनीलभाईंनी त्यालाही ठणकावून उत्तर दिले.

मुळात मेहता परिवारात उद्योजकता चांगली रुजलेली होती, तो वारसा सुनीलभाईंकडे आला हे खरे आहे; पण वारसा असा मागून मिळत नसतो,

तसा तो आपसूक मिळाला तर पुढची पिढी खुरटी निघते, बरबादही होते; ते आपण प्रत्यक्षही बघत आहोत. वारसा मिळवावा लागतो, त्यासाठी स्वतःला तयार करावे लागते, स्वतःला अनेकदा अंतर्बाह्य मोड-तोडावे लागते, नव्याने घडवायलाही लागते, असे तावूनसुलाखून निघाल्यानंतरच वारसा मिळायला लायक होता येते, याची सुनीलभाईंना मनोमन जाण होती; कारण ते त्या अनुषंगाने अथक वाटचाल करत यशाची शिखरे सर करत गेलेले दिसतात. 'आपण मराठी प्रकाशन व्यवसायात आपलं वेगळं स्थान निर्माण करायला हवं, असं ध्येय ठेवून मी माझा व्यवसाय वाढवत गेलो. आजसुद्धा मी कुठल्याही प्रकाशकाला माझा स्पर्धक मानत नाही. आपण स्वतःशीच स्पर्धा केली तर आपल्याला आपली पुस्तकं, आपला कन्टेन्ट अधिक चांगला करता येतो' असं ते म्हणत. 'आता माझी स्पर्धा माझ्याशीच' असे मानणारे हे व्यक्तिमत्त्व किती योजना मनात ठेवून असे अचानक काळाच्या पडद्याआड गेले! आता त्यांचे मनसुबे पूर्ण करण्यासाठी अखिल आणि साहिल या 'मेहता'च्या तिसऱ्या पिढीचे हात बळकट करणे हीच आम्हा सर्वांकडून त्यांना श्रद्धांजली ठरेल.

**– यशोधरा काटकर**



अल्पशा आजाराचे निमित्त साधून नियतीने त्यांना यमसदनी धाडण्याचा डाव अनाकलनीयच! संसाराच्या सारिपाटावरून एका दिलदार साथीदाराला हटवून अर्ध्यावर डाव उधळून नियतीने नेमके काय साधले? त्यांच्या अशा अकाली, अकल्पित, कायमच्या काळाच्या पडद्याआड विसावण्याने आपल्यावर, आपल्या परिवारावर ओढवलेल्या असीम शोकात आम्ही आमटे व आनंदवन परिवार सहभागी आहोत. पुत्राचा वियोग तोही या वयात आपल्या वाट्याला यावा, यासारखे दु:ख नाही!

अक्राळविक्राळ काळाने आपल्यावर, आपल्या परिवारावर केलेला हा वज्राघात केवळ असह्य...

प्रकाशन व्यवसायात सातत्याने नवे प्रयोग करणारे, मराठीतील दिग्गज साहित्यिकांच्या बरोबरीने विविध भाषांतील साहित्य मराठीत आणण्याचे महत्त्वाचे काम करणारे... मराठी वाचकांना समृद्ध साहित्य उपलब्ध करून देणारे आज आपल्यात नाहीत. त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवत राहील.

अखेर आपण सारे नियतीच्या अधीन!

तिच्या मनाचा थांगपत्ता कुणालाच लागलेला नाही, ती तो लागूही देणार नाही. सांत्वनाचे चार शुष्क अश्रू ढाळण्याव्यतिरिक्त आपण काहीही करू शकत नाही याचे मनस्वी दु:ख होते.

त्यांच्या पवित्र आत्म्यास शांती व सद्‌गती लाभो. ओढवलेल्या दु:खातून बाहेर पडण्याचे बळ आपणाला मिळो, ही प्रार्थना...!

आपले शुभाकांक्षी,

**– डॉ. विकास आमटे**

## लेखक घडविणारा प्रकाशक

वर्तमानपत्रात श्री. सुनील मेहता यांच्या निधनाची बातमी वाचली. ती खरीच वाटेना म्हणून पुन्हा पुन्हा वाचली. धक्काच बसला. १९९७पासूनचा कालखंड डोळ्यांपुढून सरकला. त्या वर्षी आमची पहिली भेट झाली होती. माझ्या पुस्तकांचे प्रकाशक म्हणून तोपर्यंत आम्ही प्रत्यक्ष भेटलो नव्हतो. सर्व व्यवहार पत्राद्वारेच होत होता. माझे विज्ञानविषयक पहिले पुस्तक 'वैज्ञानिक खेळणी' त्यांनीच प्रकाशित केलं व मी लेखक झालो. आत्तापर्यंत मी बरीच पुस्तकं लिहिली. इतर भाषांतील विज्ञानविषयक पुस्तके मला संदर्भाकरिता विनामूल्य पाठविली व लिहिण्यास प्रोत्साहित केले. माझी पुस्तके गुजराती

भाषेत त्यांच्यामुळेच अनुवादित झाली आहेत. हे त्यांचे माझ्यावर उपकारच आहेत जे मी फेडू शकत नाही. लेखक लिहितात व प्रकाशक प्रकाशित करतात, हे जरी खरे असले तरी एखाद्या व्यक्तीला लेखक म्हणून प्रसिद्धीला आणणारे श्री. सुनील मेहता यांच्यासारखे प्रकाशक विरळाच. म्हणून मी श्री. सुनील मेहता यांना 'लेखक घडविणारे प्रकाशक' असे म्हणणे योग्य ठरेल.

त्यांच्या अकाली जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांवर, कर्मचाऱ्यांवर, आमच्यासारख्या लेखकांवर, मित्रमंडळींवर, नातेवाइकांवर जो दु:खाचा डोंगर कोसळला आहे त्यात मी सहभागी आहे.

**– डी. एस. इटोकर**

॥

**कोल्हापूरचं प्रकाशन विश्व अन् सुनील मेहता!**

प्रकाशनविश्व आणि येथील मेहता पब्लिशिंग हाऊस हे एक अतूट समीकरण. अनेक नावीन्यपूर्ण संकल्पना या क्षेत्रात मेहता पब्लिशिंग हाऊसने आणल्या आणि त्या यशस्वी केल्या. सुनील मेहता यांच्या निधनानंतर या साऱ्या आठवणींना उजाळा मिळाला. मराठीतील दिग्गज लेखकांचे साहित्य दर्जेदार रूपात मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुनील मेहता यांनी केले. रणजित देसाई यांची साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'स्वामी' ही कादंबरी 'मेहता'नेच प्रकाशित केली. मेहता आणि देसाई परिवार हा तसा एकच होता.

**– मधुमती शिंदे** (रणजित देसाई यांची कन्या)

॥

**महत्त्वाकांक्षी व मनस्वी माणूस!**

सुनीलजी आता आपल्यामध्ये नाहीत, यावर विश्वास ठेवायला अजूनही मन तयार होत नाही. ते असल्याच्या अनेक खुणा मला दिसतायंत. मग त्यांचं नसणं, स्वीकारायचं तरी कसं?

काही दिवसांपूर्वीच मिळालेला ग्रंथजगतचा डिसेंबर महिन्याचा ताजा अंक अजून पुरता वाचूनही झालेला नाही. त्याचं संपादकीय तर स्वत: सुनीलजींनीच लिहिलंय. आपल्या नेहमीच्या उत्साहाने त्यात त्यांनी आपल्या आगामी उपक्रमांची यादीच दिलीय आणि आशेचे नवे किरण घेऊन येणारा काळ आपली वाट प्रकाशमान करो, असं म्हणत आपल्या प्रिय वाचकांना त्यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या सर्वांची वाट प्रकाशमान

करो, अशी सदिच्छा व्यक्त करणारा हा प्रसन्नमुख प्रकाशक सर्वांना गाफिल ठेवून अचानक अंधाराची वाट पकडून नाहीसा होतो, यावर विश्वास तरी कसा ठेवायचा?

सुनीलजींच्या सग्यासोयऱ्यांना आणि सुहृदांना हा आघात सहन करणं अशक्य आहे. २००९मध्ये एका मित्राने माझी सुनीलजींशी ओळख करून दिली. तोपर्यंत मी फक्त नाट्य-चित्रपट क्षेत्राशी जोडलेला होतो. माझी लेखनाची पार्श्वभूमी ऐकून त्या पहिल्याच भेटीत त्यांनी माझ्या हातात करेन रोझची 'स्क्रीम फॉर मी' ही कादंबरी ठेवली. अनुवादाचं क्षेत्र मला बरीच वर्षं खुणावत होतं. मिळालेली संधी मी आनंदाने स्वीकारली आणि त्या क्षणापासून सुनीलजींनी मला मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारात सामील करून घेतलं.

ख्रिस्तोफर रिचच्या 'रुल्स ऑफ डिसेप्शन्स'या कादंबरीच्या मी त्यानंतर केलेल्या अनुवादाला चांगलाच प्रतिसाद मिळाल्याचं मला समजलं आणि त्याच काळात एके दिवशी सकाळीच मला सुनीलजींचा फोन आला. 'आपल्याला सचिन तेंडुलकरांनी लिहिलेल्या 'प्लेइंग इट माय वे' या आत्मचरित्राच्या अनुवादाचे हक्क मिळाले आहेत आणि तो अनुवाद तुम्ही करायचाय.' मी अक्षरश: थरारून गेलो. क्रिकेटवेडा तर मी होतोच आणि सचिन हा खेळाडू आणि माणूस म्हणून मला परमप्रिय होता; पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे एवढ्या मोठ्या माणसाच्या आत्मचरित्राचा अनुवाद करायचं अवघड काम सुनीलजींनी माझ्यावर सोपवलं, हा मला माझा सन्मान तर वाटलाच आणि सुनीलजींनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल सानंद आश्चर्यही वाटलं.

कमी वेळात अनुवाद पूर्ण करायचा होता. मी उत्साहाने सुरुवात केली; पण क्रिकेटच्या सामन्याप्रमाणे मध्येच एक हुलकावणी देऊन विजयाची संधी हातातून निसटते की काय, अशी वेळ आपल्यावर प्रत्यक्षात येणार आहे, याची त्या वेळी मला जराही कल्पना नव्हती.

पुस्तकाचा अर्ध्याहून अधिक अनुवाद पूर्ण झाला होता आणि अचानक सुनीलजींचा फोन आला, 'आपल्याला अनुवादाचं काम थांबवावं लागणार.' बोलताना त्यांचा आवाज जड झाला होता. 'तेंडुलकरांच्या ऑफिसमधून निरोप आलाय. आपण आत्तापर्यंत केलेला अनुवाद त्यांना तपासून पाहायचाय आणि त्यांना तो आवडला तरच ते आपल्याला परवानगी देणार,

नाहीतर ते त्यांच्या पसंतीचा अनुवादक निवडणार.'

'मग आता... काय करायचं?' मी कमालीचा निराश झालो होतो.

'तुम्ही बिलकूल टेन्शन घेऊ नका. मी त्यांना ठामपणे सांगितलं आहे की सचिनजींच्या पुस्तकाचा अनुवाद करण्यासाठी मी विचारपूर्वक माणूस निवडलाय आणि कोणत्याही परिस्थितीत मी तो आता बदलणार नाही.'

सुनीलजींच्या या शब्दांनी मला धीर तर आलाच; पण एवढं महत्त्वाचं, स्वत:च्या प्रकाशन संस्थेसाठी भूषणावह ठरणारं आणि मोठा आर्थिक फायदा मिळवून देण्याची शक्यता असणारं पुस्तक, हातातून जाऊ शकेल याची किंचितही पर्वा न करता ते माझ्या बाजूने ठाम उभे राहिले, हे पाहून माझ्या मनातील त्यांच्याबद्दलचा आदर शतपटीने वाढला.

पुढे सर्व गैरसमज दूर झाले. पुस्तक झोकात प्रकाशित झालं आणि आज मेहता पब्लिशिंग हाऊसच्या बेस्ट सेलर यादीत त्याचा समावेश आहे. या सर्वाचं मुख्य श्रेय सुनीलजींचं आहे.

सुनीलजी महत्त्वाकांक्षी होते हे बऱ्याच जणांना ठाऊक होतं; पण ते तितकेच मनस्वी होते हे मात्र फक्त त्यांचा सहवास लाभलेल्यांनीच अनुभवलं आहे. अनिलजी मेहतांनी घट्ट रुजवलेल्या रोपाचा वेलू गगनावेरी नेण्याचं स्वप्न सुनीलजींनी पाहिलं आणि बऱ्याच प्रमाणात ते प्रत्यक्षातही आणलं. फक्त खंत एवढीच वाटते की, मराठी प्रकाशन व्यवसायाला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचं त्यांचं स्वप्न काहीसं अधुरं राहिलं. माझ्या प्रकाशन संस्थेचं नाव मी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' असं मुद्दाम इंग्रजी पद्धतीचं ठेवलं; कारण मला मराठी प्रकाशनाचा परिघ खूप विस्तारित करायचा होता, असं अनिलजींनी एका लेखात लिहिलं होतं. सुनीलजींचीही वाटचाल त्याच दिशेने चालू होती; पण अचानक अघटित घडलं. विपरीत परिस्थितीतही खचून जाणं, निराश होणं, हे सुनीलजींना कधीच रुचलं नसतं. मला खात्री आहे की त्यांच्याच तालमीत तयार झालेला त्यांचा सुपुत्र अखिल हा आपल्या पित्याचं अधुरं राहिलेलं स्वप्न नक्कीच पूर्ण करेल.

सुनीलजींना भावपूर्ण आदरांजली!

**– दीपक कुळकर्णी**

☙

इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद आणि मेहता पब्लिशिंग हाऊस हे समीकरण स्वतःची पुस्तक खरेदी सुरू केली त्या वयापासून पक्के होते. घरात आणि

शाळेत इंग्रजी भाषेशी फारसा घरोबा नसल्याने मराठी पुस्तकांकडे जास्त कल असणे स्वाभाविक होते. हिंदी पण वाचायला आवडायचे; पण मग हळूहळू इंग्रजीचे आकर्षण वाढू लागले आणि थेट इंग्रजी साहित्य समजणे एकदम शक्य नाही, अशा वेळी अनुवादित पुस्तकांची ओळख झाली आणि मेहता पब्लिशिंग हे नाव पण त्याचसोबत परिचयाचे झाले. तेव्हा अजिबात कल्पना नव्हती की एक दिवस या प्रकाशन संस्थेसाठी काम करण्याची संधी आपल्याला मिळेल.

काल मेहता मराठी ग्रंथजगतचा जानेवारीचा अंक हाती आला आणि त्यात माझ्या नवीन अनुवादित पुस्तकाची जाहिरात दिसली; पण जाहिरात आली तरी मला का कळवले गेले नाही, याचे आश्चर्य वाटले. हा शिरस्ता नाहीच मेहतांचा! पुस्तक प्रकाशित झाल्याचा फोन, मग कॉपी पाठवल्याचा फोन, हे ठरलेले असताना असे का झाले? चौकशी केली आणि ही दुःखद बातमी कळली.

सुनील मेहता गेले.

गेल्या दहा वर्षांत मला त्यांना भेटण्याची संधी नाही मिळाली; कारण पहिली दोन पुस्तके झाली आणि तिसरे सुरू असताना मी आजारी झाले. आजारपण गंभीर असल्याने मी जवळपास एक वर्ष नवीन काम हाती घेऊ शकले नाही. आणि त्यामुळे मला कधी कार्यालयात जाण्याचीही गरज पडली नाही. पुस्तक प्रकाशित झाल्याशिवाय कामाचा मोबदला सहसा मिळत नाही इथे, असे सांगणारे खूप लोक होते; पण माझ्या आजारपणात मला आर्थिक मदत होऊ शकते, हे त्यांना एका वरिष्ठ व सन्माननीय लेखकांनी कळवल्यावर मी केलेल्या अनुवादाच्या कामाचे मला आधीच पैसे देण्यात आले. त्यासाठीही मला कधी मेहता पब्लिशिंगला खेटे घालावे लागले नाही.

डायलिसिसवर असताना मला कुठल्याही क्षणी ट्रान्सप्लान्टसाठी कॉल येऊ शकतो आणि मग मला काम अर्धवट सोडावे लागू शकते, असे असतानाही मला अनुवादाचे काम मेहतांकडून मिळत गेले. मी ते केले आणि त्यासाठी सुनील मेहता यांनी स्वतः फोन करून आभार मानले होते. माझ्या ट्रान्सप्लान्टनंतर फोन करून त्यांनी तब्येतीची नीट चौकशी केली होती आणि तेव्हा आमच्या खऱ्या गप्पा झाल्या होत्या; पण प्रत्यक्ष भेट कधी झाली नाही. आता ती कधी होणार नाही, ही बोच राहील मनात.

भैरप्पा, तस्लिमा नासरिन, जेफ्री आर्चर, सुधा मूर्ती यांच्या पुस्तकांचे

अनुवाद असोत किंवा मग लीना सोहोनींसारख्या सिद्धहस्त अनुवादक असोत, मेहतांच्या प्रकाशन संस्थेतून खूप काही नवनवीन मिळत राहिले आहे; कारण नवनवे प्रयोग प्रकाशनाच्या व्यवसायात आणण्यासाठी मेहता यांची धडपड होती. आज मराठी भाषेतील अनेक बेस्ट सेलर किंडलसारख्या व्यासपीठावर पोचवण्यात त्यांचे मोठे योगदान होते. व्यक्तिगत स्तरावर मला अनुवादाच्या कामातून माझ्या आजारपणाच्या अतिशय कठीण काळात सतत उमेद मिळत राहिली आणि ते काम मला न मागताही मेहता पब्लिशिंग हाऊसकडून मिळत राहिले. त्यासाठी मी या संस्थेची कायम ऋणी आहे आणि मेहता यांचीही.

काल प्रकाशित झालेले पुस्तक हे माझ्या ट्रान्सप्लान्टनंतर मी केले होते.

सर, हे तुम्हाला समर्पित!

**– वर्षा वेलणकर**

मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांचे अचानक जाणे हा मराठी प्रकाशन व्यवसायाला मोठाच धक्का आहे. मराठीतील महत्त्वाच्या प्रकाशकांपैकी ते एक होते. बाबांची (रत्नाकर मतकरी) अनेक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. वाचकांना काय हवे आहे आणि ते त्यांच्यापर्यंत कसे पोहोचवता येईल याची त्यांना अचूक जाण होती. मराठी पुस्तकांची पायरसी कशी थांबवता येईल याबद्दल त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरू होते. प्रकाशन व्यवसायाला अतिशय गांभीर्याने घेणारा, सक्रिय असलेला प्रकाशक अकाली आपल्यातून निघून जाणे दुर्दैवी आहे.

**– गणेश मतकरी**

काय लिहावे कळत नाहीये. सुनील मेहता यांच्या अकाली व अचानक निधनाचे वृत्त ऐकून मला अत्यंत आश्चर्य व दु:ख वाटले. सुनील मेहता हे नाव संपूर्ण प्रकाशन क्षेत्रात सन्मानाने प्रख्यात होते. तुमच्यासारख्या अनुभवी प्रकाशक पित्याचा उज्ज्वल वारसा त्यांना मिळाला होता. आणि त्या संधीचं त्यांनी सोनं केलं होतं. जैन समाजाला अभिमान वाटण्यासारखेच त्यांचे कर्तृत्व होते.

'मेहता पब्लिशिंग हाऊस' हे नाव सुवर्णाक्षराने अंकित करण्याजोगे आहे ते आपले मार्गदर्शन, या क्षेत्रातला वारसा आणि स्वयंभू कर्तृत्वामुळेच.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने प्रकाशित केलेली पुस्तके साहित्य,

गुणवत्तापूर्ण व देखणी असतात याचे श्रेय सुनील मेहतांनाच आहे, याची पूर्ण जाणीव मला आहे. एखादा तेजस्वी तारा स्वतेजाने झळकत असतानाच निखळावा तसे घडले. कधीही भरून न येणारी हानी त्यांच्या निधनाने झाली आहे. त्यांनी काढलेली दर्जेदार शेकडो पुस्तके त्यांची स्मृती चिरंतन ठेवतील.

**– सुरेखा शहा**

ஐ

सुनीलविषयीची वार्ता आजारी व अकस्मात गेल्याची एकदमच आल्या. तेव्हापासून सुन्न, बधिर झालो आहोत. सुनील माझा प्रकाशक कधीच नव्हता. तो होता आमचा भाचा. गोव्यात आल्यावर आवर्जून भेटणारा. रागाचा, गोड आणि आर्जवी शब्दांनी निचरा करणारा. व्यवसायाच्या मर्यादा सांभाळून आपलेपण जपणारा आत्मीय आणि प्रत्येक वाढदिवसाला आठवणीने शुभेच्छा देणारा सुनील...

आमची अवस्था सैरभैर झाली आहे तर तुम्हावर तर... आम्ही केवळ कल्पनेने कासावीस होत आहोत. दु:ख आणि जबाबदारीचे ओझे तुमच्यावर टाकणाऱ्या दैवाला काय म्हणावे तेच उमजेना. दूरदर्शनच्या वाहिनीवर बातमी पाहिल्यापासून अस्वस्थ आहोत.

शब्द फोल आणि फुकाचे आहेत, तरी म्हणतो दु:ख मागे टाका; कारण आपण पराधीन व समोर येईल ते स्वीकारण्यापलीकडे काहीच करू शकत नाही. त्यांच्या व्यवसायात अननुभवी नातवाला तयार करण्याची जबाबदारीही



आहेच. या साऱ्याला तुम्ही समर्थपणे तोंड द्याल असा मला विश्वास आहे. दैवाच्या परीक्षेला उतरालच; पण तुमच्यासारखाच एक समदु:खी म्हणून हा पत्रप्रपंच.

**– शरद दळवी**

ॐ

मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांचं आकस्मिक निधन झाल्याचं कळलं आणि एक कुटुंबीय गेल्याइतकं दुःख झालं. २००३ पासून मेहतांच्या शंभराहून अधिक पुस्तकांचं संपादन करताना सुनील मेहता यांच्याशी जवळून संबंध आला. माझ्या कामानिमित्त मी अनेकदा मेहता पब्लिशिंगच्या ऑफिसमध्ये जात असले तरी त्यांच्याशी दरवेळी भेटणं, बोलणं व्हायचंच असं नाही; पण जेव्हा गरज लागायची तेव्हा त्यांचं आश्वासक बोलणं आधार देणारं असायचं. पुस्तकाच्या संहिता संपादनाची गरज ओळखून संपादकाला पुरेसं स्वातंत्र्य आणि त्याच्या कामाचा योग्य तो आर्थिक मोबदला देणाऱ्या मोजक्या प्रकाशकांमध्ये सुनील मेहता यांचं नाव सर्वांत वरचं होतं. माझ्या अठरा वर्षांच्या मेहता पब्लिशिंगसाठी केलेल्या कामात एकही कटू अनुभव नाही, ही गोष्ट विशेष नोंद घेण्याजोगी आहे.



किंबहुना, संपादकाने केलेल्या बदलाबाबत ठाम राहून पुस्तकाच्या दर्जाबाबत आग्रही राहणाऱ्या सुनील सरांचा कायम आधार वाटायचा. दोन-तीन प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांत मी केलेले बदल करायला लेखकाने नकार दिल्यावर आमच्या संपादकांचं तुम्हाला ऐकायला लागेल, असं ठामपणे सांगून त्यांनी माझा आत्मविश्वास वाढवला आहे.

पुस्तकनिर्मिती आणि पुस्तकविक्री यात सातत्याने नवनवे प्रयोग करून, संपूर्ण व्यावसायिक पद्धतीने मराठी पुस्तके महाराष्ट्रभर पोहोचवण्याचा सुनील मेहता यांचा ध्यास खरोखरच प्रेरणादायी होता. नुकत्याच झालेल्या नाशिकच्या साहित्य संमेलनात त्यांनी केलेले विविध कार्यक्रम त्यांच्या व्यावसायिक कल्पकतेची साक्ष आहेत. अजून खूप काही करू शकण्याची क्षमता असताना त्यांनी अशी अकाली exit घेणं हे खूपच धक्कादायक आहे. श्रद्धांजली वाहतानाही हात थरथरतोय. Thank you for everything, Sunil Mehta.

**– संजीवनी शिंत्रे**

वर्तमानपत्रात सुनील मेहता गेल्याची दु:खद बातमी वाचली. त्यांच्या अकाली जाण्याने कुटुंबावर केवढा आघात झाला असेल याची कल्पना करणंही कठीण. मेहता प्रकाशन हाही त्यांचा परिवारच. तुमच्या सर्वांच्या दु:खात मी सहभागी आहे.

**– शोभा चित्रे**

मेहता कुटुंबीयांना अशोक पाध्ये कुटुंबीयांकडून नमस्कार.

श्री सुनील मेहता यांच्या निधनाची धक्कादायक बातमी कळली. प्रथम विश्वासच बसला नाही.

श्री अशोक पाध्ये आणि श्री सुनील मेहता यांचे जमलेले ट्यूनिंग अशोक पाध्ये यांना लिखाणाच्या दृष्टीने आनंददायी ठरलेच पण वाचकांनाही वेगळे वाचनानुभव देऊन गेले. अचूक पुस्तके निवडून योग्य व्यक्तीला लिखाणासाठी देणे हे मेहता यांचे कौशल्य!

केवळ अनुवादितच नव्हेत तर दिग्गजांची पुस्तके पुनर्मुद्रित करून नवीन वाचकांना उत्तम साहित्याचा ठेवा श्री सुनील मेहता यांनी भेट दिला.

टी बुक क्लब, ई-बुक अशा नव्या, काळाला सुसंगत धाडसी कल्पना

राबवून श्री सुनील मेहता यांनी मराठी वाचकाला वाचनाकडे बांधून ठेवले.

असे धाडसी, उमदे व्यक्तिमत्त्व जाण्याने वाचकांची हानी झाली आहे.

आपल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**–अशोक पाध्ये कुटुंबिय**

ơ3

## आता राहिल्या केवळ आठवणी...

सुनील मेहता सरांचा आणि माझा ऋणानुबंध अनुवादापासून सुरू झाला. तो अखेरपर्यंत कायम राहिला. जगभरातील पुस्तके मराठीत आणण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. मेहता प्रकाशनाने एकापेक्षा एक अशी सकस, दर्जेदार मराठी पुस्तके निर्माण करून मराठी साहित्य समृद्ध केले. त्यामध्ये मेहता सरांचा नक्कीच मोठा वाटा होता.

पुढे मी लोकपालच्या लढ्यावर त्यांच्यासाठी स्वतंत्र पुस्तक लिहिले. त्यावेळी त्यांच्याशी विविध विषयांवर भरपूर चर्चा झाली. आज मेहता सरांविषयी अनेक आठवणी मनात येत आहेत. त्यातली एक माझ्या मनात कायम घर करून राहिली आहे. मेहता प्रकाशन पुस्तक प्रकाशनाचे फारसे जाहीर कार्यक्रम करत नाही. त्यापेक्षा सतत नवनवी पुस्तके मराठी वाचकांपुढे शांतपणे सादर करण्यावर त्यांचा भर असतो; मात्र माझ्या पुस्तकाचे मोठ्या स्वरूपात प्रकाशन करावे अशी स्वतः मेहता सरांचीच इच्छा होती. त्यांनी मला तसे सांगितले आणि २०१४मध्ये पुण्यात माझ्या पुस्तक प्रकाशनाचा दिमाखदार कार्यक्रम केला. त्यातील प्रत्येक बाबींची म्हणजे पाहुणे ठरवण्यापासून ते ठिकाण ठरवण्यापर्यंत, त्याची जाहिरात करण्यापर्यंत साऱ्या बाबतीत त्यांनी स्वतः लक्ष घातले.

लेखकाचे मनापासून कौतुक करावे, त्याला सन्मान द्यावा, त्याच्याशी सतत स्नेह ठेवावा ही मेहता सरांची खासियत. गेल्या आठ वर्षांत एकही दिवाळी अशी गेली नाही की सरांनी प्रेमाने पुस्तके भेट दिली नाहीत. आज मेहता सर आपल्यातून अचानक निघून गेले यावर विश्वास बसत नाही. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्वाची फार मोठी हानी झाली आहे.

**– धनंजय बिजले**

ơ3

## नवनवे प्रयोग करणारा धडाडीचा प्रकाशक सुनील मेहता!

सुनील मेहतांनी माझी 'आचार्य अत्रे -बारा गावचं पाणी' आणि 'काँग्रेस

विरुद्ध महाराष्ट्र' ही दोन पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. प्रकाशन क्षेत्रामध्ये नवे प्रयोग, धाडस करून या व्यवसायाला नव्या उंचीवर सुनील मेहतांनी नेऊन ठेवले याबद्दल कोणाचेही दुमत होणार नाही.

मेहता प्रकाशनाने 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक सुरू केले. 'मेहता मराठी ग्रंथजगत' मधून आपल्या लेखकांच्या नवीन प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची जाहिरात करून, एक प्रकारची नवी जागृती केली.

सुनील मेहतांचे निधन हे अकालीच म्हणावे लागेल. मेहता प्रकाशनाची प्रकाशन क्षेत्रामध्ये नवीन प्रयोग करण्याची जिद्द आणि घोडदौड अशीच पुढे चालू राहील आणि त्यांचे वारसदार ते पुढे चालवतील अशी आशा बाळगून धडाडीच्या प्रकाशकाला- सुनील मेहतास भावपूर्ण श्रद्धांजली.

**– ॲड. बाबूराव कानडे**

## माझ्या आठवणीतले 'सर'

मी साधारण २००३ला मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये रुजू झाले. सुरवातीला मी शोरूमलाच काम करायचे. नवीन असल्यामुळे मला पुस्तकांची माहिती नव्हती. एकाच दालनात एवढी पुस्तके मी प्रथमच पाहिली होती. त्यामुळे मला काम करताना उत्साह यायचा. रोज बिलं करताना एकच विचार यायचा, की किती वेगवेगळे विषय आणि तेवढ्याच ताकदीचे लेखक हे सर्व एकाच दालनात. कसे करत असतील हे निवड पुस्तकांची? एक दिवस मी त्यांना उत्सुकतेने विचारलं, की तुम्ही ही सर्व पुस्तकं वाचली आहेत का? त्यावर ते इतके खळखळून हसले आणि म्हणाले की 'नाही. मी वाचत नाही. मी फक्त कन्टेन्ट वाचतो;' पण हे बोलताना ते मला बरंच काही शिकवून गेले. शोरूममध्ये आलेल्या विक्रेत्यांना आणि गशहकांना पुस्तकं दाखवताना मला याचा खूप उपयोग झाला; कारण एवढी पुस्तकं वाचणं मलाही शक्य नव्हतं आणि आलेल्या गशहकांना त्याच विषयाची पुस्तकं दाखवायची, हे काम सोपं झालं होतं.

सरांना कामाचा तर सळसळता उत्साह असायचा. मोठी ऑर्डर आली की ती त्यांच्या शिवाय कधी complete झालीच नाही. कधीही त्यांनी कामाचा कमीपणा नाही बाळगला. पडेल ते काम करायची त्यांची कायम तयारी असे. त्यामुळे सगळ्यांनाच ती सवय लागून गेली. सगळीकडे कायम करडी नजर. त्यांची दहशत कायम असायची आणि राहीलही. त्यांनी एक

शिस्त लावून दिली होती. त्या शिस्तीखालीच कायम काम करायचे सगळे. त्यामुळे संस्थेची कामं करताना कायमच आमची चेक लिस्ट तयार असायची. त्याशिवाय हातात काम घ्यायचं नाही आणि झालेली कामं त्यांना त्या चेक लिस्टप्रमाणेच दाखवायची. त्यामुळे संस्थेची प्रत्येक सिस्टीम ही एकाखाली एक अशी लागत गेली. संस्थेमध्ये प्रत्येकाचे profile तयार आहे. त्याप्रमाणे ती कामे झालीच पाहिजेत हा कायम त्यांचा हट्ट असायचा.

बौद्धिक आणि वैचारिक या दोन्ही गोष्टी त्यांच्यात भरभरून होत्या. तसेच, आपण समाजाला काहीतरी देणे लागतो, या दृष्टिकोनातून त्यांनी कायम विचार केला. समाजात वाचनसंस्कृती वाढावी यासाठी ते कायमच प्रयत्नशील असायचे. नवनवीन गोष्टी शिकणे, त्यांचे प्रयोग करणे, भले त्यात नुकसान झालं तरी चालेल; पण प्रयोग करत राहिलं पाहिजे, हे त्यांचं कायमच ठरलेलं असायचं.

आपल्या कॅटलॉगमधील एकही पुस्तक आउट ऑफ प्रिंट आहे हे त्यांना कधी पटलंच नाही. सूचीतील सर्व लेखकांची पुस्तकं कायमच संपण्यापूर्वीच तयार असत. त्यासाठी त्यांनी एक स्वतंत्र विभागही केला आहे. पुस्तक प्रदर्शन ठरवताना त्यांचा कायम आग्रह असे की आपली पुस्तकं ही नुसती जिल्ह्यामध्येच नाही तर तालुक्यांमध्येही पोहोचली पाहिजेत.

त्यांनी अनेक लेखकांना, पुस्तक विक्रेत्यांना घडवलं आहे. त्यांचा



कामाचा आवाका हा मराठी प्रकाशन क्षेत्राला न झेपण्यासारखा आहे. मराठी प्रकाशन संस्था त्यांनी ई-बुक्स/ प्रिंट ऑन डिमांड / त्यांच्या व्याख्यानांद्वारे त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवली होती. मेहता पब्लिशिंग हाऊसमधील प्रत्येक कर्मचाऱ्याला येथे काम करण्याचा कायमच अभिमान वाटावा, अशा स्तराला आमची संस्था त्यांनी नेऊन ठेवली आहे. कामाचा आवाका त्यांनी एवढा वाढवून ठेवलाय की आता आमच्याकडे वेळसुद्धा नाहीये दुसरा कोणता विचार करायला.

व्यवहाराला कायमच चोख. त्यांचे व्यवहार त्यांच्या डोक्यात पक्के ठरलेले असत. त्यामुळे त्यांनी  कधीही कोणालाही उधारी दिली नाही. अगदी मग त्यांच्यापुढे क्रॉसवर्ड असो किंवा  amazon असो.

प्रत्येक लेखकाशी त्यांचा व्यवहार कायमच  transperant असे. कधीही आजपर्यंत कुठल्याही लेखकाने फोन केला नाही की आमचे मानधन कधी देणार म्हणून. कायमच पुस्तक आले की मानधन लगेच ट्रान्स्फर करायचे, ही त्यांची शिस्तच होती. तसेच, सप्लायर्सनाही कधी फोन करायची वेळ आली नाही. कायम त्यांचे शेड्युल तयार असायचे. त्या वेळेला त्यांचे पैसे बरोबर त्यांच्या खात्यात जमा होणार, हे त्यांनाही माहीत होते.

कडक शिस्तीचे असले तरी त्यांनी सगळ्या कर्मचाऱ्यांचे कायमच खूप लाड केले. कुठेही गेले तरी कायम स्टाफसाठी काहीतरी घेऊन यायचे. प्रत्येक कर्मचाऱ्याच्या सुख-दुःखात ते कायमच सामील व्हायचे. बघता बघता १५ वर्षांत छोट्या रोपट्याचा मोठा वटवृक्ष हा झपाट्याने कधी झाला हे काम करताना आम्हालाही कळलं नाही. माझ्यावर त्यांनी जो विश्वास दाखवला,तो शेवटपर्यंत कायम होता.

शिकण्याची तयारी, प्रयोगशीलता, कामाची धडाडी, अचूक निर्णयक्षमता,  दूरदृष्टी, चोख व्यवहार, बौद्धिक आणि वैचारिक पातळीवर काम करण्याची क्षमता, व्यवसायावरची भक्कम पकड, जबरदस्त महत्त्वाकांक्षा असलेले असे आमचे सुनील सर, त्यांच्यासारखे कोणी होणे नाही. ते एक सळसळते चैतन्य आणि मराठी प्रकाशन क्षेत्रातील झंझावात होते.

ऑफिसमधून बाहेर पडताना कधीही न सांगता गेले नाहीत; पण या वेळी मात्र कोणालाही काहीही न सांगता direct एक्झिट घेतली हे न पटण्यासारखं आहे. आज आमचा 'आधारवडच' हरपला आहे. त्यांची पोकळी कधीही

भरून निघणार नाही. सरांनी आखून दिलेल्या मार्गावर आम्ही काम करत राहणं, हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल!

**– संध्या कुलकर्णी**

ᥫ

## केवळ भविष्य माहित असलेला प्रकाशक...


नॅशनल बुक ट्रस्टचं २६ डिसेंबरला lecture होतं. सुनील मेहतांना 'प्रकाशन क्षेत्राचं अर्थकारण' विषयावर बोलायचं होतं. त्यांनी मला त्यासाठी PPT करून मागितलं. मी त्यांना काहीच न विचारता थेट फायनल PPT त्यांच्यासमोर ठेवलं. तर त्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड समाधान होतं.

म्हणाले, 'परफेक्ट झालं आहे. फक्त capital च्या मुद्द्यात एक मुद्दा अ‍ॅड करा.'

'कोणता?'

Human capital... प्रकाशकाला कोणत्या माणसात गुंतवणूक करायची हे कळायला हवं. या व्यवसायात माणसातली गुंतवणूक सर्वांत महत्त्वाची आहे. त्याशिवाय त्याला एक शब्दही न सांगता असं आयतं काम मिळत नाही.

मी PPT केलं असलं तरी त्यांचा मुद्दा आणि दृष्टी तेव्हाही वरचढ ठरली होती. दहाएक वर्षांपूर्वी असंच आधी एका मॅगझीनचं काम सोपवलं त्यांनी. ते



पाहिलं. आणि लगेचच मेहता पब्लिशिंग जॉइन करायची ऑफर दिली. संपादक म्हणून जॉइन झाले असले तरी फॉरेन राइट्स, सोशल मीडिया, पीआर अशा सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळत गेले; पण याही पुढे जाऊन त्यांना माझ्यावर production ची जबाबदारी टाकायची होती. मी स्वतः साशंक असले तरी त्यांना विश्वास होता. पुस्तकाचे हक्क घेण्यापासून ते पुस्तक प्रिंट करून सेल्स टीमला सोपवण्यापर्यंत सगळं एकहाती पाहायचं. ऐकूनच धास्तावल्यासारखं वाटावं असं काम; पण त्यांनी विश्वास दाखवला म्हणून 'हो' म्हटलं आणि एक एक करत तब्बल दोनशेहून अधिक पुस्तकांची जबाबदारी स्वीकारली.

या सगळ्या प्रवासातले अगणित अनुभव. कुठला सांगावा अन् कुठला ठेवावा. फॉरेन राइट्सला पुस्तकाची ऑफर द्यायची असली की आमची पैज लागायची. मी सगळ्या production cost चा विचार करून पन्नासेक डॉलर कमी ऑफर करायला पाहायचे तर त्यांचं नेमकं गणित ठरलेलं असायचं. तरी माझ्या हट्टाखातर ऑफर कमी दिली आणि ती चुकून accept झालीच तर वरचे ५० डॉलर तुमचे असं तेच गमतीने म्हणायचे.

एकदा बोलता बोलता त्यांनी अमेरिकन लायब्ररीच्या ५० वर्षांपूर्वीच्या प्रोजेक्टविषयी सांगितलं. तेव्हा मराठीतल्या दिग्गज लेखकांनी काही अनुवाद केले होते, जी पुस्तकं पुढं अगदी नामशेष झाली. ती पुस्तकं पुन्हा काढण्याचं त्यांचं स्वप्न होतं. मी त्यांच्या नकळत या प्रोजेक्टवर काम करायचं ठरवलं. महाराष्ट्रभरातल्या लायब्ररी पालथ्या घातल्या. आणि एक एक ऐवज मिळत गेला. भानू शिरधनकर, विजय तेंडुलकर, शान्ता शेळके, दि.बा. मोकाशी यांचे अगदी दुर्मिळ अनुवाद शोधून काढले. त्यांचे हक्क मिळवले. आणि त्यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट साकारला. हे काम करताना त्यांनी नेहमीची खर्चाची गणितंही पाहिली नाहीत. त्यांचं म्हणणं होतं, 'आपण हे अनुवादाच्या क्षेत्राला देणं लागतो.' मेहता म्हणजे पक्के व्यावसायिक वाटणाऱ्यांनी त्यांचं हे रूप पाहायला हवं होतं.

ग्रंथजगतचा दिवाळी अंक ज्या दिवशी छापून यायचा, त्याच दिवशी ते मानधन ट्रान्सफर करायला बसायचे. मार्चचा पूर्ण महिना स्वतः रॉयल्टी calculate करणं आणि पुढच्याच आठवड्यात पेमेंट शेड्युल करणं, त्या प्रत्येक गोष्टीसाठी reminder सेट करणं, अशा किती छोट्या छोट्या गोष्टी... पण, प्रत्येक गोष्टीतील त्यांचं नियोजन काटेकोर होतं.

लेखकांचे ॲग्रिमेन्ट, अनुवादाच्या डेडलाइन, प्रकाशनाच्या डेडलाइन पासून अगदी लाइट-पाणी बिलापर्यंत सगळ्या गोष्टींचे त्यांच्याकडे गुगल reminder असत. एकेका दिवसाचे इतके कॅलेंडर सेट केलेले असत की आम्ही त्यांना गुगल कॅलेंडरचे brand abambassador म्हणायचो. त्यांचं reminder सेट करणं आम्ही थट्टेत घेत असलो तरी आता ऑफिसमध्ये सकाळी लॅपटॉप उघडला की एखादं reminder पॉपअप होतं, आणि जणू तेच सांगत असावेत अशी कामाची आठवण करून देतं.

सुनील मेहता फक्त भविष्य माहीत असलेलं व्यक्तिमत्त्व होतं. त्या भविष्यात आपण असू-नसू याच्याशीही त्यांना घेणं-देणं नव्हतं. दिवसाचे दहा-बारा तास काम करताना ते लॅपटॉपवर बुद्धिबळाचा डाव खेळत बसायचे. एकदा त्यांना म्हटलं, 'तुम्ही बुद्धिबळ एकट्यानं कसं खेळू शकता?'

त्यावर म्हणाले, 'मी फक्त स्वतःकडूनच हरू शकतो.'

बस...

आठवणी गोळा करत बसलं की गोठल्यासारखं होतं. त्यांना जाऊन दहा दिवस होताहेत आणि त्यांच्या भोवतालच्या लोकांना आठवण काढायला सवडच मिळू नये इतकं काम ते पुढ्यात ठेवून गेलेत.

**– योजना यादव**

## असे 'सर' होणे नाही!

**सर,**

तुम्हाला पत्र लिहिताना प्रथम आठवल्या त्या साहिरच्या गीतांतील ओळी:

**मैं पल दो पल का शायर हूँ**
**पल दो पल मेरी कहानी है**
**पल दो पल मेरी हस्ती है**
**पल दो पल मेरी जवानी है**

खरं तर प्रत्येक माणसाच्या जीवनाचंच हे वास्तव; पण तुमच्यासारखी माणसं 'पल दो पल'मध्ये इतकं काही करून जातात, की पुढच्यांना ते वर्षानुवर्षं पुरावं. तुमचं हे कर्तृत्व घडत असताना गेली एकोणीस वर्षं मी तुम्हाला बघत होते; पण इतकी अचानक एक्झिट घ्याल असं ध्यानीमनीही

नव्हतं. आज तुम्हाला हे पत्र लिहिताना एकोणीस वर्षांतील अनंत आठवणी मनात दाटून आल्या आहेत.

प्रकाशन संस्थेत मी येईन आणि तिथली मी प्रोडक्शन हेड होईन, असं जर मला कुणी एकोणीस-वीस वर्षांपूर्वी म्हटलं असतं, तर मला स्वत:लासुद्धा ते पटलं नसतं; पण हे घडलं ते केवळ तुमच्यामुळे. २००३मध्ये प्रकाशन संस्थेत काम करण्याचा कोणताही अनुभव नसताना तुम्ही मला नोकरी देऊ केली. सुरुवातीला री-प्रिंटच्या पुस्तकांचं काम सोपवलं आणि ते काम बघता बघता मी प्रोडक्शन हेड कधी झाले ते कळलंच नाही. निगेटिव्ह-पॉझिटिव्ह-पेस्टिंग ते जुन्या निगेटिव्हला ओपेग लावण्यापर्यंत, पेपरचे प्रकार माहीत करून देण्यापासून पेपरचा हिशेब ठेवण्यापर्यंत, एवढंच नाही तर पुस्तकाचा ले-आउट कसा करायचा इथपर्यंत तुम्ही मला टेक्निकली तयार केलं. लेखक /अनुवादक यांचं ॲग्रिमेन्ट करण्यापासून ते पुस्तक प्रिंटिंगला जाईपर्यंत आणि प्रिंट होऊन आल्यावरच्याही जबाबदाऱ्या आता मी सक्षमपणे पेलते आहे, त्या केवळ तुमच्यामुळे. 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या ऑफिशिअल कामांपासून (पोस्टातून परवानगी मिळवणे, दिवाळी अंकाची डमी पोस्टात दाखवणे, विहित मुदतीत अंकाच्या रजिस्ट्रेशनचं रिन्युएशन करणे इ.) अंकावर एक नजर टाकण्यापर्यंत तुम्ही मला तयार केलंत.

मी जेव्हा नवीन जॉइन झाले होते, तेव्हा जवळजवळ महिनाभर तुम्ही माझ्याशी काहीही बोलला नाहीत. असा कसा बॉस आहे, काहीच बोलत नाही, असं मला वाटायचं; पण तुम्ही देहबोलीतून जास्त बोलता, हे मला अनुभवातून उमगत गेलं. हळूहळू तुमच्या स्वभावाचे कंगोरेही लक्षात यायला लागले. एक खंत मात्र मला आहे, की तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी टेक्नोसॅव्ही होऊ शकले नाही. तुम्ही मला नेहमी म्हणायचात की, राजश्री, या संस्थेच्या खुर्चीवर आहेस म्हणून तेवढ्यापुरती तुझी ओळख ठेवू नकोस. या रस्त्यावरून जाताना तुला म्हटलं पाहिजे, की तू मेहता पब्लिशिंग हाऊसचं काम करत होतीस. एवढं तुझं आकाश वाढव. मला वाटतं सर, तुमच्याकडे काम केल्यामुळेच माझं आकाश वाढलेलं आहेच. अनेक उत्तमोत्तम पुस्तकांच्या निर्मितीची सक्रिय साक्षीदार असणं, हेच माझं आकाश आहे.

'स्वान्सीतील दिवस' या वीणा देवांच्या पुस्तक प्रकाशन प्रसंगी तुम्ही आणि पप्पा स्टेजवर बसणार नव्हतात; पण प्रोडक्शन हेड म्हणून मी स्टेजवर

बसलं पाहिजे, हा तुमचा हट्ट होता आणि हो-ना करता मी तो पूर्ण केला. सुधा मूर्ती, तसलिमा नासरिन, अरुण शौरी इ. किती दिग्गजांच्या स्वागताची तयारी करण्याचं काम तुम्ही माझ्यावर निर्धास्तपणे सोपवलं आणि अशा प्रतिभावंतांचं स्वागत करण्याची संधी मला मिळाली. अनेक लेखक/अनुवादकांशी माझं स्नेहाचं नातं जडलं. त्यामुळे या व्यक्ती पुस्तकापलीकडे जाऊनही माझ्याशी बोलतात. माझ्या एकोणीस वर्षांच्या कालावधीत शेकडो पुस्तकं प्रोडक्शन हेड म्हणून माझ्या नजरेखालून गेली आणि त्यातल्या काही पुस्तकांमध्ये लेखक/अनुवादकांनी मनोगतात माझ्याही नावाचा उल्लेख केला आहे. ही श्रीमंती मला मिळाली ती केवळ तुमच्यामुळे.

माडीवाले कॉलनीतल्या नवीन बिल्डिंगमध्ये आपण शिफ्ट झालो तेव्हा, या ऑफिससाठीच्या सगळ्या खरेदीची जबाबदारी तुम्ही माझ्यावर सोपवली होती आणि पैसे माझ्या स्वाधीन केले होते; खरेदी झाल्यानंतर जेव्हा जेव्हा मी तुम्हाला हिशोब द्यायला यायचे, तेव्हा तुम्ही म्हणायचात नंतर बघू. असं करत तुम्ही जवळ जवळ महिनाभराने माझ्याकडून तो हिशोब घेतलात. तुमचा तो माझ्यावरचा विश्वास होता की तुम्ही मला आजमावत होतात देव जाणे! पण अशा जबाबदाऱ्या टाकत तुम्ही मला घडवत गेलात हे नक्की आणि त्याबद्दल मी तुमची सदैव ऋणी राहीन! 'असे सर होणे नाही' असंच म्हणावंसं वाटतं मला!



कोल्हापूरला तुमच्या बंगल्याच्या वास्तुशांतीसाठी आम्ही आलो होतो तेव्हा, कोवाडला दादांच्या (रणजित देसाईंच्या) वाड्यात आणि त्यांच्या शेतात आपण सगळ्यांनी केलेली धमाल अजूनही आठवतेय. त्या वेळेला तुम्ही आमचे बॉस नव्हतात. आता आम्हाला कोल्हापूरहून येताना स्ट्रॉबेरी कोण आणणार? भडंग आणि भेळ कोण आणणार?

काय काय आणि किती आठवू? एमपीएच हे माझं घर आहे आणि त्या घराचा कर्ता पुरुष अचानक निघून गेलाय. कामाचा एवढा प्रचंड व्याप तुम्ही मागे ठेवलाय आमच्यासाठी; पण त्या कामाचे अपडेट्स घ्यायला तुम्ही केबिनमध्ये नाही आहात, ही जाणीव मनाला विद्ध करून जातेय. मला ओरडण्यासाठी का होईना, एकदा तरी या सर!

**– राजश्री देशमुख**

ଓ

## Sunil Sir, You are always with us!

भावांजली अर्पण करतोय सगळे मिळून. कुणाला? आमच्या सुनील सरांना. शब्दच कसेतरी वाटत आहेत. डोळे भरून आलेत आमच्या सगळ्यांचे. त्यांचं आम्हाला सगळ्यांना असं अचानक सोडून जाणं अजूनही स्वीकारता येत नाहीये आम्हाला. गाडीतून उतरून गेटमधून आत येणारी, नंतर सेल्स डिपार्टमेन्टमधून बाहेर येऊन जिने चढणारी, केबिनमध्ये त्यांच्या खुर्चीत रुबाबात विसावलेली त्यांची मूर्ती अजूनही डोळयांसमोरून हलत नाही. आमच्या दैनंदिन जीवनाचा, आमच्या सगळ्यांच्याच कामाचा एक अविभाज्य घटक हरपल्याचं हे दु:ख पचवणं जरा अवघडच आहे. सरांच्या जाण्याने आमच्या सगळ्यांच्याच मनात असंख्य भावनांची, आठवणींची गर्दी झाली आहे.

आम्हा सगळ्यांच्या कामावर रुजू होण्याच्या तारखा वेगळ्या, सरांशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संपर्काचे संदर्भ वेगळे, कामाचं स्वरूप वेगळं; पण आमच्या सगळ्यांचं नेतृत्व करत होते सुनील सर. सगळ्या कामांवर बारकाईने नजर असायची त्यांची. प्रोडक्शन, सेल्स, शोरूम या तीन प्रमुख विभागांशी संबंधित प्रत्येक कामावर त्यांचं लक्ष असायचं. त्या त्या विभाग प्रमुखाकडून कामाचे अपडेट्स घ्यायची त्यांची पद्धत होती. त्यांच्या करड्या शिस्तीत कामं चालायची. काही वेळेला ती शिस्त जाचकही वाटायची; पण अशी शिस्त असल्याशिवाय, कामाची एक सिस्टिम बसवून देऊन त्याची नेटाने

अंमलबजावणी केल्याशिवाय व्यावसायिक यश मिळत नसतं, याचं एक उदाहरणच त्यांनी घालून दिलं. लेखक-अनुवादक यांच्याबरोबरचं सौहार्द जपणं आणि त्यांच्याबाबतचे आर्थिक व्यवहार चोखपणे पार पाडणं हेही त्यांच्या यशस्वितेमागचं कारण होतं.

पुस्तकाचं हस्तलिखित स्वीकारण्यापासून, अन्य भाषांतील पुस्तकाचे अनुवादासाठी राइट्स घेण्यापासून ते पुस्तक पूर्णपणे तयार होऊन विक्रीला येईपर्यंतच्या प्रत्येक प्रोसेसवर लक्ष ठेवणं आणि शक्य तिथे सूचना करून त्यात योग्य त्या सुधारणा करणं, या गोष्टी ते लीलया करत. नव्हे, या प्रोसेसवर त्यांची नजर बसली होती. पुस्तकाचं प्रमोशनल मटेरिअल (वेबसाइटसाठीचं सिनॉप्सिस, ब्लर्ब आणि ॲडलाइन्स) कसं असावं याची त्यांना चांगली जाण होती. पुस्तकाच्या कव्हरच्या बाबतीतही सजगता होतीच. टी बुक क्लबसारखी योजना, त्या त्या लेखकाच्या वाढदिवशी/ किंवा विशिष्ट दिवशी त्या त्या लेखकाच्या पुस्तकांच्या संचावर/ विशिष्ट दिवसाशी संबंधित पुस्तकांच्या संचावर डिस्काउंट्स देणे, डिजिटल माध्यमांतून जाहिराती, महाराष्ट्रभर विस्तारलेलं वितरणाचं जाळं हे सगळं त्यांच्या व्यावसायिक दृष्टिकोनाचं फलित आहे. ई-बुक्स ही तर त्यांची खास ओळख आहे. काळाच्याबरोबर चालण्याची, किंबहुना काळाच्या पुढे पावलं टाकण्याची क्षमता त्यांच्यात होती. 'मेहता मराठी ग्रंथजगत' या मासिकाच्या कामावरही त्यांची करडी नजर असायची.

त्यांनी कामाची बसवलेली घडी व्यवसायाला पुढे नेणारी होतीच; पण आम्हा कर्मचाऱ्यांनाही घडवणारी होती. कामाचं पूर्ण स्वातंत्र्य त्यांनी आम्हाला दिलं होतं. कामाशी संबंधित सगळ्या सुविधा पुरवल्या. तुम्हाला हे सगळं दिलं आहे, आता काम चांगल्या रीतीने करणं ही तुमची जबाबदारी, असा त्यांचा दृष्टिकोन होता. अनिल मेहता (आम्ही सगळे त्यांना 'पप्पा' म्हणतो) यांनी रुजवलेल्या-नावारूपाला आणलेल्या  मेहता पब्लिशिंग हाऊसला सरांनी यश आणि कीर्तीच्या शिखरावर नेऊन ठेवलं. त्यामुळे आम्ही या संस्थेत काम करतो, याचा आम्हाला नक्कीच अभिमान आहे. सरांनाही आपल्या संस्थेबद्दल खूप अभिमान होता. तो अभिमान तसाच टिकवून ठेवण्याची जबाबदारी आता आम्हा सगळ्यांवर अकस्मात येऊन पडली आहे. सरांसाठी मेहता पब्लिशिंग हाऊस हे त्यांचं घर होतं, तेच त्यांचं जगणंही होतं. त्यांच्या डोळ्यांत सदैव संस्थेच्या प्रगतीची स्वप्नं होती.

कोरोना काळात आम्ही सगळे घरून काम करत होतो, तेव्हाही सर आमच्या कामाचं चोख नियोजन करायचे. तशा सूचना आमच्या एमपीएचच्या व्हॉट्स ॲप ग्रूपवर टाकायचे. रोजच्या रोज त्यांचा व्हॉट्स ॲपवरचा गुड मॉर्निंगचा मेसेज आणि अन्यही मेसेजच्या माध्यमातून ते आमच्या संपर्कात होते. आता तो संपर्क कायमचा तुटला आहे. आमच्या व्हॉट्स ॲप ग्रूपवरचं चैतन्यच हरपलं आहे.

सरांचं व्यावसायिक रूप जसं आम्ही अनुभवलं, तसंच एक कुटुंबप्रमुख म्हणूनही त्यांना आम्ही अनुभवलं. आमच्या एम.पी.एच. परिवाराचे ते कुटुंबप्रमुख होते. सर कोल्हापूरला गेले की स्ट्रॉबेरीच्या मोसमात सगळ्या स्टाफसाठी स्ट्रॉबेरी घेऊन यायचे. कधी भडंग, कधी भेळ घेऊन यायचे. एका कुटुंबप्रमुखाच्या नात्यानेच त्यांनी ऑक्टोबरमध्ये सगळ्या स्टाफला कर्दे इथे ट्रीपला नेलं होतं. त्या ट्रीपमध्ये पूर्ण एक-दीड दिवस सर सगळ्या स्टाफबरोबर होते. (म्हणजे ऑफिसमध्येही सर आमच्याबरोबर असायचे; पण आम्ही विभागलेले असायचो). आमच्या स्टाफमधल्या मुलांबरोबर क्रिकेट खेळले. आमच्याबरोबर समुद्र किनाऱ्यावर फेरफटका मारला. गाणंही म्हटलं (रिमझिम गिरे सावन). अतिशय सुरेल. (त्यांना गाण्याची आणि चित्रपटांची खूप आवड होती. 'डॉन' हा त्यांच्या आवडीचा चित्रपट त्यांनी चाळीसपेक्षाही जास्त वेळा पाहिला होता.) आम्ही त्यांच्याबरोबर गाण्याच्या भेंड्याही खेळलो. तिथून निघताना सरांबरोबर आमच्या सगळ्या स्टाफचं फोटोसेशन झालं. ट्रीपहून परतताना सर आमच्या पुढे आले होते; पण आम्ही सगळे पुण्यात आमच्या ऑफिसपर्यंत पोचेपर्यंत सर आमच्या सगळ्यांची वाट पाहत थांबले होते आणि आम्ही सगळे घरी कसे जाणार आहोत, याची चौकशी केली. या आनंदक्षणांवर दोन एक महिन्यातच विरजण पडणार आहे, याची सुतरामही कल्पना त्या वेळेला आम्हाला नव्हती.

त्यानंतर सरांचा वाढदिवसही दरवर्षीप्रमाणे आम्ही साजरा केला. सरांनी शोरूममध्ये केक कापला. त्यांचे कॉलेज जीवनातील मित्र आले होते. त्यांना सरांनी प्रेमपूर्वक आलिंगन दिलं. त्या वेळी त्यांना खूप भरून आलं होतं. त्यांनी त्यांच्या कॉलेज जीवनातल्या आठवणीही आमच्यासमोर ताज्या केल्या. 'माझ्याहातून समाजकार्य करायचं राहून गेलं आहे. ते करायचं आहे,' असंही ते त्या दिवशी म्हणाले. वाढदिवसाच्या दिवशीच त्यांनी आम्हाला दिवाळीच्या शुभेच्छा आणि दिवाळीचं गिफ्ट दिलं. आमच्या सगळ्यांसाठीच

हे क्षण खूप आनंदाचे होते. सरांचा हा वाढदिवस आणि त्यांची ही दिवाळी शेवटची ठरणार आहे, हे फक्त नियतीलाच माहीत होतं.

नाशिकच्या साहित्य संमेलनालाही सर गेले होते आणि तिथे 'साहित्योत्सव' हा अभिनव उपक्रम त्यांनी राबवला. वाचकाभिमुखता वाढवण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील होते.

पप्पांचं मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वाटचालीविषयीचं सदर 'एक एक पान घडताना...' मेहता मराठी ग्रंथजगतमधून क्रमशः प्रसिद्ध होत असतानाच मेहता पब्लिशिंग हाऊसचं एक महत्त्वपूर्ण 'पान' अकाली गळावं, या दैवदुर्विलासाला काय म्हणावं! पप्पांचं दुःख खूप मोठं आहे. रूपाभाभी (सरांच्या पत्नी), अखिल, साहिल (सरांची मुलं) या सगळ्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सगळे सहभागी आहोत. त्यांच्याच सहकार्याने आम्हाला पुढे जायचं आहे. संस्थेला पुढे न्यायचं आहे.

सर, तुम्हाला श्रद्धांजली वाहण्याची कल्पनाच आम्हाला कशीतरी वाटते; कारण तुम्ही सदैव आमच्या बरोबर होतात आणि बरोबर राहणार आहात!

**– टीम एमपीएच**



## नावीन्याचा ध्यास असलेले ग्रंथप्रकाशक सुनील अनिल मेहता

मराठी ग्रंथ प्रकाशन व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब करणारे पहिले ग्रंथप्रकाशक म्हणून 'श्री. सुनील अनिल मेहता' यांचा मला उल्लेख करावासा वाटतो.

त्यांच्यासोबत, अगदी बाजूला बसून मी, एखाद्या मराठी प्रकाशन संस्थेची पहिली वेबसाईट, ई-मेल वापराचा स्वतंत्र डोमेन, ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, ऑनलाईन बुक ऑर्डर-पेमेंट, overseas book orders यासोबतचं अद्ययावत ॲडॉब पेजमेकर, फोटोशॉप, कोरल ड्रॉ, इनडिझाइन, सीटीपी (computer to plate) अशा अनेक तांत्रिक बाबी शिकलो. काळानुरूप पुस्तक प्रकाशन व्यवसायात अशा सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणारे ते बहुधा पहिले प्रकाशक असावेत.

मराठी पुस्तक प्रकाशन संस्थेचे ग्रंथदालन वातानुकूलित, प्रशस्त आणि सुटसुटीत असावे. संपादन, मुद्रितशोधन, निर्मिती, वितरण असे सर्व विभाग सर्व सोयी-सुविधांनी सुसज्ज असावेत, स्वतंत्र कॉन्फरन्स रूम असावी, असे त्यांचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात आणले. आज पुण्याच्या बाजीराव रोड, माडीवाले कॉलनीतील 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची भव्य, सुसज्ज इमारत याची साक्ष देते.

मी मेहता प्रकाशनाच्या अंतर्गत संपादकीय विभागात सहसंपादक म्हणून रुजू झालो होतो. वर्ष २००४.

वय २३ वर्षे. इंग्रजी भाषेची अडचण नाही. संस्कृत-मराठीवर पकड यामुळे अनिल मेहता-सुनील मेहता या पिता-पुत्रांनी माझ्यावर अंतर्गत संपादकीय विभाग थेट सोडून दिला.

नामवंत लेखकांशी, साहित्य समीक्षकांशी, वृत्तपत्र संपादकांशी दररोजचा थेट संपर्क. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अनुवादित पुस्तक प्रकाशनामुळे भारतासह जगभरातील नामवंत प्रकाशन संस्थांशीही ई-मेलद्वारे थेट संबंध. विशेषतः, इंग्लंड-अमेरिका-युरोप येथील महाराष्ट्र मंडळांकडून पुस्तकांची थेट ऑनलाईन मागणी, असा प्रचंड पसारा असलेला तो संपादकीय विभाग. नऊ तास कसून काम.

मेहतांचा संपादकीय विभाग म्हणजे शंकर सारडा, अविनाश पंडित आदी नामवंत, व्यासंगी ग्रंथसंपादकांचा सतत वावर असलेला. त्यामुळे या ग्रंथसंपादकांपासून ते थेट डॉ. आनंद यादव, विश्वास पाटील, दया पवार,

राजन गवस, नागनाथ कोत्तापल्ले, रत्नाकर मतकरी, विजया राजाध्यक्ष, राजीव तांबे आदी अनेक नामवंत तसेच सुधा मूर्ती, किरण बेदी, अरुण शौरी, तस्लिमा नासरिन, गुलजार, जसवंतसिंग अशा अनेक श्रेष्ठींशी शब्दशः थेट संवाद साधण्याची संधी.

याशिवाय होऊन गेलेल्या नामवंत लेखकांची 'सिरीज ऑफ बुक्स' सांभाळणे, हा एक विचारविश्व समृद्ध करणारा भाग. सुनील मेहतांनी 'ययाति'कार वि.स. खांडेकर, 'स्वामी-श्रीमानयोगी'कार रणजित देसाई, शान्ताबाई शेळके, शिवाजीराव सावंत, भा.द. खेर, राम प्रधान, लोकप्रिय कथाकार व.पु.काळे, व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर पाटील, ग्रामीण साहित्यिक आनंद यादव, दया पवार, राजन गवस अशा कितीतरी हयात दिग्गज लेखक, साहित्यिकांना योग्य सन्मान देऊन त्यांचे लेखन दर्जेदार पुस्तकांच्या रूपात मराठी वाचकांसमोर ठेवले.

मी ग्रंथ प्रकाशक आहे, पुस्तकांची सुबक छपाई करणं, लेखक-वाचकाला हातात घेतल्यानंतर आनंद वाटेल, असं मुखपृष्ठ-मलपृष्ठ असणं, जगभरात जिथे कुठे मराठी वाचक असेल तिथपर्यंत संबंधित पुस्तक पोहोचवणं, लेखकाला ठरलेल्या वेळेत रॉयल्टी देणं, एकूणच, दर्जा, मान-सन्मान राखणं, काळानुरूप बदल करणं हेचं माझं सातत्यपूर्ण काम आहे, अशी स्वच्छ भूमिका ही सुनील मेहतांची असे.

'लेखकाच्या मूळ लेखनात मी ढवळाढवळ करत नाही, ती भूमिका ग्रंथसंपादकाची...' असं मनमोकळेपणाने ते सांगत असत. लेखकाने मन ओतून पुस्तकाचे लेखन करावे, मुद्रितशोधकाने अचूक व्याकरण पहावे, ग्रंथसंपादकाने दर्जेदार संपादन करावे आणि प्रकाशकाने ते उत्तम दर्जा ठेवून सर्वदूर पोहोचेल हे पाहावे, अशी प्रांजळ भूमिका त्यांनी कायम ठेवली.

विविध भारतीय भाषा, तसेच पाश्चात्त्य इंग्रजी लेखकांची गाजलेली पुस्तके मराठी भाषेत अनुवादित व्हावीत, असा सुनील मेहतांनी विशेष प्रयत्न केला. मराठीत सर्वप्रथम आणि व्यापक स्तरावर असा प्रयत्न करणारे ते कदाचित पहिले प्रकाशक असावेत. जर्मनीतील 'फ्रँकफर्ट बुक फेअर'ला ते जात असत. पाश्चात्त्य जगतातील बेस्ट सेलर लेखक जेफ्री आर्चर, फ्रेडरिक फोरसिथ, मायकेल क्रायटन, बेट्टी महमूदी, जॉन ग्रिशॅम, इयान फ्लेमिंग, डॅन बशऊन, मारिओ पुझो, रॉबिन कूक आदींची गाजलेली पुस्तकेही मराठीत भाषांतरित केली. मूळ लेखकांइतकाच अनुवादकांचाही सन्मान केला.

साहित्य क्षेत्रात ग्रंथ प्रकाशकांनाही सन्मानाचे स्थान असले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका त्यांनी मांडली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ग्रंथ प्रकाशकांना पुस्तकविक्रीसाठी योग्य ती जागा मिळाली नाही की ते संबंधित पदाधिकाऱ्यांविरोधात आक्रमक भूमिका घेत. ग्रंथप्रदर्शन हे साहित्य संमेलनाचे महत्त्वाचे अंग आहे आणि ते ठळक दिसेल अशा जागीच असले पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका असे.

एखाद्या प्रकाशन संस्थेकडून एखाद्या नामवंत लेखकाची पुस्तके खपत नसतील तर संबंधित लेखकाला, लेखक हयात नसेल तर त्याच्या वारसांशी संपर्क साधून ते कॉपीराइट हक्कानुसार मेहता प्रकाशनाखाली पुनर्मुद्रित करत असत. उत्तम मुखपृष्ठ, सुबक छपाई, जोडीला इल्युस्ट्रेशन्स अशा साजशृंगाराने ते संबंधित पुस्तक पुन्हा नव्याने वाचकांसमोर ठेवले जाई. लेखक, वारस आनंदून जात असत. वेळोवेळी रॉयल्टी घरपोच पोहोचत असे हा आनंदही वेगळाच. ज्या लेखकांचं पोट निव्वळ लेखनावर आहे, अशांना 'सुनील अनिल मेहता' हे चरितार्थासाठी मोठा आधार होते. नामवंत ग्रामीण कथाकार शंकर पाटील यांची मेहता प्रकाशनातर्फे पुनर्मुद्रित झालेली पुस्तके वानगीदाखल जरूर पाहावीत. मी त्याचा साक्षीदार आहे.

नामवंत लेखकांशी वाचकांचा संवाद घडवणं हा सुनील मेहतांचा एक आवडता साहित्यिक छंद होता. त्यासाठी काही लाख रुपये खर्च करण्यास त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. टिळक स्मारक मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर अशा मोठ्या सभागृहात मेहतांनी पुस्तक प्रकाशनांचे कार्यक्रम स्वखर्चाने आयोजित केले. वाचक-लेखक संवाद घडवला. हे बाळकडू त्यांना वडील अनिल मेहता यांच्याकडून मिळालं असावं. लोकसंग्राहक, रत्नपारखी असे अनिल मेहता यांनी सुरू केलेल्या मेहता पब्लिशिंग हाऊसला महाराष्ट्रातील एक अग्रगण्य प्रकाशन संस्था बनवण्यात त्यांचे पुत्र सुनील मेहता यांचा मोठा वाटा आहे. आज या धडाडीच्या, पुस्तकनिर्मितीत नवनवीन, सातत्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या अनुभवी प्रकाशकाचे अकाली निधन होणे ही लेखक-वाचक आणि एकूणच साहित्य व्यवहाराची मोठी हानी आहे. सुनील मेहतांना विनम्र श्रद्धांजली!

**– अनिरुद्ध पाटील, लातूर**

मी जवळपास दीड वर्ष मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये संपादक म्हणून

काम केलं. तेव्हा अनेकदा सुनील मेहता सरांशी थेट बोलणं व्हायचं. त्यांची व्यावसायिक जाण वाखाणण्याजोगी होतीच; पण कोणत्या पुस्तकाचे हक्क घ्यायचे, कोणता विषय वाचकांना आवडेल हे त्यांना चटकन समजायचं. इंग्रजी प्रकाशनाच्या धरतीवर त्यांना प्रोफेशनल मराठी प्रकाशन संस्था उभी करायची होती आणि त्यांनी तशी ती केलीही. ललित असेल, किंवा ललितेतर पुस्तकं असतील, त्यांनी खूप वेगवेगळ्या प्रकारचे विषय मराठीत भाषांतर करवून घेऊन आणले. तिथे क्वांटिटीमध्ये काम करायचा अनुभव मिळाला, जो फार महत्त्वाचा होता.

त्यांचं असं अचानक जाणं धक्कादायक आहे. सुनील सरांना आदरांजली!

**– प्रणव सखदेव**

'वासांसि जीर्णानि यथाविहाय'

आज मराठी प्रकाशन जगताने श्री. सुनील मेहतांना अखेरचा साश्रुपूर्ण निरोप दिला. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दुसऱ्या पिढीचे कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी संस्थापक श्री. अनिल मेहतांचा हा व्यवसाय वृद्धिंगत केला व मराठी साहित्यविश्वाच्या प्रगतीसाठी बहुमूल्य योगदान दिले.



मराठी साहित्य प्रकाशन व्यवसाय आंतरराष्ट्रीय स्तरावर जावा आणि आंतरराष्ट्रीय साहित्याची दर्जेदार मराठी भाषांतरे वाचकांसाठी उपलब्ध व्हावीत, या दोन्ही बाबतीत त्यांच्या नेतृत्वाखाली किती अफाट काम MPH ने केले आहे, हे कुठल्याही सुजाण मराठी वाचकाला वेगळे सांगणे न लगे.

एवढेच नाही तर जिथे बरेचसे मराठी प्रकाशक e-Commerce website व payment gateway, UPI असे साधे साधे कालानुरूप बदल करायलाही तयार नाहीत, तिथे ते piracy, duplicate पुस्तक माफिया, third party online vendors अशा present & critical समस्यांना आळा घालण्याच्या प्रयत्नांत... आणि त्याबरोबरच घटणारा वाचकवर्ग, मराठी व परकीय भाषा शिक्षणाचा ऱ्हास व कोविडनंतर बदललेले साहित्यविश्व यांवर लोकजागरण व विचारमंथन करण्यात अग्रेसर होते.

त्यांच्या अचानक जाण्याने एक खूप दुःखद पोकळी नक्कीच निर्माण झाली आहे; पण MPH चा हा साहित्यप्रवास यानंतर मुद्रण-वितरणाच्याही पुढे जात बहुमाध्यमी रीतीने, कालसापेक्ष बदलांशी जुळवून घेत सुरू राहणार आहे आणि वृद्धिंगत होत जाणार आहे, यावर माझा विश्वास आहे. आजोबा व वडिलांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले व इंग्लंडमध्ये आंतरराष्ट्रीय प्रकाशनाचे उच्चशिक्षण घेतलेले तिसऱ्या पिढीचे माझे मित्र अखिल मेहता व त्यांचे अनुज साहिल हे Team MPH सोबत साहित्यविश्वाची सेवा करत राहणार असल्याने माझ्यातला मराठी वाचक आश्वस्त आहे.

**– हर्षद सुभाष**

सुनीलला लहानपणापासून पाहिलेलं. त्यामुळे त्याच्या अनेक आठवणी माझ्या सोबतीस आहेत. पुत्रवियोगाचे दु:ख मी आणि पत्नीने अनुभवले असल्यामुळे त्या दु:खाची तुमची-माझी वेदना ही सहवेदना आहे. फक्त तिला सामोरं जायचं मन घट्ट करून, त्याचा स्वीकार करायचा आणि परमेश्वराजवळ एकच प्रार्थना करायची की– आघात सोसण्याचं सामर्थ्य दे. अधिक काय लिहू? तुम्ही स्वत:ला सावरा आणि सर्वांना धीर द्या - आधार द्या!

**– राम देशपांडे**

सुनील मेहता यांनी प्रकाशक म्हणून ललित लेखन प्रकाराच्या जोडीला

अनुवाद वाङ्.मय प्रकारावर विशेष भर दिला. त्यांनी सातत्याने परदेशी आणि परभाषी साहित्यिकांच्या साहित्याचे अनुवाद प्रकाशित केले. अनुवाद क्षेत्रातील त्यांचे प्रकाशक म्हणून योगदान मोठे आहे.

**— दिलीप माजगावकर - राजहंस प्रकाशन**

मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक सुनील मेहता, धाडसी वृत्तीने व्यवसायात सातत्याने काम करणारी व्यक्ती गेली. अनिल मेहता यांनी सुरू केलेली संस्था नावारूपास आणण्यामध्ये सुनील मेहतांचे मोठे योगदान होते.

मेहता कुटुंबीयांना हे दुःख पचविण्याची ताकद मिळो!

रसिक साहित्य परिवार आणि वाचकांकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

**— शैलेश नांदूरकर**

मेहता पब्लिशिंग हाऊस या मराठी भाषेतील अग्रगण्य प्रकाशन संस्थेचे संचालक सुनील मेहता यांचे दुःखद निधन झाले. प्रकाशक म्हणून सातत्याने मराठी वाचकांची अभिरुची जपलेल्या मेहता सरांनी पुस्तकांच्या क्षेत्रात नेहमीच अभिनव प्रयोग केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्तमोत्तम जागतिक लेखकांची पुस्तके मराठी भाषेत प्रकाशित करण्याचे काम तर त्यांनी केलेच, पण त्याचबरोबर विविध भारतीय प्रादेशिक भाषांमधील नामवंत लेखकांच्या दर्जेदार कलाकृतीही त्यांनी मराठी वाचकांसाठी उपलब्ध करून दिल्या. राज्यात विविध ठिकाणी ग्रंथप्रदर्शनांचे आयोजन आणि ‘मेहता मराठी ग्रंथजगत’ या त्यांच्या इनहाऊस मॅगझीनचे नियमितपणे प्रकाशन यांसारख्या विविध कल्पक मार्गांसह त्यांनी मराठी वाचकवर्गाला पुस्तकांच्या जगाकडे आकर्षित केले. प्रकाशन क्षेत्रात कालानुरूप होणारे बदल लक्षात घेऊन नेहमी त्याप्रमाणे काम केलेल्या मेहता सरांनी नवीन तंत्रज्ञानाचाही स्वीकार करत वाचकांना प्रकाशन संस्थेशी जोडून घेतले. अलीकडेच नाशिक येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी पुस्तक प्रदर्शनाच्या स्टॉलबरोबरच ‘लेखक तुमच्या भेटीला’सारख्या विविध साहित्यविषयक उपक्रमांच्या आयोजनासाठी स्वतंत्र स्टॉलची व्यवस्था केली होती. या प्रयोगावरून वाचकांप्रति त्यांना असलेला जिव्हाळा लक्षात येऊ शकेल. अनेक नवनव्या संकल्पना रुजवत मराठी प्रकाशन क्षेत्राला नवे आयाम देणाऱ्या सुनील मेहता सरांच्या निधनामुळे प्रकाशनजगतामध्ये कधीही भरून

न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. साकेत प्रकाशनातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– साकेत भांड** - साकेत प्रकाशन

ᘛ

सुनील मेहता यांच्या आकस्मिक निधनाची बातमी अतिशय दुर्दैवी अशी आहे.

मराठी प्रकाशन क्षेत्रात काळाबरोबर राहून अनेक धाडसी निर्णय घेत त्यांनी व्यवसायात प्रगती केली. अनुवादाच्या क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी तर खरोखर कौतुकास्पद आहे.

पॉप्युलर प्रकाशनाच्या वतीने सुनील मेहता यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**– पॉप्युलर प्रकाशन**

ᘛ

सुनिल मेहता यांच्या निधनाने सर्व प्रकाशन व्यवसायाची हानी झाली आहे. त्यांचा कामाचा उरक दांडगा आणि झपाटा विलक्षण.

अखिल यास उमेद मिळावी ही ईश्वर चरणी प्रार्थना. अनिल मेहता यांना हे दु:ख पेलावे लागणार आहे. हे कल्पनेच्या पलीकडले आहे.

सुनील याला ज्योत्स्ना प्रकाशन परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली

**– ज्योत्स्ना प्रकाशन**

ᘛ

सर्वसाधारणपणे आपणास पत्र लिहिण्याची वेळ येत नाही आणि ती आली तरी, व्यवसायासंबंधितच विषय असणार त्या पत्राचा; पण आज आपणास हे वैयक्तिक पत्र लिहीत आहे. प्रसंगच तसा उद्‌भवला आहे आणि आपले ऋणानुबंध गेल्या ३५-४० वर्षांपासूनचे आहेत, अगदी माझे वडील मनोहर चंपानेरकर आपले लेखक असल्यापासूनचे आहेत. तेव्हा आपल्या अतिशय कठीण प्रसंगी पत्ररूपाने आज सुनीलविषयी भावना व्यक्त कराव्यात असं वाटतं.

प्रत्येक व्यवसायाची कामाची एक पद्धत असते. व्यवसायाचं आकारमान लहान-मोठं असेल, वैशिष्ट्यं वेगवेगळी असतील; पण सर्वसाधारणपणे थोड्याफार फरकाने कार्यपद्धती एकसाची असते; पण सुनील मेहताला हे मान्य नव्हतं. त्याचे व्यवसायासंबंधी वेगळे विचार होते. वेगळी ध्येयं-धोरणं होती. वास्तविक, मेहता पब्लिशिंग सुरू केलं, अनिलभाईंनी आणि

अनिलभाई हे काही सर्वसाधारण व्यक्तिमत्त्व नव्हे. त्यांचाही आवाका मोठा होता; परंतु सुनीलला त्याच-त्या वहिवाटेने जायचे नव्हते. त्याची कार्यशैली वेगळी होती. ती ओरिजनल त्याची होती. तेव्हा 'मेहता' जॉइन केलं ते त्याच्या अटींवर. तो काम करू शकत होता ते त्याच्याच कार्यपद्धतीने...

तीच कार्यपद्धती राबवून त्याने 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा वेगळाच अवकाश निर्माण केला. नवे आयाम निर्माण केले. मराठी प्रकाशन व्यवसाय हा डुगूडुगू चालणारा व्यवसाय असाच समज करून घेऊन वेगवेगळे प्रकाशक त्यांच्या संस्था चालवतात; परंतु सुनीलने व्यवसायाला 'कंपनी'चे रूप दिले. कंपनी तत्त्वावर जर पुस्तक व्यवसाय केला, तरच तो मोठी झेप घेऊ शकेल, त्याचं आकारमान मोठं होईल अशीच त्याची धारणा होती. म्हणूनच त्याने त्याच्या 'कंपनी'त व्यवस्थापन कौशल्याचे नियम लागू केले. हस्तलिखित स्वीकारण्यापासून ते पुस्तक निर्मितीपर्यंत ते पुस्तक विक्री आणि विपणनापर्यंत त्याने 'सिस्टिम्स' सेट केल्या. त्या 'सिस्टिम'ना व्यवस्थापनाच्या चौकटीत बसवले आणि त्या चौकटी मोडल्या जाणार नाहीत यासाठी कधी ते कठोरपणेही वागले.

परंतु, हे सर्व प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वच बाजू (व्यवस्थापनाच्या) त्या आकाराच्या, त्या उंचीच्या हव्यात हे भान राखत त्यांनी विविध पावलं उचलली. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला.

काळाबरोबर राहण्यासाठी ई-बुकमध्ये वेळीच प्रवेश केला. एकंदरीतच आधुनिक युगाबरोबर राहत त्याने प्रकाशनाचा परिघ आकारमान कल्पनेच्या बाहेर वाढवत नेले. प्रसंगी त्यासाठी वाईटपणाही ओढवून घेतला... परंतु, ठरवलेली वाट तो नेटाने कापत राहिला...



परंतु, अघटित घडले. कुणाच्या ध्यानीमनी नसतानाही त्याच्या अकाली निधनाची बातमी येऊन धडकली. ही केवळ अविश्वसनीय अशीच घटना होती. शरीरात काय घडत असते, याची कुणालाच कल्पना नसते. तब्येत कधी दगा देईल काहीच सांगता येत नाही. सुनीलच्या बाबतीत हेच घडले. अगदी अनपेक्षितपणे... आणि ही दुर्दैवी घटना घडली. वास्तविक, आपणा सर्वांचे सांत्वन करण्यासाठी, आपणास धीर देण्यासाठी माझ्याकडे खरोखरीच शब्द नाहीत.

मात्र, माझा अनिलभाईंच्या धीरोदात्त स्वभावावर पूर्ण विश्वास आहे. त्यांनी आजवर अनेक चांगले-वाईट प्रसंग नेटाने लढले आहेत. आजचा दुर्धर प्रसंग आणि त्यांचे वय पाहता हे आव्हान पेलणं त्यांच्यासाठीही कठीण आहे याची मला जाणीव आहे. तरीही काही दिवसांनी असेना का, पण ते स्वत:ला सावरून घेतील आणि सुनीलच्या परिवारालाही हा दुर्धर प्रसंग निभावून नेण्यासाठी त्यांच्यामागे उभे राहतील अशी मला खात्री आहे. त्यांनी आज अखिलच्या मागे उभं राहून त्याला मार्गदर्शन करणं गरजेचं आहे.

शेवटी एवढंच सांगावसं वाटतं की सुनीलच्या अकाली निधनाचा धक्का झेलण्याचं आपणा सर्वांना सामर्थ्य लाभो. मी व्यक्तिश: आणि संपूर्ण 'रोहन प्रकाशन' परिवार, आम्ही सर्व आपल्या दु:खात सामील आहोत.

आणखी काय लिहू? एक धडाडीचा मराठी प्रकाशक अकाली हरपला एवढं निश्चित.

**— प्रदीप चंपानेरकर-रोहन प्रकाशन**

तुझ्या डोक्यात ज्या काही कल्पना असतील त्या कागदावर उतरवून मला दे. आपण चर्चा करू आणि तसे उपक्रम राबवू...

आमच्या पहिल्याच भेटीत कामाला सुरुवात करण्याआधी पूर्वनियोजन महत्त्वाचं आहे असा धडा देणारे सुनील मेहता माझ्याही नकळत माझे मार्गदर्शक, मित्र बनले.

गोष्टींची पुस्तकं, कथा-कादंबऱ्या वाचण्यापलीकडे मराठी साहित्य व्यवहाराशी अजिबात संबंध नसलेला मी तेव्हा नुकताच मुंबईहून पुण्यात आलो होतो. नोकरीच्या शोधात असताना मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये जनसंपर्क व्यवस्थापक हवा (पीआर मॅनेजर) असल्याची जाहिरात वाचून मी मुलाखतीला गेलो. ती त्यांची-माझी पहिली भेट. साधारण २०१४सालची ही

घटना. माझा पूर्वानुभव मनोरंजन क्षेत्रातला आणि वृत्तपत्र माध्यमाचा अत्यल्प अनुभव; मात्र या क्षेत्रात काम करायची इच्छा खूप होती. नोकरीचीही तातडीनं गरज होती.

प्रकाशन व्यवसायात जनसंपर्क व्यवस्थापक असतो याचं मला विशेष कुतूहल वाटलं; मात्र प्रत्यक्ष मेहतांसोबत काम करायला सुरुवात केल्यानंतर त्यांच्या धडाडीचं, जबरदस्त नियोजन कौशल्याचं, दूरदृष्टीचं, व्यवसायाविषयीच्या व्यापक दृष्टिकोनाचं, सतत नावीन्याची कास धरून तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसाय वृद्धी करण्याच्या विचाराचं... अशा अनेक गुणांचं कुतूहल वाटत राहिलं. वाढत गेलं. त्यांच्या सोबत काम करताकरता थोडंतरी शिकून घ्यावं हीच एक भावना मनात कायम होती आणि कळत-नकळत सुनील मेहता सर सतत नव्या कल्पना मांडून त्यावर चर्चा घडवून मला शिकवत होते.

मितभाषी स्वभावाचे सुनील मेहता पटकन चिडतात किंवा चिडून बोलतात अशी वदंता माझ्या कानावर आली होती. एक-दोन प्रसंगी ऑफिसमध्ये मी त्यांना चिडलेलं पाहिलंही; मात्र थोडं खोलात शिरून जाणून घेतल्यावर माझ्या लक्षात आलं, की त्यांनी कामाबद्दल त्यांच्या अपेक्षा आधीच व्यक्त केलेल्या असतात, तुम्ही त्यांना काही एक कबूल केलं आणि जर ते तसंच्या तसं तुम्ही करू शकला नाहीत तर मात्र त्यांचा पारा चढायचा. अवास्तव आश्वासनांना त्यांनी कधीच थारा दिला नाही, स्वतःही त्यांनी कधी तशी आश्वासनं दिली नाहीत. पारदर्शक नियोजन आणि चोख व्यवहार असला की सारं सुरळीत घडायचं असा अनुभव मला नेहमीच आला. अर्थात आमचे वाद झाले; पण ते चांगल्या कारणासाठी आणि हाती घेतलेल्या उपक्रमाच्या हितासाठीच.

साधारण वर्ष-सव्वा वर्षांचा त्यांचा रोजचा सहवास मला लाभला. हा काळ माझ्यासाठी महत्त्वाचा होता. याच काळात प्रकाशन क्षेत्रात डिजिटायझेशनची धूम सुरू होती. अर्थात मेहता पब्लिशिंग हाऊस त्यातही अग्रेसर होतंच. कंपनीची स्वतःची वेबसाईट होती. ऑनलाईन पुस्तक विक्री सुरू होती. स्वतःचं ॲप होतं. ई-बुक्स निर्मिती केली जात होती. यातलं थोडं थोडं शिकत असताना एक दिवस आम्ही राष्ट्रीय पुस्तक सप्ताह साजरा करायचं ठरवलं. सात दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित करायचे होते.

अर्थात सगळं प्लॅनिंग कागदावर उतरवून त्यात सरांनी सुचवलेले बदल

करून, सातही दिवस सर्व कार्यक्रम सुविहित पार पडले. पहिल्यांदाच डिजिटल पब्लिशिंग आणि प्रिंट पब्लिशिंग या विषयी खुली चर्चा घेण्यात आली. या सगळ्या उपक्रमांच्या आयोजनात मी नवखा असलो तरी कल्पना राबवण्यासाठी मला पूर्ण स्वातंत्र्य त्यांनी दिलं. ज्यातून माझ्यातला आत्मविश्वास वाढला. अनेक गोष्टी शिकता आल्या. ज्याचा आजही मला फायदाच होतो आहे.

त्यातूनच पुढे मला पूर्ण वेळ डिजिटल पब्लिशिंग क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली तेव्हा त्याचंही मेहता सरांनी स्वागत केलं. पुढे येणाऱ्या खाचखळग्यांची जाणीव करून दिली आणि अर्थातच गरज लागेल तेव्हा बिनदिक्कत हाक मारण्याचा हक्कही दिला.

पुढे मी जरी मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये नोकरी करत नसलो तरी मेहता सर मात्र माझ्या कामावर लक्ष ठेवून असायचे. अधूनमधून फोनवरून चौकशी, गप्पा व्हायच्या. भेटलो की बोलणं व्हायचं. त्यांच्याविषयी कायमच एक प्रकारची आदरयुक्त भीती मनात कायम होती.

एका टप्प्यावर मी नोकरी करायची नाही असं ठरवून स्वतंत्र काम करू लागलो, तेव्हा आम्ही फोनवर सविस्तर बोललो होतो. त्यांचा खूप आधार वाटला होता.

पुण्यात बाजीराव रस्त्यावर, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयात त्यांच्या कल्पनेतून प्रशस्त आणि देखणं ग्रंथदालन साकारलं आहे. तिथे गेलं की निवांत बसून पुस्तकं चाळताचाळता वेळ कसा निघून जातो कळतच नाही. या ग्रंथदालनात नियमित स्वरूपात काही साहित्यिक उपक्रम सुरू व्हावेत ही त्यांची मनापासून इच्छा होती...

आज 'होती' लिहिताना माझा हात कापतो आहे. सुनील मेहता या जगात नाहीत हे वाक्य लिहिणं माझ्यासाठी अत्यंत वेदनादायी आहे.

लॉकडाउनच्या काळातही जिद्दीनं त्यांनी व्यवसायाची आघाडी सांभाळली. वृद्धी घडवून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. निर्बंध शिथिल झाले तेव्हा एकदा आम्ही प्रत्यक्ष भेटलो; कारण पुस्तकांचा प्रचार-प्रसार व्हावा या हेतूनं मेहता सरांच्या काही कल्पना आम्ही मिळून प्रत्यक्ष साकारायचं ठरवत होतो. ती भेट माझ्यासाठीही खूपच उत्साहवर्धक होती. लागलीच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात जेव्हा नाशिकमध्ये साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलं तेव्हा पुन्हा त्यांनी तीन दिवसांत सात

विविध साहित्यिक उपक्रम राबवण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली...

ग्रंथ प्रदर्शनात चार स्टॉल्सचं स्वतंत्र दालन उभं करायचं... त्या रिकाम्या दालनात. लेखक-प्रकाशक-वाचक साहित्यव्यवहाराशी जोडलेल्या मंडळींच्या भेटीगाठी घडवून आणायच्या...

एकतर कोरोनाने सगळ्याच उद्योगांचं कंबरडं मोडलेलं असताना, पदरमोड करून असा काही साहित्यिक उपक्रम राबवायचा, त्याकरता आवश्यक ते सगळं करायचं. हे फक्त मेहताच करू शकतात.

अगदी आदल्या दिवशी पाऊस पडून, दुसऱ्या दिवशी पूर्णपणे पावसाचं सावट असतानासुद्धा सुनील मेहता जबरदस्त उत्साहाने वावरत होते. स्टॉल सजवत होते. तिन्ही दिवस अजिबात न थकता सगळ्यांशी संवाद साधत होते. त्या काळातही त्यांचं पथ्यपाणी सुरू होतं; मात्र त्याचा कुठेही अडसर येऊ न देता डोक्यातल्या एकाच विचाराने त्यांना झापटलं होतं ते म्हणजे मराठी वाचकांना उत्तम अनुभव मिळायला हवा.

मेहता स्वतः देशापरदेशातल्या साहित्यिक उपक्रमांना आवर्जून हजेरी लावायचे. वर्ल्ड बुक फेअर सारख्या अतिभव्य प्रदर्शनात जाऊन आल्यावर तिथे जे जे पाहिलं ते सगळं आपल्या मराठी वाचकांना पाहायला, अनुभवायला मिळावं अशी त्यांची इच्छा होती.

त्यांनी इतर भाषांतील पुस्तकांचे फक्त अनुवाद प्रकाशित केले नाहीत तर



तिथल्या लेखकांना इथे आणलं. वाचकांसाठी अनेक योजना आखल्या. ठिकठिकाणी प्रदर्शनं भरवली. मराठीतल्या आघाडीच्या लेखकांच्या साहित्यकृती पुनःप्रकाशित केल्या.

यंदाच्या साहित्य संमेलनात ते आवर्जून नव्या लेखकांना भेटत होते. त्यांच्या कल्पना समजून घेत होते. त्यांना पुस्तक प्रकाशनाविषयी मार्गदर्शन करत होते.

प्रचंड ऊर्जेनं भारलेला त्यांचा हा वावर पाहून अवघ्या एका महिन्यात नियतीनं असा काही क्रूर डाव आखला असेल हे जरी एखाद्या ज्योतिषाने वर्तवलं असतं तरी सगळ्यांनी त्याला मूर्खात काढून हाकलून दिलं असतं.

संमेलनाच्या शेवटच्या दिवशी थोडं निवांत बसलेले असताना त्यांनी लगेचच पुढच्या नियोजनाविषयी बोलायला सुरुवात केली होती. अर्थात इतक्या वर्षांच्या त्यांच्या सहवासामुळे मी आपसूक बोलून गेलो, पुण्यात पोचलो की माझ्या डोक्यातल्या कल्पना नीट कागदावर मांडून तुम्हाला मेल करतो; मग आपण चर्चा करू.

पण, आज सुनील मेहता आपल्यात नाहीत... आजही माझ्या लॅपटॉपमध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसचा फोल्डर आणि त्यात सुनील सरांच्या नावाने केलेल्या प्लॅनिंगची फाइल आहे. कदाचित आम्ही पुढे-मागे त्यातले काही उपक्रम राबवूसुद्धा; पण सुनील सरांसोबत आता चर्चा होणार नाही. त्यातल्या नेमक्या उणिवा दाखवून त्या सुधारण्यासाठी ते मार्गदर्शन करणार नाहीत. चुका पदरात घेत, हसतहसत पाठ थोपटून यशाचं कौतुक करणार नाहीत...

आपल्या मस्तीत जगणारा. जणू आभाळ कोसळलं तरी ते उरावर पेलून धरण्याची जिद्द बाळगणारा... मराठी प्रकाशन विश्वात क्रांतिकारी उपक्रम राबवणारा, मराठी प्रकाशन संस्थेच्या कार्यालयाला कॉर्पोरेट ऑफिसचा निव्वळ लूकच नव्हे तर ती वृत्तीसुद्धा मिळवून देणारा आमचा टीम लीडर आज आमच्यात नाही हे मानायला मन अजून तयार होत नाही.

माझं जसं व्यक्तिगत नुकसान झालं आहे तसं ते अनेकांचं झालं आहे.

त्यांनी आजवर केलेलं काम सगळ्यांसमोर आदर्श म्हणून असणार आहे. तेवढंच दर्जेदार काम करत राहणं ही त्यांना खरी आदरांजली ठरेल...

**– अक्षय प्रभाकर वाटवे - तरुण भारत**

आपल्या मुलाची नुकतीच देवाज्ञा झाल्याची बातमी समजली. ऐकून अतिव दु:ख झाले. नियतीच्या पुढे कोणाने काहीच चालत नाही.

आपण सुज्ञ आहातच, पण आपण ज्यावेळी दडपणाखाली असाल महत्त्वाचा निर्णय घेण्याची वेळ आलेली असेल त्यावेळी पुत्राची मुर्तीमंत प्रतिमा डोळ्यांसमोर आणून त्यांचे स्मरण करा. मार्ग सुकर होतील. पुत्रशोकाला सामोरे जावे लागत आहे.

आपण कुटुंबात जाणते आहात. दु:ख आवेगाला आवर घाला. कुटुंबातील इतर सदस्य तुमचे अनुकरण करतील. आपल्या पुत्राच्या चिरआत्म्याला शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

आम्ही बापट कुटुंबीय तसेच भारतीय जनता पार्टी आपल्या दु:खात सहभागी आहोत. उर्वरीत जबाबदाऱ्या तडीस नेण्यासाठी कसबा गणपती समर्थ आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना

**– गिरीश बापट**

एक झंझावात थांबला. एक प्राणज्योत मालवली. इतिहासातल्या व्यक्तींची पुस्तके प्रकाशित करता करता त्यांचाच इतिहास लिहायची वेळ आली. काळ कुणासाठी थांबत नसतो. यमराजांनी त्यांचे कर्तव्य पार पाडले तेव्हा आपल्या कुणाचाच विचार केला नाही. प्रत्येकाचे प्राक्तनात जे जे लिहिले असते ते ते घडत असते. एक निगर्वी, निर्भिड,स्वत:च्या तत्त्वावर ठाम विश्वास असणारा एक उद्योजक, एक प्रकाशक शेवटी एखादा वृक्ष उन्मळून पडावा तसा निपचिप पडून राहिला. खूप मोठी स्वप्ने बाळगली होती पण कधीच आभासी जगात न वावरणारा माझा, आपणा सर्वांचा सुनील आपणा सर्वांना फार लवकर सोडून गेला. माझे मित्र श्री अनिलभाईंना तो मोठा आधार होता. स्वकर्तृत्वाच्या जोरावर त्याने प्रकाशनविश्वात त्याने एक वेगळी भरारी घेतली होती. मेहता पब्लिशिंग हाऊसला उंच पातळीवर नेऊन ठेवलं होतं. प्रत्येक गोष्टीत बारकाईने विचार करण्याचे तंत्र ही आपल्या सारख्यांना एक शिकवणच होती. हजारोंचा विश्वास संपादन करताना मित्रत्वाचे नाते जपणारा सुनील आता आपल्यात नसणार हा विचार करणे अशक्यप्राय आहे. रणजित देसाईंसारखा कुणी लेखक पुढे यावा आणि जगाला आदर्शवत अशी सुनीलचे आत्मवृत्त जगासमोर मांडावे. व्यक्तीचे

कार्य हे त्याच्या नसण्यानंतर तिथेच थांबते. पण केलेल्या कार्यावर प्रकाश पाडला तर ते कार्य त्या व्यक्तीला पुन्हा जीवंत करते. सुनील व्यक्तीशः आपल्यात नसेल पण त्याचे कार्य, त्याचा उत्साह, त्याची स्वप्ने आपल्याबरोबर असतील आपण त्यांना आकार दिला तर ती खऱ्या अर्थाने त्यांना श्रद्धांजली पोहोचेल. संपूर्ण मेहता परिवाराच्या दुःखात मी सहभागी आहे.

**– दिनकर शिलेदार**

॥

मेहता पब्लिशिंग हाऊसचे प्रकाशक आदरणीय सुनील अनिल मेहता यांचे दुःखद निधन झाल्याची वार्ता कळली. मेहता कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

महाराष्ट्राच्या प्रकाशन व्यवसायात श्री. सुनील मेहता यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. मराठी साहित्यात दर्जेदार साहित्यकृती निर्माण करून रसिक वाचकांना आनंद दिला आहे. त्यांचे हे कार्य प्रेरणादायी आहे. मराठी वाङ्मय मंडळाच्या ग्रंथालयास ग्रंथ भेट देऊन त्यांनी सहकार्य केले आहे.

त्यांच्या आत्म्यास सद्‌गती प्राप्त होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**– प्रा. डॉ. प्रभाकर जोशी**

मराठी वाङ्मय मंडळ, अमळनेर

॥

सुनीलजी मेहता यांचं आकस्मिक जाणं मराठी साहित्याच्या वाचकांसाठी धक्कादायक आहे. मा. अनिलजी यांनी रुजविलेल्या प्रकाशन रोपाचं त्यांनी निगुतीने जतन आणि संवर्धन केलं. वाचकांची आवड आणि आवश्यकता ओळखून त्यांनी सुजाण आणि समृद्ध अभिरुचीचा वाचकवर्ग आपल्या प्रकाशनाच्या माध्यमातून तयार केला. जागतिक आणि इतर भारतीय भाषांतील दर्जेदार निवडक साहित्य त्यांनी मराठी वाचकांना उपलब्ध करून दिलं. व्यक्तिगत ग्राहकांना संग्राह्य पुस्तके परवडणाऱ्या किमतीत घेता यावीत म्हणून त्यांनी ती सवलत योजनेत उपलब्ध करून दिली. प्रथितयश साहित्यिकांप्रमाणेच नवोदित लेखकांनाही संधी दिली. यातील काही लेखक नंतर नावारूपाला आले. प्रकाशन विषयाची विविधता त्यांनी जाणीवपूर्वक जोपासली. प्रकाशनाचं नाव बघून पुस्तकं खरेदी करावी असा वाचकांचा

विश्वास त्यांनी संपादन केला. ते कल्पक आणि साक्षेपी प्रकाशक होते. त्यांची उणीव मराठी साहित्य क्षेत्राला आणि वाचकांना सदैव जाणवत राहील.

**– विजय नांगरे**

श्री. सुनील मेहता यांच्या निधनाची बातमी ऐकली व वाचली. मनाला मोठा धक्का बसला. सुनील माझा चांगला मित्र होता. असे काही घडेल असे स्वप्नातही वाटले नव्हते.

या दु:खद प्रसंगी आपण स्वत:ला सावरावे. आपणास झालेले दु:ख आम्ही जाणून आहोत. वडिलांना मुलाचा मृत्यू पाहावा लागावा, यासारखे दु:ख नाही. आपल्या दु:खात मी सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

**– मेघनाथ भगत**

आपले चिरंजीव सुनील मेहता यांचे अकाली निधन झाले, ही दु:खद वार्ता ऐकून अतीव दु:ख झाले. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या माध्यमातून प्रकाशन व्यवसायामध्ये उत्तुंग भरारी घेणारे जिद्दी, मेहनती, धडाडीचे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या निधनामुळे आपणावर व कुटुंबीयांवर



कोसळलेल्या दु:खात संस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी सर्व सहभागी आहोत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो!

**– डॉ. आशुतोष देशपांडे**
करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर

ଔ

आपले चिरंजीव सुनील यांच्या निधनाची बातमी धक्का देऊन गेली. अशी 'उलट वाहू पाहणारी गंगा' वेदनादायीच! सांत्वनासाठी शब्द उणे! सहवेदना!!

**– ऋतुपर्ण कुलकर्णी**
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

ଔ

मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक व मराठी प्रकाशक संघाचे माजी कार्यवाह व आपले चिरंजीव श्री. सुनील मेहता यांचे अल्पशा आजाराने निधन झाले हे ऐकून आम्हाला खूप वाईट वाटले. त्यांच्या निधनाने लेखक, वाचक, विद्यार्थी आणि मेहता प्रकाशनावर विश्वास व प्रेम असणाऱ्या सबंध वर्गाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. आपल्या परिवारासाठी ही खूपच दु:खद घटना आहे.

आम्ही आपल्या दु:खात सहभागी आहोत.

**– प्राचार्य, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड**

ଔ

श्री. सुनील मेहतांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दु:ख झाले. आपले सांत्वन शब्दांनी होणे अशक्य आहे. मेहता प्रकाशनाचा आपला वारसा ते नव्या जोमाने पुढे घेऊन जात होते. मराठी साहित्याला नवा आयाम देणारा आणि वाचकांची नस अचूकपणे जाणणारा धडाडीचा प्रकाशक जाणे ही मराठी ग्रंथ जगताची मोठी हानी आहे.

सुनील मेहता यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**– प्रमोद देशपांडे**
हेल्पर्स ऑफ दि हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर

ଔ

सुनील मेहतांच्या देहावसानाचा जो दुर्दैवी घाला नियतीने आपल्यावर घातला त्यासाठी आमच्याकडे सांत्वनाचे शब्द नाहीत.

परमेश्वर हे सहन करण्याची शक्ती आपल्याला देवो!

**– श्री. भागवत**

☙

आपल्या परिवारातील श्री. सुनील मेहता यांच्या दुःखद निधनाने परिवाराला कर्तव्याचे मार्गदर्शन करणाऱ्या प्रेरणादायी जीवनास आपण पारखे झाले आहात. स्वतःच्या कार्यपरिश्रमाने सहकार्याचे आधारस्तंभ बनलेले, ज्येष्ठमहर्षी ईश्वराच्या नयनकमलात सामावले गेले. आपल्या परिवाराला झालेल्या अतीव दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या सेवातत्पर आत्म्यास चिरशांती देवो!

**– चंद्रकांत मेहता**

सर्व मंगल सेवा संस्था, नेत्रोपचार मोफत केंद्र

☙

सुनील मेहता यांच्या अकाली दुःखद निधनामुळे आपणा कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो!

**– बा. रा. पालेकर,** कऱ्हाड

☙

आपले चिरंजीव व मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक आणि मराठी प्रकाशन संघाचे माजी कार्यवाह श्री. सुनील मेहता यांचे दुःखद निधन झाल्याचे समजले.

मराठी प्रकाशन विश्वातील धडाडीचे व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख होतीच, तसेच मराठीतील दर्जेदार पुस्तकांच्या प्रकाशनासोबतच विविध भाषांमधील पुस्तकांचे अनुवाद मराठीत आणण्यासाठी सुनील मेहता यांनी प्रकाशन संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविले होते. आपल्या सर्व कुटुंबीयांच्या दुःखात आमच्या ग्रंथालयाचे सर्व पदाधिकारी, संचालक व सेवक सहभागी आहोत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

**– आपटे वाचन मंदिर,** इचलकरंजी

☙

अत्यंत दु:खी अंत:करणाने पत्र लिहीत आहे. सुनील मेहता यांच्या अकाली निधनाची बातमी वाचली. विश्वास न बसणारी बातमी होती.

आपल्या आणि आपल्या कुटुंबीयांच्या दु:खात मी व्यक्तिश: सहभागी आहे.

**– अर्जुन देसाई**
एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर

आज आपणास पत्र लिहिण्यास मन धजत नाही तरीसुद्धा लिहिण्यासाठी मन घट्ट करून प्रयत्न करणार आहे. आपले प्राणप्रिय सुपुत्र मा. सुनील सरांचे अनंताच्या प्रवासाकडे जाणे अतिशय धक्कादायक आहे. तुमच्यासाठी ही घटना जेवढी क्लेशदायक आहे, तितकीच ती माझ्यासाठी व आमच्या सर्व नवचैतन्य प्रकाशन परिवारासाठी क्लेशदायक आहे.

आपल्या कुटुंबीयांवर जे डोंगराएवढे संकट ओढवले आहे, त्यातून आपल्या सर्वांना बाहेर येणे किती अवघड, कठीण आणि दु:खदायी आहे याची कल्पना करवत नाही.

आपल्या कुटुंबाची हानी तर झाली आहेच; परंतु प्रकाशन क्षेत्रचीही हानी झाली आहे.

इतक्या तरुण वयात हे का घडावे, हे सगळ्यांनाच पडलेले मोठे कोडे आहे. त्यांचे प्रकाशन क्षेत्रातील कार्य, व्यवहार, वागणूक सर्वच अवर्णनीय होते ते सर्वांनाच ज्ञात आहे व सदैव लक्षात राहील असेच आहे.

मा. सुनील सरांच्या मागे कै. हा शब्द लावावयास लागणे हे सहन होण्यापलीकडचे आहे. असो. त्यांना शांती, सद्‌गती मिळावी हीच परमेश्वराजवळ प्रार्थना. आपल्याला व आपल्या कुटुंबीयांना या दु:खातून सावरण्यासाठी बळ व शक्ती मिळावी.

**– शरद मराठे**, नवचैतन्य प्रकाशन

## प्रकाशन व्यवसायात वेगळी छाप : अनेक भाषांतील दर्जेदार साहित्य आणले मराठीत आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप...

फ्रँकफर्ट येथील आंतरराष्ट्रीय बुकफेअरमध्ये सहभाग नोंदवून आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी मराठी प्रकाशन विश्वाचे प्रतिनिधित्व केले. प्रकाशन व्यवसायातील नवे आयाम आत्मसात करण्यात मेहता पब्लिशिंग

हाऊस आघाडीवर आहे. सुनील मेहता यांनी मराठीत सर्वप्रथम ई-बुक्सचा प्रयोग यशस्वीरीत्या राबवला. मेहता पब्लिशिंग हाऊसची दीड हजारहून अधिक पुस्तके ई-बुक स्वरूपात उपलब्ध आहेत.

**– सकाळ, पुणे / लोकमत / पुढारी वृत्तसेवा - कोल्हापूर**

## प्रकाशन विश्वातील धडाडीचे व्यक्तिमत्त्व

मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक आणि अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे माजी कार्यवाह सुनील मेहता हे मराठी प्रकाशन विश्वातील धडाडीचे व्यक्तिमत्त्व होते. मराठी प्रकाशन विश्वात आंतरराष्ट्रीय पद्धतीने कामकाज चालवण्याची पद्धत मेहता यांनी रूढ केली. अनेक दिग्गजांसह नवोदित लेखकांना त्यांनी लेखनाची संधी दिली. त्यांनी प्रकाशन संस्थेद्वारे अनेक पुस्तके प्रकाशित करून लेखकांना व्यासपीठ दिले.

प्रकाशन व्यवसायातील सुरुवात...

१९७६ साली वडील अनिल मेहता यांनी पुण्यात स्थापन केलेल्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस' या संस्थेची सूत्रे १९८६ साली सुनील मेहता यांच्याकडे आली. अल्पावधीतच मेहता यांनी संस्थेला नावारूपास आणले. मराठीतील दर्जेदार पुस्तकांच्या प्रकाशनासोबतच विविध भाषांमधील पुस्तकांचे अनुवाद मराठीत आणणाऱ्या सुनील मेहता यांनी संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले.



## प्रकाशन व्यवसायातील कारकीर्द...

आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित जेफ्री आर्चर, मायकल क्रायटन, फ्रेडरिक फोरसाइथ, रॉबिन कुक, ॲलिस्टर मॅक्लिन, जॉन ग्रिशॅम, इयान फ्लेमिंग, डॅन बशऊन, डेबोरा एलिस, ली चाइल्ड, झुम्पा लाहिरी यांचे साहित्य मराठीत आणण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. तर तसलिमा नासरिन, सुधा मूर्ती, अरुण शौरी, खुशवंत सिंग, चेतन भगत, एस.एल. भैरप्पा, शिवराम कारंथ, गुलज़ार, दीप्ती नवल, अरुंधती रॉय, ओशो, किरण बेदी अशा लेखकांचे साहित्य त्यांनी मराठीत आणले. टीबीसी या अभिनव संकल्पनेतून त्यांनी हे अनुवाद मराठी वाचकांपर्यंत पोहोचविले आहेत. मराठीतील वि.स. खांडेकर, रणजित देसाई, व.पु. काळे, विश्वास पाटील, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, आनंद यादव आणि व्यंकटेश माडगूळकर अशा दिग्गज लेखकांचे साहित्य दर्जेदार रूपात मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम मेहता यांनी केले.

☙

एक धडाडीचे प्रकाशक आपल्यातून निघून गेले ही खूप वेदनादायी गोष्ट आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचा विस्तार करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. अनुवादित पुस्तकांचे वेगळे विश्व त्यांनी मराठी वाचकांना दिले. भारतातीलच नव्हे तर जगभरातील उत्तमोत्तम साहित्यकृती मराठीत अनुवादित करून त्यांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले.

**—राजीव बर्वे, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ**

☙

सुनील मेहता हे एक धडाडीचे आणि जिद्दी प्रकाशक होते. त्यांनी साहित्यावर प्रेम केले; पण व्यावसायिक दृष्टीने त्याकडे पाहिले. अनुवादित पुस्तकांचा त्यांनी मराठीत पायंडा पाडला. त्यांची उणीव कोणीच भरून काढू शकत नाही. एक चांगला प्रकाशक आपण गमावला आहे.

**—अनिल कुलकर्णी, मराठी प्रकाशक परिषद**

☙

धाडसी प्रकाशक म्हणून सुनील मेहता यांचे नाव डोळ्यासमोर येते. आमच्या अक्षरधारा बुक गॅलरीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी उमेद वाढविण्याचे काम केले. त्यांनी आमच्यासोबत अनेक प्रयोगही राबविले. ते लोकांना खूप आवडले आणि यशस्वी ठरले. पटकन निर्णय घेणारे आणि

चांगल्या गोष्टींना मूर्त रूप देणारे ते प्रकाशक होते. त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके सतत डोळ्यांसमोर ठेवणे आणि त्यांचे वाचन करणे ही त्यांना श्रद्धांजली ठरेल.

**–रमेश राठिवडेकर, अक्षरधारा बुक गॅलरी**

श्री. सुनील मेहता साहेबांचे निधनामुळे आपल्या कुटुंबावर व प्रकाशनावर जो दु:खाचा डोंगर कोसळला आहे, त्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**– मे. कुंदुरबंधू पुस्तक भांडार, सोलापूर**

## In Remembrance of the Most Enthusiastic and Loved Publisher – Sunil Mehta

***(Sunil Mehta, the managing director of Mehta Publishing House and a former executive of the Marathi Publishers' Association, passed away recently after a brief illness. He is survived by his father, wife, sister, and two***



*children.)*

**Sunil Mehta will always be fondly remembered as 'THE MAN,' who gave the publishing industry a new impetus by aligning SOPs on par with the international publishing world. Besides being the trendsetters of business policies on credit terms, advertising, creative marketing strategies, and digital publishing.**

When the pandemic struck in 2020, Sunil was part of the initiative to start a Forum – PUBLISHER'S EXCHANGE, which helped publishing professionals in the Indian languages support each other with knowledge sharing to sail through difficult times together as a community.

Recently, a Zoom meeting was organized on the same forum to convey deep-felt condolences and pay tribute to him.

The online event saw participation from the friends and family, which included – Anil Mehta (his father), Akhil Mehta (his son), Neeta Gupta, Pranav Johri, Urvashi Butalia, Kannan Sundaram, Ashok Maheshwari, Jaya Bhattacharji Rose, Vidula Tokekar, Manisha Chaudhry, and other friends and colleagues.

Founder of Mehta Publishing House, Anil Mehta, was in tears and couldn't share anything.

Akhil Mehta remembered his DAD as a man of ethics and simplicity. "He was my guide who taught me some of the best life lessons and was very ethical and sincere about his work. He taught me people's skills to deal with peers and industry professionals. He was completely involved in the minutest details of book creation," he shared.

Further remembering him fondly, he added, "He was so passionate about his work that if someone called to ask for a

book at 2.30 in the night, he would happily open his office and get it delivered. He also taught me skills and insights relating to publishing. He was very clear and transparent with money matters and followed a simple working style. He was a selfless soul without any fears."

"It's very hard for me to think of Sunil Mehta in the past tense. I think what really set him apart was his enthusiasm and his generosity of spirit; his commitment to translations and his fearlessness when it came to publishing, pandemic or no pandemic," added Neeta Gupta, co-founder of the Publishers' Exchange.

Ravi Deecee, Publisher - DC Books, shared, "Sunil has revolutionized Marathi publishing. He has attained the right combination for the readers with the contemporary classics. From Father to Son, while the legacy was maintained, he recognized the potential to make it one of the finest publishing houses of India, contemporary classics, debut authors to translations, and embarked on a new way of entertaining the readers.

His death is indeed a great loss to the Indian publishing industry and a personal loss to me."

Pranav Johri, Rajpal & Sons Publishing, thought of him as a contemporary and added, "It was shocking news for entire publishing fraternity. I still remember his enthusiasm, energy, and generosity. We had worked together on POD distribution, distributing books globally through Ingram. We used to share notes and discuss a lot of things. I always felt so comfortable with him while discussing new ideas and plans. He was always encouraging and motivating. He had a great experience, wisdom, and foresight, which he was ready to share with all of us, without any sense of insecurity."

He further added, “During pandemic when Ingram rates were going up, he took the responsibility to band all of us together and fought against an increase in pricing. He was ready to go one-on-one with Amazon as well. It’s a massive loss for the entire Indian publishing industry.”

Urvashi Butalia remembered him as one of the proudest publishing colleagues and added. “I was always amazed by his sense of pride in being a publisher. He never felt marginalized being a Marathi publisher. He was very much part of mainstream publishing. He published my books in Marathi translations. Interestingly, he always kept me informed when the license ran out and renewed it. It was a very rare thing.”

She also shared, “Once, he called me to ask about a book by an Assamese author to be translated in Marathi. It required some time to get things aligned and procure rights. After doing the needful, I called to inform him and asked if he needed a translator. He informed me that it was already done. This was his personality, always moving several steps ahead and full of dynamism.”

We at - *All About Book Publishing* Magazine will always remember him for providing us with unconditional support in getting industry insights and empowering us with his knowledge and wisdom.

Even in these terrible times when blows fall from all sides, the sudden illness and departure of Sunil is a terrible, terrible blow—it is the blow of blows.

Sunil brought a new dynamism to publishing, a new discipline. He introduced new practices. And like his father, Anil, to whom we owe so much, he was most considerate of authors.

For me he has always been a true friend, one to whom I turned ever so often for help. To mention a matter to him was as good as having it done. Thus, this terrible blow of his passing is, of course, a great, great loss to the world of books, for me it is a blow struck at my own life.

**– Arun Shouri**



Please accept my deepest condolences on the sad demise of Sunil Ji Mehta. What a loss!

Publishing 'Magnolia' - the book that is winning hearts currently in India and America - was a matter of great joy at MPH thanks to his discernment and leadership, and I am sure many authors will share my sentiment.

Writing and publishing will never be the same again without him... Prayers for his soul to rest in peace!

**– Anita Kulkarni**

Sunil was a very close and dear friend to all of us. I have many memories of the excellent time spent with him. Movies at our cinema theatre in kolhapur & later in Pune was a regular ritual when we met during holidays. His Marathi books was a regular gift to me & my family members. He with the support of his father created Mehta Publishing House, which today is a known Publisher in Maharashtra. His father still sits at the store located on Bhausingji road where they began the business.

So sad to hear his loss. May god give enough strength to the family to bear his irreparable loss. I pray that his soul rests in peace. We will miss you Sunil.

**– Sachin Shirgaokar**

Akhil, I am shocked and numb. On that November day Dad, Sunil Gadgil and I were chatting, joking and laughing and now it's so difficult to accept that I will never get to see Dad. The industry has lost a great publisher and a fantastic human being. Under current pandemic situation I am avoiding to be there to say bye to him. Also I do not want to see him in that state. I want to keep our November happy moments close to my heart. I will see you as soon as the situation improves. Be strong. We are all with you. Take care. I will call up you and grand Dad in some days.

**– Sunil Patki,** Pan Macmillan

Very very sad news I m speechless it's a personal loss for me our heartfelt condolences to u & d family May his pure soul rest in eternal peace

**– Sachin Pilgaokar**

We learned demise of our friend & mentor Shri Sunilbhai. We have a very good memories with him. We are not able to gulp this news. But we have no option other than accepting this harsh truth.

We will pray to God to give you and your family strength in this difficult time. Please accept our condolences.

**– R R Sheth and Co Pvt Ltd**

Dear Akhil,

I am in the US. I heard about your father's sad demise just now. I had no idea about his recent illness. I am still in shock and have no words to express my feelings. My husband and I are with you and your family. You are still so young. When I first met your father, he must have been be your age. I still remember the happy times I shared with all of you. Pls take care of yourself, your mom, Sahil and your grandpa. I will call you in a few days!

**– Leena Sohoni**



Dear Akhil, it's unbearable loss! Very very shocking! Can't believe it! Such a good soul! May he Rest in peace. It's your responsibility now to carry forward his great legacy! Om shanti

**– Vishwas Nangare Patil**




ଔ

We are very, very sorry to hear about Mr. Sunil Mehta passing away. Our condolences to everyone at Mehta Publishing House for the loss. Writing in to let you know that you have our unwavering support in this difficult time. Should there be anything we could help with, please do reach out.

**– All of us at Roli Books**

ଔ

I just now learnt with great shock and sadness the sudden passing away of dear Sunil. Indeed, a great loss to both you personally and to the books industry. I carry very fond memories of him. May God give peace to his

soul and courage to you to bear this great loss with courage and dignity.

**– Sudhir Malhotra**

Orient paperbacks, New Delhi

ଔ

I heard about Mr Mehta's passing last evening. It's terribly shocking for everyone in the publishing community. Having worked with him on many books over the last decade or so, I came to know him as a great champion of Indian literature who transformed the way Marathi publishing functioned with his modern outlook.

I am so sorry for your loss. Please convey my condolences to his family. I hope they find the strength to cope with this.

**– Minakshi Thakur**

ଔ

I'm so sorry to hear about the news. It's really heartbreaking.

Praying for strength and courage for Mr. Mehta's family.

Thanks,

**– Ridhima Kumar**

ଔ

Please convey our heartfelt condolences to the bereaved family for the sad demise of Shri. Sunil Mehta.

May God rest his soul in peace and give strength and courage to family members to face the tragedy.

**– Dr. Mrs Vinaya V. Dharwadkar**

ଔ

I am Rei Kimura one of your authors and I have known and met Sunil at various Frankfurt Book Fair for so many

years. I was and am still shocked to learn that Sunil passed on a couple of days ago. I was communicating with him on my last book with Mehta quite recently and he seemed well and upbeat. If we are feeling so sad I can imagine how you and your family feel. I am so very sorry for this great loss and although we have no choice but to accept it, Sunil left us many memories of a warm person and great achievements.

RIP, Sunil you are forever missed by all of us. Take care and my prayers are with you and your family.

Warmest wishes.

**– Rei Kimura (Author)**

A prominent personality in the world of Marathi publishing, Sunil Mehta not only gave a new lease of life to veteran authors but was instrumental in bringing to Marathi the works of many international celebrities like Jeffrey Archer, Frederick Forsyth, Robin Cook, Alistair McLean, John Grisham, Ian Fleming and Dan Brown, to name a few.

Mehta was a formidable Indian publisher and not merely a 'regional language publisher' whose enthusiasm and commitment to translations and his fearlessness when it came to publishing, will stay with us forever.

**– Sachin Ketkar**

Dear Sir & Akhil,

I was informed from Pune by some of the fellow publishers at around 4:30 or 5:00 on the 12th that Sunil is no more. It came as a shock and in fact I couldn't believe it. I didn't know what to say when I was informed. Really shocking.

I have been in constant touch with Sunil over the phone, even as recent as a few weeks back. Between you and him,

suggested most of the best Marathi titles, even got me the rights for the books not published by you. As a friend and a fellow publisher, It is a big loss for me.

I believe he has played a major role, not only as a Marathi publisher but at large, including mainstream publishing programs and translations.

I pray that the departed soul may rest in peace. May the Almighty give you and the family the strength to withstand this moment of great loss and sorrow.

Condolences,

**– Ravi Deecee**



**rahul khichadi** @rahulkhichadi · Jan 12

वि. स. खांडेकर ते चेतन भगत...
**सुनील मेहता** यांनी ज्या लेखकांचे साहित्य लाखो वाचकांपर्यंत पोहोचवलं, त्यांची रेंज बघा! पारंपरिक प्रकाशन व्यवसायाला, ज्यांनी डेस्कटॉप, लॅपटॉप आणि मोबाईलवर आणलं, त्या द्रष्ट्या प्रकाशकाला देवाने लवकर नेलं! अनिलकाका, **मेहता** परिवाराच्या दुःखात सामील आहोत!

---

**Weekly Sadhana** @WeeklySadhana · Jan 13

व्यवसायात 'प्रोफेशनलिझम' आणण्याचे काम प्रकाशकांनी करायला हवे !
- **सुनील मेहता**
**सुनील मेहता** यांचे काल निधन झाले आहे. त्यांची कार्यपध्दती आणि दूरदृष्टी यांची झलक दाखवणारी मुलाखत..
kartavyasadhana.in/view-article/m...

---

**Arun Lad** @NCPArunLad · Jan 12

मराठी वाचकांच्या मनात आदराचे स्थान पटकावलेल्या **मेहता पब्लिशिंग हाऊस** या अग्रगण्य प्रकाशन संस्थेचे संचालक सुनिल **मेहता** यांचे निधन झाले. अनेक दर्जेदार लेखकांच्या पुस्तकांसह इतर भाषांमधीलही अनेक पुस्तके मराठी भाषेत आणण्यात त्यांचा मोठा वाटा होता. परमेश्वर त्यांना सद्गती प्रदान करो.

---

**Shoumika Mahadik** @shoumikamahadik · Jan 12

'**मेहता** पब्लिशिंग हाऊस' या मराठी भाषेतील अग्रगण्य प्रकाशन संस्थेचे संचालक **सुनील मेहता** यांचे निधन झाल्याची बातमी समजली.
आज त्यांच्या जाण्याने मराठी प्रकाशन जगताने प्रगतशील संकल्पना रुजवून मराठी प्रकाशन क्षेत्रात विकास घडवून आणणारे व्यक्तिमत्व गमावले आहे.
भावपूर्ण श्रद्धांजली!!

---

**Storytel Marathi** @StorytelMarathi · Jan 12

'**मेहता पब्लिशिंग हाऊस**' या मराठीतल्या नामवंत प्रकाशन संस्थेचे संचालक सुनील **मेहता** यांचं आज निधन झालं. स्टोरीटेलतर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली!
शेकडो उत्तमोत्तम पुस्तके मराठी वाचकांना देणारे प्रकाशक म्हणून ते नेहमीच आपल्या सगळ्यांच्या स्मरणात राहतील. 🙏

---

**Prithviraj Patil** @incprithviraj · Jan 12

माझे शालेय जीवनापासूनचे अत्यंत जवळचे मित्र आणि **मेहता** पब्लिशिंग हाऊसचे **सुनील मेहता** यांच्या निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले. मागे २-३ महिन्यांपूर्वी पुण्याला गेलो असताना त्यांना भेटण्याचा योग आला. ही शेवटची भेट ठरेल असं त्या भेटीत कुठेच वाटलं नाही.त्यांची प्रकृतीही उत्तम होती(1/2)



## प्रिय भैय्याच्या स्मृतीस अभिवादन...

आमचे फुवा अनिल, त्यांचा लाडका पुत्र 'सुनील'

टपोरे डोळे, परखड वाणी
जाग्या झाल्या बालपणीच्या आठवणी
अमिताभचा पिक्चर म्हणजे तुला पर्वणी
'मुकद्दर का सिकंदर' या चित्रपटास रोजची तुझी वर्णी
दंगामस्तीत सारेच हरवून जायचो
भां बरोबर हुरडा पेरू खायला आपण जमायचो

कोल्हापूरच्या माझ्या आजोळी
कादंबऱ्यांची असायची मेजवानी
'अजब'च्या समोरच्या राजाभाऊंची तिखट भेळ,
तोंडाला सुटायचे पाणी

पाचगणीत झाले तुझे शिक्षण
सुट्टीतील मजेचा अनुभवला क्षण अन् क्षण
आणि नंतर तुझे पुण्यातील शिक्षण
वाट पाहायचो आत्या आणि आम्ही
कधी होईल तुझे आगमन

मोठे झालो आणि आपआपल्या कामात हरवून गेलो
कुठेतरी, कधीतरी भेटत राहिलो
व्यापात संवाद विसरून गेलो
आता जाणवतेय खरंच आपण चुकलो

फुवांनी रचला 'मेहता पब्लिशिंगचा' पाया
कष्ट तुझे अपार, कसे जातील वाया

'मेहता पब्लिशिंग'चा कळस नेलास गगनावरी
परदेशी साहित्याचा मराठी अनुवाद
वाचकांच्या पसंतीस पडलाय, लई भारी


देशविदेशातील साहित्यकांमध्ये तू रमलास
अनेक पुरस्काराने तू सन्मानित झालास

स्वकर्तृत्वाने गाठलेस तू यशोशिखर,
भय्या, तुझा कसा पडेल आम्हा विसर

आठवते आत्यावरील कविता पाठव ही तुझी मागणी
मग सांग, अर्ध्यावरती डाव मांडून का गेलास आम्हा सोडूनी

देह नश्वर, आत्मा अमर
भय्या, तू आहेसच आमच्याबरोबर
भय्या, तू आहेसच आमच्याबरोबर

– **सचिन शहा**



**Rajendra B. Aklekar** @rajtoday · Jan 12

Very shocking to read this. Had hoped to meet him someday.
My first book Halt Station India came into Marathi only because of him!
@rohantillu

**Prithviraj Patil** @incprithviraj · Jan 12

माझे शालेय जीवनापासूनचे अत्यंत जवळचे मित्र आणि **मेहता** पब्लिशिंग हाऊसचे **सुनील मेहता** यांच्या निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले. मागे २-३ महिन्यांपूर्वी पुण्याला गेलो असताना त्यांना भेटण्याचा योग आला. ही शेवटची भेट ठरेल असं त्या भेटीत कुठेच वाटलं नाही.त्यांची प्रकृतीही उत्तम होती(1/2)

**Atul Bhatkhalkar** @BhatkhalkarA · Jan 12

मराठीतील प्रथितयश लेखकांचे साहित्य तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील लेखकांच्या साहित्याचे अनुवाद मराठीत प्रकाशित करून वाचकांना समृद्ध करणाऱ्या **मेहता** पब्लिशिंग हाऊसचे **सुनील मेहता** यांचे वयाच्या अवघ्या ५६व्या वर्षी जाणे चटका लावणारे आहे.
सुनीलजी **मेहता** यांना भावपूर्ण श्रद्धांजली🙏💐

**Satyajeet Tambe** @satyajeettambe · Jan 12

**मेहता** पब्लिशिंग हाऊसचे संचालक **सुनील मेहता** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. अनेक ख्यातनाम लेखकांना आपल्या प्रकाशन संस्थेच्या माध्यमातून ओळख मिळवून देणाऱ्या मेहतांचे हे अकाली जाणे धक्कादायक आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो!

**Murlidhar Mohol** @mohol_murlidhar · Jan 13

मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक सुनीलजी मेहता यांना समस्त पुणेकरांच्या वतीनं भावपूर्ण श्रद्धांजली ! १९८६ साली सुनीलजींनी मेहता पब्लिशिंग हाऊसची सूत्रे हाती घेतल्यानंतर केलेला विस्तार एकूणच मराठी साहित्य, प्रकाशन व्यवसाय आणि वाचकांसाठीही महत्त्वाचा ठरला.


**Bhaangarbhuin** @bhaangarbhuin · Jan 12

साहित्य वेवसायाक वेगळें मोडण दिवपी व्यक्तीमत्व, **मेहता** पब्लिकेशन हावसाचे कार्यकारी संचालक **सुनील मेहता** बुधवारा संवसाराक अंतरले. तांची पिराय 56 वर्सां आशिल्ली. मुतखड्याच्या दुयेंसा खातीर तांकां हॉस्पिटलांत दाखल केले. उपरांत अचकीत तांकां मरण आयलें.

**Kuchik Raghunath** @KuchikR · Jan 12

नावाजलेल्या आणि अग्रगण्य '**मेहता पब्लिशिंग हाऊस**' प्रकाशन संस्थेचे संचालक सुनील **मेहता** यांच्या अकाली निधनाचे वृत्त धक्कादायक आहे. कित्येक उत्तमोत्तम पुस्तके मराठी वाचकांना देणारे प्रकाशक जाण्याने साहित्यक्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/02/2022 Posting Date : 11/02/2022



**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,